भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे

त्रैमासिक

खंड ५९, अंक १–४, शक १९०२

म. म. दत्तो वामन पोतदार स्मृति–अंक

[महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ आणि
श्री. विनायकराव ओतुरकर निधी यांच्या पुरस्काराने प्रकाशित]

अनुक्रमणिका

संपादन समिती :

डॉ. म. श्री. माटे (कार्यकारी संपादक)
प्रा. ग. ह. खरे
डॉ. चिं. ना. परचुरे
प्रा. मु. श्री. कानडे
प्रा. व. स. जोशी

प्रकाशक : डॉ. चिं. ना. परचुरे, चिटणीस, भा. इ. सं. मंडळ,
१३२१ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.

मुद्रक : शां. दे. जोशी, गायत्री मुद्रणालय, 'गायत्री सदन', २०६० सदाशिव पेठ, विजयानगर कॉलनी, पुणे ४११ ०३०.

प्रकाशन : २४ ऑक्टोबर १९८०

हा अंक शक १९०० चा असून ह्या वर्षी सभासद असणाऱ्यांना पाठविला आहे.

मूल्य : १०–००



म. म. दत्तो वामन पोतदार

जन्म
५-८-१८९०

मृत्यू
६-१०-१९७९

प्रास्ताविक –

सहा आक्टोबर १९७९ या दिवशी महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार निवर्तले खांद्यावर चापूनचोपून बसविलेली उपरण्याची घडी, कपाळावर रेखून दुबोटी गंध, मस्तकावर झोकदार पगडी या खास पुणेरी थाटातील 'दादांची' ती मूर्ती यापुढे अध्यक्षस्थानी दिसणार नाही. ज्यांच्या दटावण्यातही आनंद वाटावा, ज्यांच्या उत्तेजनाने अंगावर मूठभर मास यावे असे आमच्यातील अत्यंत प्रेमळ आणि दक्ष वडील माणूस गेले. मंडळाच्या प्रगतीसाठी त्यांनी अहर्निश वाहिलेली चिंता आणि त्यांचा साक्षेप याच गोष्टी आम्ही ध्यानात ठेवू. त्यामुळेच दत्तो वामनांच्या आत्म्यास शांति लाभेल.

त्यांच्या स्मृतीस प्रणाम.

या आधीचा त्रैमासिकाचा खंड तीस एप्रिल १९७९ रोजी प्रसिद्ध झाला. त्यानंतरच्या दीड वर्षाच्या काळात मंडळाशी अत्यंत निकटचा संबंध असलेल्या आणखी काही मंडळींनी आपली इहलोकीची यात्रा संपविली. यात काही आजी व माजी पदाधिकारी होते, मंडळाच्या नावलौकिकात भर घालणारे विद्वान व संशोधक होते. यांच्या निधनाने मंडळाची फार मोठी हानी झाली आहे.

कै. मालोजीराव नाईक निंबाळकर हे १९४१ पासून मंडळाचे अध्यक्ष होते. या दीर्घ काळात त्यांनी मंडळाच्या कार्यात आस्थेने सहाय्य व मार्गदर्शन केले.

कै. प्रा. रा. वि. ओतुरकर हे काही काळ मंडळाचे चिटणीस, व दीर्घ काळ कारभारी मंडळाचे सदस्य होते. प्राध्यापक आणि इतिहास-राज्यशास्त्र या विषयांवरील ग्रंथांचे लेखक म्हणून ते प्रसिद्ध होते. मंडळाची संशोधन-अध्ययन बाजू भक्कम करण्याकडे जसे त्यांनी लक्ष दिले तसे आर्थिक बाजूकडेही दिले. त्यांनी दिलेल्या पंचवीस सहास्त्राच्या देणगीचा लाभ मंडळास कायमचा होणारा आहे.

कै. दि. वि. काळे हे काही काळ मंडळाचे खजीनदार होते तसे कारभारी सदस्यही. ग्रंथालय चळवळीतील त्यांचे कार्य सुपरीचित आहे. त्यांनी संशोधनात्मक लेखनही विपुल केलेले असले तरी त्यांच्या "छत्रपति शिवाजी महाराज" या ग्रंथाने त्यांना मानाचे स्थान मिळवून दिले.

कै. प्रा. न. र. फाटक हे मराठी साहित्य, विशेषतः संत वाङमय व मराठी इतिहास यांचे व्यासंगी. त्यांनी विपुल व चिकित्सक लेखन केलेले आहे.

कै. चिं. य. मराठे यांचे नांव संशोधन क्षेत्रात फारसे प्रसिद्ध नसले तरी यांचा व्यासंग दांडगा होता. मंडळातील कागदपत्रांच्या एका संग्रहाचा सामाजिक,

आर्थिक दृष्टिकोनातून अभ्यास त्यांनी हाती घेतला होता. पण दुर्दैवाने तत्पूर्वीच त्यांना जीवनयात्रा पुरी करावी लागली.

कै. श्री. रा. पारसनीस हे फर्गसन महाविद्यालयाचे माजी उपप्राचार्य आणि मराठीचे प्रसिद्ध प्राध्यापक होते.

कै. स. वि. बापट हे 'आठवणीकार' बापट म्हणूनच ओळखले जात. लोकमान्य टिळकांच्या आठवणींचे संग्रह प्रसिद्ध करून समकालीन इतिहासाच्या अभ्यासाचे एक फार मोठे साधन त्यांनी उपलब्ध करून दिले.

कै. वेंकेटेशशास्त्री जोशी हे संस्कृतचे प्रगाढ पंडित, मंडळाचे कार्यात अलिकडे जास्तीजास्त सहभागी होऊ लागले होते. पण त्यांच्या अकाली निधनाने मंडळाला त्यांच्या कर्तृत्वाचा लाभ होऊ शकला नाही.

के. बाबासाहेब ठकार हे विशेषत: वऱ्हाडात लोकप्रियता लाभलेले इतिहासकथनकार. त्यांनी मंडळाला त्यांचा ग्रंथ संग्रह नुकताच दिला होता.

हा अंक छापण्यास प्रारंभ झाल्यावरहि हे दुःखद काम संपविता आले नाही. कारभारी मंडळाच्या काही काल सदस्य असलेल्या प्रसिद्ध इतिहासाभ्यासक सौ. डॉ. कमल गोखले यांनी अत्यंत लहान वयात आपली इहलोकीची यात्रा संपविली. 'शिवपुत्र संभाजी' या ग्रंथाच्या लेखिका म्हणून त्या सर्वांना परिचित होत्या.

याशिवाय या यादीत प्राचार्य का. शं. केळकर, श्रीमंत सदाशिवराव रघुनाथराव पंतसचिव, श्री. रा. टिकेकर, ना. ल. आठवले, प्रा. श्री भि बोंडाले, वा. स. साठे, बा. श्री. संगमनेरकर, ना. रा. साठे, द. रा. नगरकर, ला प्र पंड्या, प्रा. अं. तु. अडकी आणि नंदिनी सूर्यवंशी या मंडळ सभासदांचा सहृदांचा, समावेश जड अंतकरणाने करावा लागत आहे.

या सर्वांच्या स्मृतीस अभिवादन.

\+ \+ \+

कै. दत्तो वामन यांचा गेल्या पन्नास वर्षे सतत संबंध असणारे मंडळाचे सध्याचे कार्याध्यक्ष प्रा. ग. ह. खरे यांचा पोतदार यांच्याविषयीचा लेख तसेच मंडळ प्रकाशनात प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या लेखांची, मंडळाचे चिटणीस डॉ चि. ना परचुरे यांनी केलेली सूची याच अंकात इतरत्र प्रसिद्ध केली आहेत.

\+ \+ \+

प्रा. खरे यांची अखिल भारतीय इतिहास परिषदेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याचे मागच्या अंकात नोंदविलेच आहे. वाल्टेर येथे भरलेल्या या अधिवेशन प्रसंगी मंडळाचे चिटणीस आणि इतर अभ्यासू सभासद उपस्थित होते आणि नि

निराळ्या विभागात निबंध वाचन करून मंडळाच्या सभासदांनी सतत चालविलेल्या संशोधन-कार्याची प्रचीती आणून दिली.

\+ + +

गतवर्षीपासून मंडळाच्या संशोधन कार्याला अध्यापनाची जोड देण्यात आली. यापूर्वी मंडळाने मोडी व फार्सीसी शिकविण्याचे वर्ग चालविले होते, सुट्ट्यांमध्ये काही अभ्यासक्रमही चालविले होते. हा सर्व अनुभव गाठीशी घेऊन ऑगस्ट १९७९ पासून "मध्ययुगीन–भारतदर्शन" हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला. दर शनिवारी तीन तास याप्रमाणे जवळजवळ वर्षभर वर्ग चालविण्यात आले. या उपक्रमाला पहिल्याच वर्षी उत्तम प्रतिसाद मिळून पंचवीस विद्यार्थी सहभागी झाले अध्यापनाच्या कार्यात प्रा. ग. ह. खरे, डॉ. कृ. ना. चिटणीस, प्रा. म. आ. कुलकर्णी, प्रा. मु. श्री. कानडे, प्रा. श्री. द. संगोराम, डॉ. गो. त्र्यं. कुलकर्णी, डॉ. म. श्री. माटे, डॉ. उषा रानडे व कु. अमिता रायरीकर यांनी भाग घेतला. हे काम सर्वांनी मंडळाच्या कार्याला चालना मिळावी याच बुद्धिने केले हे येथे नमूद केले पाहिजे. या सर्वांचे सहकार्य या वर्षीहि मिळत आहेच पण आणखीही अनुभवी व तज्ज्ञ प्राध्यापक त्यात सहभागी होत आहेत. याहि वर्षी विद्यार्थ्यांचा प्रतिसाद समाधानकारक आहे.

अभ्यासकांची मागणी ध्यानात घेऊन या वर्षी मोडी व फार्सी विषयांचे नियमित वर्ग सुरू करण्यात आले आहेत. त्यातील शिक्षणाची जबाबदारी प्रा. खरे व डॉ. गो. त्र्यं. कुलकर्णी यांनीच स्वीकारलेली आहे.

\+ + +

कागदपत्रे, हस्तलिखिते गोळा करणे, प्रकाशित करणे ही संशोधकीय कामे अर्थातच नित्याप्रमाणे चालू आहेतच. संशोधन क्षेत्रात या वर्षी मंडळाने थोड्या निराळ्या कामात सहभागी होण्याचे ठरविले आहे. पहिल्या प्रकल्पाची कल्पना पुण्याच्या स्थापत्य महाविद्यालयातील नगर रचना विभागाचे प्रमुख व मंडळाचे एक सभासद प्रा. गोपाळ कान्हेरे यांची आहे. पुण्यातील काही जुन्या वास्तूंचा सांगोपांग अभ्यास करून त्यांच्या जतनासाठी सहाय्य करणे हा या प्रकल्पाचा उद्देश आहे. मंडळाने पूर्वी नगर संशोधन कार्य चालविले होते आणि त्रैमासिकाचे 'पुणे नगर संशोधन' वृत्ताचे अंकही प्रसिद्ध केले आहेत. हेच सूत्र प्रा. कान्हेरे यांच्या योजनेत अनुस्यूत आहे व म्हणून त्यात मंडळाने भाग घेणे स्वाभाविकच ठरते. दुसरा प्रकल्प आहे "दौलताबाद नगरीच्या ऐतिहासिक व पुरातात्त्विक अध्ययना"चा. मराठवाडा विद्यापीठाच्या इतिहास विभागाचे प्रमुख प्रा. पती, डेक्कन कॉलेजचे डॉ. म. श्री. माटे, डॉ. गो. त्र्यं. कुलकर्णी, स्थापत्य महाविद्यालयाचे प्रा. कान्हेरे आणि भा. इ. स. मंडळाचे प्रा. ग. ह. खरे या सर्वांच्या नेतृत्वाने व सहकार्याने ही मोठी योजना कार्यवाहीत आणण्यात येत आहे.

प्रकाशन क्षेत्रात गति खूपच मंदावलेली आहे हे मान्य केलेच पाहिजे. तथापि त्याचे कारण लेखकांचा वा लेखनाचा अभाव हे नसून गेली दीड दोन वर्षे सर्वत्र जाणवणारा कागदाचा तुटवडा हे आहे. पाहिजे त्या प्रकारचा व पाहिजे तेंवढा कागद जरूर तेव्हा मिळविणे अशक्यच होऊन बसले आहे. किमतीही भरमसाठ वाढलेल्या आहेत. यामुळे या वर्षी एकच पुस्तक प्रकाशित करता आले. वार्षिक संमेलनाच्या दिवशी डॉ. म. श्री. माटे व डॉ. उषा रानडे यांनी संपादन केलेले "मंडळ संग्राहालयातील भागवत-पुराणावरील चित्रे" हे पुस्तक प्रसिद्ध झाले. हस्तिदंती गंजीफांची छपाई कागदा अभावी पूर्ण करता आली नाही. डाँ चि. ना. परचुरे आणि प्रा. मु. श्री. कानडे यांनी तयार केलेली मंडळ प्रकाशनांची सूची छपाईस गेली आहे.

१९७९ च्या अखेरीस योजलेल्या निवडणुका श्री. प्र. बा पुंडे इत्यादींनी मा. कोर्टाकडून आणलेल्या स्थगितीमुळे घेता आलेल्या नाहीत. घटनेसंबंधी प्रश्नांवर मा. कोर्टासमोर विचार चालू असला तरी स्थगिती उठविण्यात आली आहे म्हणून या वर्षीच्या नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यात कार्याध्यक्ष, खजानदार व कारभारी-मंडळ यांच्या निवडणुका घेण्याचा कार्यक्रम आखून त्याची कार्यवाही चालू केली आहे.

दत्तो वामन पोतदार – जीवन व कार्य

ग. ह. खरे

गेली पन्नास वर्षे मराठी समाजाच्या सांस्कृतिक जीवनात जी काही प्रमुख माणसे आघाडीवर होती त्यात दत्तो वामन यांचे नाव प्रामुख्याने घेता येते. मराठी साहित्य संमेलन असो, इतिहास परिषद असो की तमाशा परिषद असो पोतदारांचा सहभाग त्यात हमखास आढळणारच. एका अर्थाने ते व्यक्ती राहिले नसून एक सार्वजनिक संस्थाच बनले होते. विसाव्या शतकाच्या प्रथमार्धात मराठी जीवनात पुढे आलेल्या इतर अनेक व्यक्तीप्रमाणे पोतदार हेहि कोकणातून आलेले.

कुलाबा जिल्ह्यातल्या वीरवाडी नावाच्या गावी त्यांचा जन्म शक १८१९ च्या श्रावण वद्य पचमीला (५–८–१८९०) झाला. त्यांच्या घराण्याचे मूळ नाव 'ओरपे'. परंतु, व्यवसायपरत्वे काहींनी 'पोतदार' तर काहींनी 'सबनीस' असे नाव पुढे घेतले. वीरवाडीलाच त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले. याच सुमारास त्यांचे वडील कै. वामनराव यांनी वकिली व्यवसाय करावयाचे ठरवून पुण्याला स्थलांतर केले त्याचा लाभ दत्तोपंताना झाला व उच्च शिक्षण नूतन मराठीत आणि महाविद्यालयीन शिक्षण फर्गसन कॉलेजमध्ये घेता आले. १९१० मध्ये ते बी. ए. झाले.

शिक्षणसंस्थांशी आलेला त्यांचा संबंध मात्र येथेच संपला नाही. जवळ जवळ लगेचच ते शिक्षण प्रसारक मंडळीच्या सेवेत रूजू झाले. पुढची पचवीस वर्षे त्यांनी मंडळीच्या सेवेतच काढली. प्राथमिक शाळेचे प्रमुख, प्रशालेचे प्रमुख, मराठीचे व इतिहासाचे प्राध्यापक आणि त्यानंतर नियामक मंडळाचे सदस्य म्हणून पुढे विश्वास्त म्हणून त्यानी या शिक्षणसंस्थेत काम केले. ज्या ज्या ठिकाणी ते नोकरीत होते त्या त्या ठिकाणचे त्या त्या पदाचे काम त्यांनी अत्यंत दक्षतेने केले यात शकाच नाही पण सुरवातीपासूनच त्याना त्या सार्वजनिक क्षेत्राचे आकर्षण वाटत आलेले दिसते. त्यांच्या वडिलांना मराठी इतिहासाची विशेष गोडी असे आणि बहुधा त्यामुळेच इतिहासाचार्य राजवाडे याचे त्यांच्या कडे बरेच जाणें येणे असावे. दत्तोपंताचाहि माविक त्यांच्याशी परिचय झाला आणि कळत न वळत राजवाडयांच्या 'संस्थात्मक' जीवनाच्या विचारांची त्याच्यावर छाप पडत गेली असे दिसते.

किंबहूना त्यांचा सार्वजनिक क्षेत्रातील प्रवेश राजवाडयांमुळे, निदान, त्यांच्या साक्षीने झाला. १९१० मधे राजवाडे व मेहेंदळे यांनी इतिहास सशोधक मंडळाची स्थापना केली त्यावेळी दत्तोपत हजर होते. प्रत्यक्ष सभासदत्व त्यांनी

आणखी दोन वर्षांनी पत्करले. आणखी दोन तीन वर्षांनी त्यांनी मंडळाची चिटणीशी पत्करली आणि पंचवीस वर्षे ते काम केले ! या अवधीत इतिहास क्षेत्राशी संबंधित अशी अनेक महत्त्वाची कामे त्यांनी केली. १९१९ मध्ये भारत सरकारने 'इंडियन हिस्टॉरिकल रेकॉर्डस् कमिशन' या संस्थेची स्थापना केली, १९२२ मध्ये पोतदार यांना सभासद म्हणून स्वीकृत करून घेण्यात आले आणि अखेरपर्यंत त्यांचा या कमिशनशी या ना त्या नात्याने संबंध राहिला. भारतीय वाङ्मय, भाषा, इतिहास यांच्या अभ्यासाला आणि संशोधनाला चालना देणारी 'प्राच्यविद्या' परिषद याचसुमारास सुरू झाली होती. या परिषदेतील विद्वान प्रामुख्याने प्राचीन कालखंडासंबंधीच विवेचन करतात हे हलके हलके स्पष्ट होऊ लागले. मध्ययुगीन आणि अर्वाचीन इतिहासाच्या अभ्यासकांसाठी एक स्वतंत्र पीठ असणे जरूर आहे अशी पोतदार यांची खात्री पटत गेली व त्यांनी १९३५ मध्ये "भारतीय इतिहास परिषदे"ची स्थापना केली. (All India History ongress). तिचे पहिले अधिवेशन पुण्यासच भा. इ. सं. मंडळातर्फे भरविण्यात आले होते. येथून पुढे या परिषदेची चाळीस अधिवेशने भरलेली आहेत. आणि निरनिराळ्या विषयांवर माहितीची व विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी प्रतिवर्षी देशाच्या निरनिराळ्या भागातले संशोधक, विद्वान किती मोठ्या संख्येने अधिवेशनाला जमतात हे पाहिले म्हणजे पोतदारांच्या कल्पनेच्या यशस्वितेची खात्रीच पटते. त्यांची इतिहास क्षेत्रातली ही मुलूखगिरी पाहूनच बहुधा उत्तर हिंदुस्थानातले अभ्यासक या अधिवेशांच्या वेळी पोतदारांचा उल्लेख "पेशवा आ गया" असा करीत ! पुढे ते महाराष्ट्र इतिहास परिषदेचेहि अध्यक्ष झाले होते.

परंतु या सर्व व्यापात त्यांचे लक्ष गुंतलेले असे ते भा.इ.सं. मंडळाशी. मेहेंदळे वाड्यातली जागा लहान लहान बैठकीला ठीक होती. पण पुढे मंडळाचे कार्यकत वाढू लागले आणि ते हरप्रकारचे संशोधन साहित्य जमवू लागले. ही जागा अपुरी आहे. हे स्पष्ट झाले. १९१७ मध्ये मंडळाच्या सध्याच्या जागेत एक लहानशी इमारत बांधून झाली. पुढे मूळ योजनेप्रमाणे मोठे सभागृहही बांधले. पण हे सगळे कर्जावर. या कर्जाचे व्याज आणि मुद्दल यांचा हिशोब कटकटीचा होत गेला. दत्तोपंतांनी हा सर्व भार वाहिला. एकदा काही गैरसमजाने त्यांच्या वैयक्तिक मिळकतीवर जप्ती येण्याचा प्रसंग उद्‌भवला पण तो टळला. डॉ. जस्टिन-इ-अँबट यांनी अमेरिकेतून मंडळासाठी ठेवलेल्या देणगीचे पन्नास हजार रूपये आल्यावर कर्जाचे निवारण करण्यात आले; नवे कर्ज उभारावयाचे नाही असा त्यावेळच्या कारभारी मंडळाने निर्णय केला व तो आजतागायत पाळला जात आहे. अर्थात तो भाग निराळा. महत्त्वाची गोष्ट अशी की मंडळाच्या उपजीविकेची जबाबदारी पोतदार यांनी स्वीकारली व फार कौशल्याने पार पाडली.

मराठी साहित्य परिषदेशी पोतदारांचा घनिष्ट संबंध होता, ते स्वतःच

' मी संमेलनाचा वारकरी आहे ' असे सांगत असत आणि १९३९ मधे अहमदनगर येथे भरलेल्या संमेलनाचे अध्यक्षही होते.

हिंदी – म्हणजे राष्ट्रभाषा – प्रचार हे राष्ट्रीय चळवळीचे अंग होते. स्वातंत्र्योत्तर काळात हिंदी हीच राष्ट्रभाषा होणार हे सर्वांनी मनोमन गृहीतच धरले होते. परंतु ती हिंदी म्हणजे अलाहाबाद हिंदी साहित्य संमेलनाला मान्य असलेली संस्कृतनिष्ठ हिंदी की वर्ध्याच्या समेलनाला ग्राह्य वाटणारी, म. गांधींनी पुरस्कारलेली, फारसी-अरबी शब्दांनी युक्त अशी हिंदुस्थानी हा मोठा वादविषय होता. मध्ययुगीन इतिहासाच्या वाचनाने पोतदार यांचा कल हिंदुस्थानीकडे झुकलेला होता व ते काही वर्षे ' हिंदुस्थानी बोर्डा 'चे सभासद होते. आणि नंतर त्यांनी सहविचारांच्या काही मंडळीसमवेत ' महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा ' स्थापन केली. तिचे ते बरीच वर्षे अध्यक्षही होते. याही सभेला दत्तोपंतानी वास्तु उभी करून दिली !

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे ते कुलगुरु होतेच. महाराष्ट्र विद्यापीठ निर्मितीच्या कार्यात त्यांनी मोठाच पुढाकार घेतलेला होता आणि त्यातून निर्माण झालेल्या पुणे विद्यापीठाचे ते कुलगुरूही झाले. बंद पडलेल्या डेक्कन कॉलेजच्या पुनरूज्जीवनास त्यांचा मोठाच हातभार लागला.

भारत शासनाने त्यांना ' महामहोपाध्याय ' ही पदवी देऊन १९४६ मधे आणि १९६७ मध्ये ' पद्मभूषण ' देऊन यथोचित असा गौरवही केला.

महाराष्ट्राच्या संस्था–जीवनाचा भार वहात असताना पोतदार यांचे वाचन चिंतन, लेखन यात कोठे खंड पडला नाही. त्यांचे बरेच लेखन स्फुट स्वरूपाचे आहे. पण त्याची संख्या व त्याचा आवाका मोठे आहेत. ' मराठी गद्याचा इंग्रजी अवतार ', ' ज्ञानप्रदीप ', ' मराठी इतिहास व इतिहास-संशोधन' आणि ' टिळकांचे सांगाती ' हीं मोठी पुस्तके. याशिवाय ' जयपूर-दर्शन ', ' वासंतिक-उपदेश ' अशा पुस्तिकांची संख्या फार मोठी आहे. १९१५ ते १९४२ या काळात ते मंडळाचे. चिटणीस असल्यामुळे या काळात मंडळातर्फे प्रसिद्ध झालेल्या प्रकाशनांचे संपादकत्व त्यांच्याकडेच जाते. यापैकी काहींना त्यांनी मोठ्या विवेचक प्रस्तावनाही लिहिल्या आहेत. त्यांनी वेळोवेळी केलेली भाषणे नोंदवून ठेवण्याची (रेकार्ड करण्याची) व्यवस्था झाली असती तर पुढच्या पिढ्यांना, त्यांच्या व्यासंगाचा, सूक्ष्म विवेचक बुद्धीचा लाभ मिळत राहिला असता इतकी ती महत्त्वाची असत.

पोतदार यांचा व माझा कित्येक वर्षांचा संबंध. त्यांच्या सार्वजनिक आयुष्याकडे आता मागे वळून पाहिले म्हणजे काही गोष्टी अधिक प्रकर्षाने जाणवू लागतात. त्यांच्या सामर्थ्याचा उलगडा होऊ लागतो पोतदारांना त्या त्या संस्थेची घटना उत्तम माहित असे, सभा-संचालनाचे कौशल्य त्यांना उत्तम प्रकारे साधले होते. त्यांची स्मृती विलक्षण होती आणि जवळपास शेवटपर्यंत तशी टिकून होती

सभेमध्ये ते पुष्कळदा एखाद्यावर खेकसत असत, पण लगेचच त्याच माणसाला काहीच झाले नाही अशा थाटात समजावून सांगत – म्हणजेच कोणतीहि चर्चा, वाद, तुटण्याइतके ताणावयाचे नाहीत हे सूत्र त्यांनी कायम पाळले होते. जास्तीत जास्त समन्वयाने ते काम साधीत असत, वादविवाद असत पण त्यांनी संघर्ष उभा राहू दिला नाही. त्यांच्या मनाची आणखी अशी एक ठेवण होती की प्रस्थापित शासनाशी शक्य तितके जुळवून घ्यावयाचे. संस्थेचा संसार चालविणाऱ्या माणसाला हे अवधान बाळगावेच लागते

दत्तो वामन यांनी उभ्या केलेल्या किंवा पालकत्व केलेल्या बहुतेक सर्व संस्था आज केवळ भक्कम पायावर उभ्या आहेत एवढेच नव्हे तर यशस्वीपणे वाटचाल करीत आहेत. त्यांचे आयुष्य सफल झाल्याची हीचमोठी साक्ष आहे !

पेशवाईतील एक आगळे व्यक्तिमत्व : हरिपंत फडके

मा. रा. कंटक

उत्तर पेशवाईंत राजकारण आणि समरांगण या दोन्ही क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाने चमकणाऱ्या पुरुषांत हरिपंत फडके याची प्रामुख्याने गणना होते. वस्तुतः हरिपंतापेक्षा पराक्रमी व मुत्सद्दी व्यक्ति पेशवाईंत अनेक होऊन गेल्या. परंतु हरिपंताचे वैशिष्ट्य हे त्याच्या राजकारणांत किंवा पराक्रमांत नसून, त्या राजकारणांला व पराक्रमाला जी नैतिक झालर होती, त्या दोन्हीच्या मागे जे नैतिक अधिष्ठान होते, त्यांत आहे. असे नैतिक अधिष्ठान असलेले पुरुष सबंध पेशवाईंत हाताच्या बोटावर मोजण्याइतके विरळा सांपडतात. या ठिकाणी नैतिक अधिष्ठान याचा अर्थ वैयक्तिक नीति हा नाही, तर वारांगने प्रमाणे असलेल्या राजनीतीतील डावपेच लढविणाऱ्या मुत्सद्याच्या ठिकाणीसुद्धा राज्यहिताच्या दृष्टीने जे नैतिक गुण असणे आवश्यक असते ते गुण, असा आहे. हे नैतिक गुण हरिपंताच्या अंगी कसे प्रकर्षाने वास करीत होते, हे प्रस्तुत लेखांत सोदाहरण दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

पुण्यांतील डेक्कन कॉलेजमध्ये नाना फडणीस याचे मेणवली दप्तर आहे. त्यांतील रुमाल ५४ व ८६ मध्ये सन १७७६ ते १७९० या काळांतील हरिपंताच्या राजकीय हालचालींवर प्रकाश टाकणारी हजाराहून अधिक कागदपत्रे आहेत. त्यांतील सुमारे पंधरावीस कागदपत्रे हरिपंताचे अंतरंग व त्याच्या स्वभावाचे काही पैलू उलगडून दाखविणारी आहेत. या पंधरावीस अप्रकाशित मोडी कागदपत्रावर[1] हा निबंध मुख्यत्वेकरून आधारलेला आहे.

हरिपंत हा नानाचा मुख्य आधार होता. नाना फडणीस हा अर्धा शहाणा समजला जातो. त्याच्या राहिलेल्या अर्ध्या शहाणपणाची कसर हरिपंताने भरून काढली. 'बाळाजीपंत नानास सगळा विसावा त्यांचा होता' असा हरिपंताच्या[2] मृत्यूनंतर नागपुरकर भोसल्यांच्या कारभाऱ्यानें अभिप्राय दिलेला आहे. खुद्द नानाने हरिपंतासंबंधी 'कोणताहि विचार करणे तो तुम्हासीच व पहिल्यापासून सर्व गोष्टीस माहीत तुम्ही' असे उद्‌गार आपल्या एका पत्रांत काढलेले आहेत. हे उद्‌गार हरिपंतानें ३ ऑक्टोबर १७८६ रोजीं नानाला लिहिलेल्या पत्रांत उद्‌धृत केलेले आहेत.[3] या उद्‌गारांवरून नानाला हरिपंताबद्दल केवढा विश्वास वाटत होता ते कळून येते. मेणवलीहून कुटुंबाला घेऊन यावे की नाही[4] यासारख्या किरकोळ गोष्टीपासून तो मोठमोठ्या राजकारणी मनसुब्यांबाबत हरिपंताचा सल्ला

नानाने विचारल्याची कित्येक पत्रें मेणवली दप्तरात आहेत. त्यावरून हरिपंत नानाचा मुख्य सल्लागार होता असे म्हटल्यास वावगे ठरूं नये.

हरिपंताला नानाच्या हृदयात जे स्थान मिळाले ते त्याच्या समकालीन दुसऱ्या कोणत्याही सरदाराला मिळाले नाही. याचे कारण, कोणतीही अपेक्षा न ठेवता हरिपंताने नानाच्या ठिकाणी जसे स्वतःला पूर्णपणें समर्पण केले होते तसे दुसरा कोणीच करूं शकला नाही. एका पत्रांत हरिपंत नानाला लिहितो, 'मजसारखे सेवक स्वामीस बहुत आहेत परंतु मजला येक स्वामी स्वाम राग भरतील तर भरोत परंतु मजला आपल्याखेरीज दैवत आहे की काय हे पुर्ते ध्यानात आणावे एक स्वामीचे अभयपत्र येत असले म्हणजे मोटा होतो राग भरून लिहिले म्हणजे शुष्क होतो.'[५] हे उद्‌गार म्हणजे केवळ शाब्दिक बुडबुडे नव्हते. बारभाई कारभार सुरू झाल्यापासून हरिपंताने नानाची प्रत्येक आज्ञा शिरसावंद्य मानून ती कार्यवाहीत आणण्याचा प्रयत्न प्रामाणिकपणे केला तो आपल्या मृत्यूपर्यंत. अखेरीस मरणापूर्वी दोन घटका नानाचे स्मरण करूनच त्याने प्राण सोडला.[६] 'स्व'ला पुसून टाकणारी (Self-effacement) इतकी अव्यभिचारी निष्ठा क्वचितच सापडते.

मात्र हरिपंताची नानाला वाहिलेली निष्ठा हा भोळेभाबडेपणाचा, बुद्धीला झापडे लावल्याचा किंवा नानाच्या दडपणाखाली वाकल्याचा प्रकार नव्हता. नानाशी ज्या वेळीं त्याचे मतभेद झाले किंवा नानाच्या वागण्यांत त्याला चूक दिसून आली त्या वेळीं अत्यंत निर्भीडपणे, नानाचा मुलाहिजा न ठेवता त्यानें आपले विचार व्यक्त केलेले आहेत. इंग्रज–मराठ्यांच्या पहिल्या युद्धाच्या वेळीं सन १७८१ च्या फेब्रुवारींत इंग्रज सेनापति गॉडर्ड जेव्हां बोरघाट चढून आला तेव्हां तो पुण्यावर चालून येणार अशी आवई उठली होती. त्याप्रमाणे तो पुण्याजवळ आल्यास पुणे जाळून टाकावे असे नानाचे मत होते. या सुमारास इंग्रजांतर्फे तहाचे बोलणेही सुरू होते. त्याचा फायदा घेऊन, इंग्रजांशी तह करून नानाला पुणे वाचवितां आले असते. परंतु १७७९–८० मध्ये निजाम–पेशवे–भोसले–हैदर यांचा एकजूटीचा तह (Quadruple Alliance) इंग्रजांविरुद्ध झालेला होता. तहांत ठरल्याप्रमाणें हैदरने इंग्रजांविरुद्ध प्रामाणिकपणें आक्रमण सुरू केलेले असल्याने, त्याच्या सल्ल्याखेरीज इंग्रजांशीं तह करणे नानाला शक्य नव्हते. हैदरला दुखविण्यास नाना तयार नव्हता. हरिपंताला नानाचे हे धोरण पसंत नव्हते. म्हणून ७ फेब्रुवारी १७८१ च्या पत्रात तो नानाला लिहितो. "इंग्रजाकडून सलुखाचा पैगाम लागला होता तो न करण्याचे कारण हैदरखानासी वचनप्रमाण जाल्यामुळे त्याचे सलेखेरीज करता येत नाही ही गोष्ट खरी वसई आदि करून स्थळे गेली चिंता नाही आता पुण्यास येणार तेव्हा आम्ही पुणे त्याचे दृष्टीस पडू देऊ नये हा आमच

इरादा त्यास तक्ताची जागा त्याचा नाश करून अपकीर्ति करून घ्यावी हे बरे किंवा समयानुरूप सलूक करून घेऊन संस्थान रक्षावे हैदरखानास साफ लिहावे की केवळ घरावर येऊन बेतली त्यापक्षी सलूक करणे प्राप्त . . . सर्वस्व जाऊ कसेही होऊ पुणे जलो परंतु हैदरखानाचे मसलतीशिवाय करावयाचे नाही असेच ठरल्यास मग श्रीसतेने घडेल ते घडो पूर्वी मोठेमोठे मनसुबेबाज जाले आहेत त्याणी समयात मतलब गाठला आहे "[७]

नाना–हरिपंतांच्या मतभेदांची आणखी एकदोन उदाहरणे देता येतील. चिंतो विठ्ठल रायरीकर हा कर्तृत्ववान सरदार राघोबाचा पक्षपाती होता. राघोबा व त्याच्या बाजूच्या लोकांवर नानाचा पहिल्यापासून दात. त्यांच्याबाबत कठोर धोरण स्वीकारावे या मताचा तो होता. एकदा चिंतो विठ्ठल राघोबाचा पक्ष सोडून नानाकडे आला. तो आपणाशी निष्ठेने वागेल की नाही हा नानाला संशय होता. त्याला काहीही काम न देता घरी बसवावे असे नानाला वाटत होते. नानाने पत्राने परिपंताचा सल्ला विचारला. हरिपंताने उत्तर दिले, " चिंतो विठ्ठल याची शफत सप्तशतीची पोथी हाती देऊन पुण्यात करून घेतली म्हणोन आज्ञा केली त्यास निखालसता करून घेतली मोठी गोष्ट जाहाली परंतु त्यास रिकामे ठेवू नये रिकामे माणूस असल्याने नाना प्रकारचे तर्क चालविते चिंतोपंत सर्व प्रकारे शाहाणे आहेत मायेत घेऊन कामही सांगत जावे म्हणजे ममतेने ममता वाढते दूसरेकडे माणूस पाहात नाही. "[८]

चिंतो विठ्ठलाप्रमाणेच विसाजी कृष्ण चिंचाळकर ऊर्फ बिनीवाले याचेही उदाहरण उल्लेखनीय आहे. विसाजीपंत बिनीवाले ही थोरले माधवराव पेशवे यांच्या कारकिर्दीतील एक कर्तबगार व्यक्ति होती. पानिपतच्या पराभवाचा वचपा काढण्यात रामचंद्र गणेश कानडे याच्याबरोबरीने त्याने उत्तर हिंदुस्थानातील मोहिमात मोठी कामगिरी बजावली होती. महादजी शिंदे व विसाजीपंत दोघांनी मिळून शाहअलम बादशहाला दिल्लीच्या तख्तावर बसविले होते. त्यामुळे थोरल्या माधवरावाची त्याच्यावर बहाल मर्जी होती. माधवरावाच्या मृत्यूनंतर विसाजी-पंताला वाईट दिवस आले. राघोबा–बारभाई संघर्षाच्या वेळी विसाजीपंताचा पाठिंबा मिळविण्यासाठी नाना आणि सखारामबापू यांनी त्याच्याकडून शपथ घेवविली, तसेच तुझे ऊर्जित करू असे त्याला आश्वासन दिले. त्या भरंवशावर विसाजीपंत व त्याचा मुलगा महिपतराव यांनी बारभाईंची बाजू घेतली. त्यामुळे राघोबाची त्यांच्यावर वक्रदृष्टि होऊन त्याने विसाजीपंताचे महाल काढून घेतले. त्यामुळे विसाजीपंत कर्जदार झाला. त्याचा उदरनिर्वाह नीट चालेना. त्याची इच्छा अशी होती की नाना व बापू यांनी आपल्याला आपल्या योग्यतेनुरूप काम सांगावे, तसेच राघोबाने जप्त केलेल्या महालाइतकी जहागीर दुसरीकडे कोठे तरी

त्यांनी आपल्याला द्यावी. दिलेल्या वचनाप्रमाणे विसाजीपंताची सोय लावणे नाना व बापू यांचे नैतिक कर्तव्य होते. पण दिलेले आश्वासन दोघेही विसरले. तेव्हा विसाजीपंताने हरिपंताकडे धाव घेतली व त्याला सर्व कथा सांगितली विसाजीपंतासारख्या मराठी राज्याची झटून सेवा केलेल्या मुरब्बी माणसावर अन्याय झालेला आहे ही हरिपंताची खात्री पटली.

लगेच हरिपंताने नाना व बापू या दोघा कारभाऱ्यास पत्र लिहिले की, "प्रथम यास वचनास गोविले' इकडे राहिल्यामुळे चिरंजीव[९] पेचात आले. पैका पडला पुढे स्वामीजवळ राहून चाकरी केली त्याचे माहाल गेले ... याची हिंदुस्थानात चाकरी सिरा जाहली आहे इनामाची विनंती आहे त्यास सर्वास असावे आणि यास नसावे असी चाकरी नाही... याची सोय काढावी...मोगलास माहाल दिल्हे त्याचे मुबदला देऊन संतोष राखावा स्वामी म्हणतील राहिले काय द्यावे काय तर वरकडाचे घेतले त्यास का दिल्हे यास का नाही प्रारंभापासून आपले लक्षात असे असता त्याचे विस्मरण नसावे सोय करून द्यावी विसाजीपंताप्रो मेहनत कोणी केली नाही पुढेही चाकरी करतील सरकारकार्यास अंतर नाही आपण उभयतानी विचार करून विसाजीपंताची चाकरी ध्यानात आणून विसाजीपंतास बरे वाटे असे करावे.'[१०] परखडपणा व दुसऱ्यावरील अन्यायाची चीड हे हरिपंताचे गुण दाखविण्यास हा उतारा पुरे.

हरिपंताने वेळोवेळी परखडपणे आपले मतभेद व्यक्त केले तरी नानाशी त्याचे संबंध कधीही दुरावले नाहीत, याचे श्रेय दोघानांही आहे. हरिपंताने कितीही विरोधी मत व्यक्त केले तरी त्यामागे मराठी राज्याच्या हिताचा प्रामाणिकपणे केलेला विचार आहे याची नानाला खात्री होती, उलट नानाशी कितीही वैचारिक मतभेद झाले तरी त्याच्या अंगी काही चांगले गुण आहेत व तो मराठी राज्याचा हितकर्ता आहे, ही हरिपंताची मनोधारणा होती. त्यामुळे नानाच्या बाबतीत पक्षांतर, निष्ठाबदल, बंडखोरी, असहकार यापैकी कोणताच मार्ग त्याने चोखाळला नाही. तसे त्याने केले असते तर मराठी राज्याच्या दुफळीत आणखी भर पडली असती. वैचारिक मतभेद असताना एखाद्या व्यक्तीबद्दलची निष्ठा कायम राखणे ही अत्यंत अवघड गोष्ट आहे. त्याहून अवघड गोष्ट म्हणजे स्वतःच्या सल्ल्याविरुद्ध दिलेल्या आज्ञांचे पालन करण्याची. सर्व राजकीय निर्णय घेण्याची जबाबदारी नानावर होती. प्रत्येक निर्णयाच्या वेळी हरिपंताचा सल्ला त्याने मानलाच असे नाही. तरीदेखील नानाची बरीवाईट कोणतीही आज्ञा पाळण्यात हरिपंताने कुचराई केली नाही. राज्यहिताकडे दृष्टी ठेवून इतके तंतोतंत आज्ञापालन करणारा पुरुष विरळाच.

वर चिंतो विठ्ठल आणि विसाजी कृष्ण यांची जी उदाहरणे दिलेली आहेत

त्यावरून, हरिपंताच्या अंगी राज्यहित साधावयासाठी लागणारा विधायक दृष्टिकोन कसा होता ते कळून येते. प्रत्येक व्यक्तीत दोष असणारच. पण ज्याला राज्यहित साधावयाचे आहे त्याने कर्तबगार व्यक्तीच्या दोषाकडे डोळेझाक करून त्याच्या गुणांवर भर देऊन त्या गुणांचा राज्याच्या कल्याणाच्या दृष्टीने उपयोग करून घेतला पाहिजे, ही हरिपंताची विचारसरणीं होती.

हरिपंताचा दृष्टिकोन विधायक असल्याने साहजिकच, जास्तीत जास्त लोकांना राजी राखून राज्य केले पाहिजे, हा त्याचा आग्रह होता. राखावी बहुतांची अंतरे हे रामदासी सूत्र डोळ्यासमोर ठेवून तो वागत असे. शक्य तितके कोणाचे मन न दुखविता जास्तीत जास्त लोकांना बरोबर घेऊन राजकारण साधावे हे हरिपंताचे तंत्र होते. आजच्या भाषेत बोलावयाचे तर हरिपंत हा लोकशाहीशी जुळणारी वृत्ती असलेला नेमस्त राजकारणी होता. नाना हरिपंताइतका नेमस्त नसल्याने त्याच्या सडेतोड वागण्यामुळे अनेकांची मने न कळत दुखावली जात. तुकोजी होळकर एकदा पुण्यास आलेला असताना नाना त्याच्या घरी जाऊन त्याला भेटला नाही. तुकोजीला वाटले की शिंद्याशी नानाची अधिक घसट असल्याने नाना आपल्याला भेटायला आला नाही. तो रुसून बसला. हरिपंताने तुकोजीचा रुसवा काढण्याचा प्रयत्न केला, पण व्यर्थ. शेवटी हरिपंताने नानास सल्ला दिला, "होळकराचे गोटास जाऊन घटकाभर बसून पुढे जावे त्याचे समाधान सरकारचे काम आपले स्नेहांस चांगले असे मनात आले याजकरिता लिहिले असे ही गोष्ट मर्जीस येणार नाही परंतु मोठ्या सरदाराचे मनोधारण होते याजकरता करावी.[११]

तुकोजी होळकराच्या बाबतीत घडली तशीच एक गोष्ट परशुरामभाऊ पटवर्धन याच्या बाबतीत घडली. एकदा हरिपंत व परशुरामभाऊ दोघे स्वारीवर होते. स्वारीत म्हणावे तसे यश आले नाही. उलट लढाईत परशुरामभाऊच्या सरंजामाची खूप नुकसानी झाली. त्यामुळे भाऊ खूप उदासीन झाला आणि त्याने नानाला आपली स्थिती वर्णन करणारे पत्र त्या अवस्थेत लिहिले. नानाकडून आपणाला सांत्वनपर उत्तेजन देणारे पत्र येईल ही त्याची अपेक्षा होती. नानाने भाऊला पत्र तर लिहिले नाहीच, उलट भाऊ उदासीन का याबद्दल हरिपंताला पत्र लिहून चौकशी केली. हरिपंताने नानाला उत्तर लिहिले, "भाऊचा प्रकार उदासीनतेचा तर आपले ठायी विश्वास व आपण या मनसुब्यात म्हणून तेही जीवाभ्य श्रम करतात सर्व प्रकारे सरंजामाची नुकसानी (त?) भाऊ सापडले एक आपले सुखावर फिरावे तर आपले पत्र समाधानाचे येईना त्याजवरून दिलगीर होऊन उदासीनतेने लिहीत गेले आम्ही आल्यावर शोध केला तो हे दुःख मोठे की मानामुळे आम्ही त्याची अनास्था दिसते तेंव्हा उमेद कोणाची त्याजवर मी खातरजमा केली आपलेही पत्र आले समाधान पावले हमेशा पत्र येत जावे.[१२]

तुकोजी होळकर आणि परशुरामभाऊ यांच्या बाबतीत घडलेल्या वरील प्रसंगावरून, अगदी क्षुल्लक वाटणाऱ्या बाबीतही हरिपंत मराठी राज्याच्या कल्याणाची काळजी कशी वहात होता ते दिसून येते. राज्याचे हितचिंतक असे जे निष्ठावंत सेवक त्यांना प्रसन्न राखले पाहिजे, त्यांची उपेक्षा होता नये, हा जुन्या राजनीतीतील नियम, तो नानाकडून मोडला जातांच हरिपंताने नानाला त्याची जाणीव करुन दिली. हरिपंत याप्रमाणे राज्यहितदक्षतेने वागत होता म्हणूनच राघोबाची पत्नी आनंदीबाई हिच्यासारख्या शत्रूपक्षांतील स्त्रीलादेखील त्याच्यासबंधी पुढील उद्‌गार काढावे लागले— "......त्याचे लक्ष दौलतरक्षणाकडे आहे त्यापक्षी दुसरे जाणत नाही चांगले आहे असे चाकर मिळणे कठिण आहे."[१३] इतक्या थोड्या शब्दांत आनंदीबाईने हरिपंताच्या जीवनाचे सूत्रच सांगितले आहे.

मराठी राज्याच्या हिताचा विचार करतांना हरिपंताने स्वार्थाचा यत्किंचित विचार केलेला दिसत नाही. शिंदे, होळकर, भोसले, पवार, गायकवाड, पटवर्धन हे उत्तर पेशवाईतील प्रमुख सरदार आपापल्या परीने मराठी राज्याची सेवा करीत होते. परंतु सत्ता, पैसा किंवा सरंजाम यांपैकी कशाचा तरी मोह त्यांपैकीं प्रत्येकाला होता. खुद्द नानादेखील सत्तेच्या लोभांतून सुटलेला नव्हता. शिंदे होळकरादि बहुतेक सर्व मराठे सरदार लहानमोठे सरंजाम किंवा जाहगिरी बाळगून होते. हरिपंत हा एकटाच असा दिसतो कीं तो मानाने सरदार असूनही प्रत्यक्षांत पेशव्यांचा हुजरांतीतील खाजगी सेवक होता. तो नानाला एका पत्रांत लिहितो, "मी फौजेत आहे हा वरकडासारिखा नव्हे केवळ आपला खाजगी ज्यात स्वामीचे कल्याण तेच करीन दुसरे होणार नाही."[१४]

उत्तर पेशवाईत अर्थव्यवस्थेतील दोषांमुळे सैनिक आणि गारदी यांनी त्यांची देणी देण्याबाबत घातलेल्या घेराओना बहुतेक सर्वच मराठे सरदारांना तोंड द्यावे लागलेले आहे. पण अशा घेराओशी दोन हात करण्याचे प्रसंग सर्वांत जास्त कोणावर आले असतील ते हरिपंतावर. याचे कारण, हरिपंत हा हुजरातीकडे असल्याने नोकरींत मिळणारा पगार आणि थोडीफार तैनात[१५] यांच्यावर त्याला गुजराण करावी लागे. इतर सरदार आपल्या सरंजामांतील उत्पन्नांतून सैनिकांची व गारद्यांची थकबाकी काही प्रमाणांत तरी फेडू शकत होते. बिचारा हरिपंत मात्र आपल्या अखेरीपर्यंत सदैव पैशासाठी नानाच्या विनवण्या करीत आणि सावकारांचे उंबरठे झिजवीत राहिला. याबद्दलची असंख्य पत्रें पेशवे दफ्तर, डेक्कन कॉलेज येथील संग्रहांतील कागदपत्रांतून तसेच ऐतिहासिक लेखसंग्रहाच्या खंडातून सापडतात. पण हरिपंताचे वैशिष्टच हे की फौजेच्या पैशासाठी त्याने असंख्य वेळा विनवण्या केल्या असतील, प्रसंगी लाचारीही पत्करली असेल, स्वतःसाठी मात्र त्याने

कोणापुढेच हात पसरले नाहीत. नानावर त्याचे इतके वजन होते की एखादा सरंजाम किंवा जाहगीर त्याला शब्द टाकताच मिळाली असती. पण हरिपंत त्या फंदांत कधीच पडला नाही.

स्वत:च्या बाबतीत हरिपंत जितका निर्लेप वृत्तीचा होता तितकाच आपल्या नातेवाइकांच्या बाबतींतही होता. आपल्या मुलांसाठी त्याने कधी नानाजवळ शब्द टाकला नाही किंवा आपले वजन खर्च केले नाही. उलट सन १७८३ मध्ये नानाने हरिपंताचा मोठा मुलगा चिंतामण ऊर्फ दाजीबा याला अहमदाबादचा सुभा सांगावा असे ठरविले तेव्हां हरिपंताने ते काम न स्वीकारण्याचा सल्ला दाजिबाला दिला.हरिपंताला आपल्या मुलाच्या कुवतीचा अंदाज होता. दाजीबा मात्र रुष्ट झाला. पुढील वर्षी म्हणजे सन १७८४ मध्यें नानानें दाजिबाला झाशी तालुक्याची मामलत सांगण्याचे ठरविले. या काळांत झाशी तालुक्यातील कमाविसदारांची वृत्ति बहकलेली असून तेथील कारभार विस्कळीत झालेला होता. तो सुधारण्याच्या दृष्टीने सन १७८३ मध्ये बाबुराव भास्कर या नावाच्या माणसाला नानानें झाशीच्या मामलतीवर नेमले होते. बाबूराव भास्कर हा जुना, भरवशाचा मनुष्य. तो झाशीचा कारभार सुधारेल ही नानाची अपेक्षा. पण झाले नेमके उलटे. झाशीच्या वार्षिक उत्पन्नांतील भाग म्हणून पन्नास हजार रुपये पाठवून द्यावे असा करार ठरला असताना बाबुराव भास्कराने पाठविले पंधरा हजार रुपये! झाशी तालुक्यातील गैरव्यवस्था तो नाहीशी करू शकला नाही. तेव्हा नानाने दाजिबाला तेथील मामलत सांगण्याचे ठरविले. दाजिबा तरुण रक्ताचा असल्याने त्यासही मोठी उमेद की आपण धन्याची मोठी कामगिरी एकदम करून दाखवून त्याची मर्जी संपादन करू. नानाने हरिपंताला दाजिबाबाबतचा आपला बेत कळविला. दाजीबा हा प्रकृतीने अशक्त तसेच अननुभवी. झाशी तालुक्यातील गोंधळ नाहीसा करण्याचे कजाखीचे काम त्याला एकदम झेपणार नाही हे हरिपंताने ओळखले. त्याने नानाला लिहिले, "माझे मत याणी स्वामीजवळ असावे स्वामीनी लहानमोठी कामे सांगावी याणी करावी युद्धगिरी करून खावंदाची मर्जी प्रसन्न करून घ्यावी दोनच्यार कामात निभावणीसी दिल्यास आणखी च्यार मातबर कामे सांगावी मग कर्तेपण आहे तर जितके सेवकाने ओझे घेतले तितका खावंदास संतोष आहे परंतु ते प्रकार याचे ध्यानात येत नाही मातबर मामलत सुभा करावा बाहेर जावे बंदोबस्त करावा यात धण्यास रिझवावे हेच कल्प चालतात." यावरून हरिपंत प्रत्येक गोष्टीचा राज्याच्या हिताच्या दृष्टीने कसा विचार करीत असे ते दिसून येते. नानाची इच्छा असूनदेखील आपल्या मुलाला एकदम वरच्या जाग्यावर नेऊन बसवायला तो तयार नव्हता. आपल्या मुलाने क्रमाक्रमाने आपले कर्तुत्व अधिकाधिक प्रगट करून मग मोठ्या पदावर पोहोचल्यास त्याची हरकत नव्हती. म्हणजे मराठी

राज्याच्या हिताच्या दृष्टीने नात्यागोत्याचा विचार न करता तो गुणवत्तेचा विचार करीत होता, आणि त्या कसोटीतून प्रत्यक्ष आपल्या मुलालाही बगळू इच्छीत नव्हता. इतका प्रामाणिक व सर्वांना समान लेखणारा पुरुष हरिपंताच्या काळांतच काय, आजच्या काळांतही दुर्मिळच आहे. आपल्या विचारसरणीस अनुसरून हरिपंताने नानाला कळविले कीं, प्रथम चांगला कर्तृत्ववान व अनुभवी माणूस झांशीच्या बंदोबस्तास पाठवावा आणि तेथील सर्व स्थिरस्थावर झाल्यावर मगच दाजिबाला पाठवावे.[१७] पुढे नानानेच दाजिबासंबंधींची योजना सोडून दिली तो भाग वेगळा.

राज्यहितापुढें हरिपंत नातींगोतीं कशीं दुय्यम समजत असे यावद्दलचा आणखी एक प्रसंग सांगण्यासारखा आहे. त्याचा पुतण्या मोरो बापूजी याच्याकडे सुवर्णदुर्ग तालुक्याची मामलत होती.[१८] तोतयाच्या बंडाच्या वेळीं सुवर्णदुर्ग किल्ला मोरो बापूजीनें तोतयाच्या स्वाधीन केला व तो तोतयाला जाऊन मिळाला. आपल्याच घराण्यांतील एक मनुष्य मराठी राज्याच्या शत्रूला जाऊन मिळाला हे पाहून हरिपंताच्या हृदयाला किती घरे पडली असतील! पुढें मोरो बापूजीला आपल्या कृत्याचा पश्चात्ताप झाला. हरिपंताने आपल्या वतीनें नानाकडे क्षमायाचना करावी अशी त्याची इच्छा होती. पण हरिपंतानें क्षमायाचनेचा एक शब्दही न लिहिता मोरो बापूजीसंबंधींचा निर्णय नानावर सोपविला. या संबंधांत तो नानाला लिहितो, ‘ चिरंजीवापासून अंतर पडले इतराजीत आले मामलत सोडावी तर फाजील गुंतले कोणता इलाज...चिरंजीवाचे मानस अंतर पडले खरे परंतु आम्हावर दुसरा कृपा करणार कोण मी विनंति करावी तर कोणत्या तोंडाने करावी याजकरिता न वोलिलो.’[१९]

विचार करण्यासारखी गोष्ट म्हणजे जो हरिपंत आपली मुले व इतर नातेवाईक यांच्यासाठीं नानाकडे शब्द टाकावयास तयार नसे तो मराठी राज्यासाठीं उपयुक्त कामगिरी करणारे आपले सेवक आणि सहकारी यांच्यासाठी मात्र आपले सर्व वजन खर्च करण्यास मागेपुढे पहात नसे. आपाजीराव पाटणकर दरेकर, दारकोजी निंबाळकर वगैरे हरिपंताच्या पथकदारांनी हरिपंताला फार मदत केली होती. त्यांचा नालबंदीचा ऐवज सरकारांतून द्यावयाचा राहिलेला होता. तो त्यांची सेवा पाहून त्यांना लवकर द्यावा अशी विनंति करतांना हरिपंत आपल्या वैशिष्ट्यपूर्ण भाषेत नानाला लिहितो, ‘ माणूस मनापासून जपते त्याजवर लोभ करून त्याचे कार्य करावे लोकाचा भरणा चांगला उपयोग फार याजकरिता विनंति लिहिली आहे.[२०] पिलाजी जाधवराव याचा नातू जोत्याजी जाधवराव यांचे हरिपंताला खूप साहाय्य झालेले होते. त्याची आर्थिक स्थिती बिघडलेली असून त्याला खूप कर्ज झालेले होते. त्याला आर्थिक मदत करण्याबद्दल हरिपंताने नानाला विनंति

केली.[२१] अशाच तऱ्हेची विनंतिपत्रे वेदशास्त्रसंपन्न जयराम जोशी, बळवंतराव लिमये वगैरे व्यक्तींबाबत हरिपंताने लिहिलेली मेणवली दपतरात उपलब्ध आहेत.[२२]

नानाच्या चुका दाखवितांना किंवा त्याच्याशी मतभेद व्यक्त करताना हरिपंत जितका निर्भीड व परखड होता तितकाच स्वतःच्या चुका कबूल करण्यात तो प्रांजल आणि लीन होता. किती राजकारणी माणसे स्वतःच्या चुका कबूल करतांना आढळतील? चुका कबूल करण्याचे राहो, त्यांचे खापर दुसऱ्याच्या माथी फोडण्याचा प्रयत्नच बहुतेक राजकारणी करीत असतात. हरिपंत याला अपवाद आहे. सन १७७६ चा प्रसंग. त्या सालाच्या मध्यास हरिपंताचे सैन्य बारभाईच्या वतीने गुजराथमध्ये राघोबाचा पाठलाग करीत होते. त्या वेळी राघोबाने हरिपंताकडे तहाचे बोलणेंही लावले होते. रामचंद्रबावा सुखटणकर याचा मुलगा सदाशिव रामचंद्र, मानाजी शिंदे ऊर्फ मानाजी फाकडा व सखाराम हरि गुप्ते हे राघोबाचे मुख्य साहाय्यकर्ते होते. हे तिघे कर्तबगार तितकेच उपद्व्यापी होते. ते राघोबाच्या पक्षात राहिले तरी त्रास देणार किंवा स्वतंत्रपणे दुसरीकडे गेले तरी बखेडे माजविणार. म्हणून हरिपंताने वाटाघाटींनी गोड बोलून त्यांना आपल्या बाजूला वळवून घेतले.[२३] या वाटाघाटीच्या वेळी सदाशिव रामचंद्र याला हरिपंताने तुमचे चालवू असे आश्वासन दिले. आपली ही कामगिरी हरिपंताने नानाला कळविली. पण नाना खूष होण्याऐवजी गरम झाला. त्याने हरिपंताला लिहिले, '(तुम्ही) सदाशिव रामचंद्र याजविसी लिहिले होते. त्यास ते अपराधी सिवाजी कानोचे घरी दस्तऐवज सापडले असता तुम्ही त्याचे चालवावे म्हणोन करार केलात यावरून तुमचे बुद्धीची तारीफ काय करावी तुम्ही मसलत मारून आला आह्मा सोय जरूर करावी पत्र पाहाताच हातापायाची आग जाली इंग्रजाचे तहाकरिता.[२४] काय श्रम पडले खर्च किती आला असे असता याचे काय तटले होते त्यास दर्शनास आणावयास प्रयोजन नाही...खर्चाचे तरतुदीविसी लि ।। त्यास तुम्ही मेत आहा पैका मेलवाल फौज दूर कराल आमचे वेद हारपले यावउपरी लिहू नये.'[२५]

वरीलप्रमाणे नानाने उपरोधिक व कठोर वाक्प्रहार केलेले असताना, हरिपंताच्या जागी दुसरा कोणी असता तर तो खचून नाउमेद तरी झाला असता किंवा त्याचे माथे तरी भडकले असते. हरिपंताच्या मनाचा तोल मात्र बिलकुल ढळला नाही. आपल्या ८ जून १७७६ च्या पत्रात त्याने नानाला लिहिले, 'स्वामींनी इंग्रजाचा तह केला असता सदाशिव रामचंद्र यास तुमचे चालवू म्हणून करार करून आणावे ही गोष्ट स्वामीचे लिहिल्यावरून मजकडे बेवकुफी आली खरी परंतु इतका बेवकूफ स्वामीची मर्जी बिघडावयाजोगा मी नाही फार स्वामीस भितो येथे प्रसंग पडला तेव्हा सदाशिव रामचंद्र मानाजी शिंदे सखाराम हरि यास त्यातून काढल्याखेरीज गोष्ट सेवटास जात नाही हे तेथे राहून आणखी

महिना पंधरा दिवस लांबविले अगर कोणीकडे निघोन गेले तर फिरोन पेच असे जाणून सर्वांचे विचार जाले म्हणून केले येविसीचे विस्तार स्वामीचे पाय दृष्टीस पडल्यावर सविस्तर विनंती करीन ...... सदासिव बाबा एकटे अपराधी आसी सूचना आली असती तर अशा कर्मांत न पडतो व थोर मसलत विघडली तर संभाळणे कठिण असे जाणून आणावयाचे केले हे माझे लिहिण्याने ध्यानात येणार नाही समक्ष विनंति केल्यावर कदाचित मनात येईल इतराजी न करावी लोकांचे बखेड्यापासून सुटलो तर दर्शनास येतो येक वेळ पाय दृष्टीस पडल्यावर मर्जीस येईल तसे शासन करावे लौकिक मात्र न करावा मसलत मारिली मोठ्या योग्यतेस (गे)लो हे माझे गावीच नाही स्वामीचा शागिर्द इतकी योग्यता मानली तर आहे.' [२६] हरिपंतासारखा सरदार स्वतःला स्वामीचा शागिर्द म्हणवितो यातच त्याच्या लीनतेची पराकाष्ठा दिसून येते. स्वतःची चूक कबूल करण्याचा प्रांजलपणा, तसेच चूक झाली तरी तिच्यामागे राज्यहिताचा विचार कसा होता हे सांगताना दिसून येणारी वृत्तीतील व शब्दांतील शालीनता, हे हरिपंताचे गुण किती राजकारणी लोकात आढळून येतील? ज्याची बुद्धि परिपक्व व सुसंस्कृत आहे त्याच्याच ठायी हे गुण असू शकतात.

मागे पुतण्याने क्षमायाचना करण्याचा प्रसंग हरिपंतावर आणला तसाच प्रसंग त्याच्या मुलानेही आणला. तुमचा मुलगा चढेलपणाने वागतो असे नानाने हरिपंताला एका पत्रात लिहिले. त्यावर हरिपंताचे नानाला गेलेले उत्तर विचार करण्यासारखे आहे. तो लिहितो, 'मुलाचा चढी लागण्याचा प्रकार तर ही चुकी मजकडे खरी परंतु वस्तुगत्या मनास आणिले तर मी जन्मापासून मुलास सिकवावे सांगावे या प्रकर्णात पडलो नाही वडील होते मजलाच आपले लेकरूपण वाटत होते यास को(ण?)च्याने उपदेश मजकडून जाला नाही येक स्वामीची चाकरी मात्र केली दुसरे काही पाहिले नाही आता संसारात वडील मीच जाहलो आता मुलानी चांगले असावे असे मनात येते परंतु पहिली सिक्षा नाही यामुळे ठीक पडत नाही तथापि स्वामीनी चांगले म्हणावे कृपा करावी म्हणून उपदेशही केला परंतु त्याचे दैवी नाही त्यास मी काय करू त्यास दुःखाची जात ठावकी नाही चाकरी कसी करावी, मर्जी कसी राखावी लोक चांगले वाईट कशाने म्हणतात हे समजत नाही.' [२७] हरिपंताने मुलाच्या वागणुकीचे समर्थन केले नाही किंवा त्याला दोषही दिला नाही. पिता या नात्याने आपल्या कर्तव्यात आपण कसे चुकलो हे स्पष्ट करून मुलाच्या चुकीची जबाबदारी त्याने स्वतःच्या शिरावर घेतली. प्रांजलपणाचे याहून अधिक चांगले उदाहरण शोधून तरी सापडेल काय?

इंग्रज-मराठ्यांच्या पहिल्या युद्धाच्या वेळी इंग्रज सेनापति गॉडर्ड जेव्हा बोरघाटाकडे निघाला तेव्हां त्याने घाट चढून वर येऊं नये म्हणून बापू पानसे व

भवानी शिवराम यांनी मोर्चे उभारून घाटबंदी केली. त्या वेळी तुकोजी होळकर व हरिपंत घाटावर होते. हरिपंताने ती पाहिली. ती पक्की नसल्याचा आपला अभिप्राय त्यांने नानाला कळविला.[२८] ती भक्कम करण्याचा कोणताच प्रयत्न मात्र त्याने केला नाही. परिणामी गॉडर्ड व त्याचे सैन्य काहीही नुकसान न पोहोचता लीलया घाट चढून वर आले. त्यामुळे नाना इतका रागावला की त्याने हरिपंत व तुकोजी यांना जाब विचारला. तुकोजीला दोष न देता हरिपंताने स्वतःची चूक मोकळेपणाने कबूल केली[२९] यांत त्याचे नैतिक धैर्य दिसून येते.

वरील सर्व विवेचनावरून दिसून येईल की हरिपंत हा खऱ्या अर्थाने मराठी राज्याचा निष्काम सेवक होता. राज्यहितैकदृष्टि, निःस्वार्थीपणा, निर्भिडपणा, गुणग्राहकता, लोकसंग्रहाची वृत्ति व प्रांजलपणा इत्यादि अनेक दुर्मिळ गुणांचा त्याच्या ठिकाणी संगम झालेला होता. या त्याच्या नैतिक गुणांमुळेच इतर सम-कालीनांपेक्षां त्याचे व्यक्तित्मत्व वेगळेपणाने उठून दिसते. सेनानायकत्व व मुत्सद्दी-पणा यांत हरिपंतापेक्षा वरचढ पुरुष मराठेशाहीत अनेक होऊन गेले. पण नैतिक गुणांत त्याची बरोबरी करणारे विरळाच.

याचा अर्थ असा नव्हे की हरिपंत सर्वगुणसंपन्न होता. राज्यहितासाठी प्रसंगी कठोर निर्णय घ्यावयास लागणारा कणखरपणा, शिस्त, जरब वगैरे गुणांचा त्याचा ठिकाणी अभाव होता. क्वचित सौम्यपणाचा अतिरेक त्याच्याकडून झालेला दिसतो. हरिपंताचे दोष दाखवितांना रियासतकार सरदेसाई यांनी म्हटले आहे, 'तो नानाचा मिंधा असून स्वतंत्र[३०] बुद्धीने इतरांवर वचक बसविण्याचे त्यास सामर्थ्य किंवा कसब नव्हते. सरदेसायांची ही टीका म्हणजे पूर्ण सत्य नसून अर्ध-सत्य आहे. इतरांवर वचक बसविण्याचे सामर्थ्य हरिपंताजवळ नव्हते हे खरे. पण तो नानाचा मिंधा होता असे म्हणणे नुसते चुकीचेच नव्हे तर हरिपंतावर अन्याय करणारे आहे. कोणत्याही व्यक्तीचे मूल्यमापन करतांना तिचा जीवनविषयक दृष्टिकोन व त्याला अनुसरून निरनिराळ्या प्रसंगी असलेले तिचे वागणे लक्षात घ्यावे लागते. राज्यहितासाठी स्वार्थ विसरल्यामुळे हरिपंताच्या ठिकाणी लीनता आलेली होती. पण ही लीनता म्हणजे दीनता नव्हे. हरिपत हा काही नानाच्या वशिल्याने वर चढलेला नव्हता. स्वतःचे गुण व कर्तृत्व यांच्या जोरावर तो पुढे आला. निरपेक्षवृत्तीमुळे नानाकडे कधीच कशाची त्याने याचना केली नाही, किंवा नानाची हाजी हाजीही केली नाही. मिंधा मनुष्य हा निर्भीडपणे कधीच वागू शकत नाही. हरिपंताने निर्भीडपणा किती तरी वेळा दाखविलेला आहे. नानाची प्रत्येक आज्ञा तो पाळत होता याच्या मागे विचारपूर्वक स्वीकारलेली निष्ठा होती. ती निष्ठा कदाचित बरोबर किंवा चुकीची असेल, पण तिला मिंधेपणा कधीच म्हणता येणार नाही. नानाने हरिपंताला दिलेली वागणूक सदैव सन्मानाचीच होती. मिंध्या

माणसाला असा आदर मिळू शकत नाही.

सर्वसामान्यपणे राज्य किंवा राष्ट्र यांचे सामर्थ्य द्रव्यबल आणि सैन्यबल यांच्याकडे पाहून मापले जाते. तथापि द्रव्यबळ आणि सैन्यबळ यांना नैतिक बळाचा पाया नसेल तर राज्य किंवा राष्ट्र टिकू शकत नाही हे इतिहासांत अनेक वेळा दिसून आलेले आहे. कोणत्याहि राज्याची अधोगति सुरू होण्यापूर्वी त्याचा नैतिक पाया ढासळण्यास सुरुवात होते. थोरल्या माधवरावाच्या मृत्यूनंतर मराठेशाहीचा उरलासुरला नैतिक पाया ढासळण्यास सुरुवात झालेली होती. अशा काळांत हरिपंतासारखा पुरुष आपल्या नैतिक गुणांनी चमकला हे विशेष. हे त्याचे गुण पेशवाईच्या अखेरीच्या राज्यकर्त्यांच्या व सरदारांच्या अंगी असते, तर मराठेशाही इंग्रजांच्या घशांत सुखासुखी जाती ना !

टीपा

१. इतिहाससंशोधक कै. त्र्यं. शं. शेजवलकर यांनी या कागदपत्रांपैकीं चार-पाच पत्रांचा उपयोग करून इंडियन हिस्टॉरिकल रेकॉर्डस् कमिशनच्या सन १९४६ च्या २३ व्या खंडात 'Haripant Phadke – The Man He Was' या शीर्षकाचा लेख प्रकाशित केलेला आहे. मात्र हरिपंताच्या स्वभावाचे वर्णन करताना ते फार तपशीलात शिरलेले नाहीत.

२. ऐतिहासिक टिपणे, १.१७, लेखांक , पृ २५.

३. डेक्कन कॉलेज ऐतिहासिक संग्रह, रु. ५४, फा. १, पत्र क्र. ६५२.

४. डे. कॉ. ऐ. सं., रु. ५४, फा. १, पत्र क्र. ६७०.

५. कित्ता, रु. ८६, फा. १, पत्र क्र. ३९.

६. ऐतिहासिक टिपणे, १.१७, ले. २, पृ. २४.

७. डे. कॉ. ऐ. सं. रु. ५४, फां. १, पत्र क्र. ४९५.

८. कित्ता, रु. ५४, फा. १, पत्र क्र. ८४.

९. विसाजीपंत बिनीवाले याचा मुलगा महिपतराव.

१०. ठे. कॉ. ऐ. सं. रु. ८६, फा. १, पत्र क्र. ८३–८४.

११. कित्ता, रु. ८६, फा. १ पत्र क्र. १२३.

१२. कित्ता, रु. ५४, फा. १, पत्र क्र. ७६.

१३. पे. द. खंड ४, पत्र क्र. ५२, पृ. ५७.

१४. डे. कॉ. ऐ. सं., रु. ५४, फा. १, मत्र क्र. ७६.

१५. पे, द. खंड ४४, पृ. ७९.

१६. डे. कॉ. ऐ. सं., र. ५४. फा. १, पत्र क्र. २११–१२–१३.

१७. कित्ता.

१८. भा. इ. सं. मं. त्रैमासिक, वर्ष १६, अंक १, पृ. २७.

१९. ड. कॉ. ऐ. सं., रु. ५४, फा. १, पत्र क्र. ७६.
२०. कित्ता, रु. ५४, फा. १, पत्र क्र. ५२.
२१. कित्ता, रु. ५४, फा. १, पत्र क्र. २२.
२२. कित्ता, रु. ५४, फा. १, पत्र क्र. २८२ व ३४३.
२३. मराठी रियासत, उत्तर विभाग १ (१९२९), पृ. ६४.
२४. कर्नल अप्टन याच्यामार्फत घडून आलेला मार्च १७७६ चा पुरंदरचा तह.
२५. डे. कॉ. ऐ. सं., रु. ५४, फा. १, पत्र क्र. ६२५.
२६. कित्ता.
२७. कित्ता.
२८. डे. कॉ. ऐ. सं., रु. ५४, फा. १, पत्र क्र. ४६६.
२९. ऐ. ले. सं. भाग ७ वा, क्र. २५८५, पृ. ३५८५.
३०. मराठी रियासत, उत्तर विभाग २, १९२९, पृ. २७०.

राजवाडे आणि रामदास

मु. श्री. कानडे

इतिहासाचार्य राजवाडे यांनी 'रामदास' हा आपला निबंध कै. विजापूरकर यांच्या ग्रंथमाला मासिकात १९०२ मध्ये प्रथम प्रकाशित केला. या निबंधात त्यांनी रामदासांच्या कार्याचे आणि वाङ्मयाचे वेगळेपण आपल्या जोरकस भाषेमध्ये प्रथमतः मांडले. पुढेही मराठ्यांच्या इतिहासाची साधने प्रसिद्ध करताना, त्यांनी आपल्या प्रस्तावनांतून रामदासांच्या कामगिरीचे महत्त्व वारंवार प्रतिपादन केले. राजवाड्यांच्या मनावर रामदासांच्या जीवनाचा आणि विचारांचा फार मोठा प्रभाव पडलेला दिसून येतो. समाजाच्या सर्वांगीण उन्नतीची अहर्निश चिंता, त्यासाठी आपले सर्व आयुष्य खर्ची टाकण्याची वृत्ती आणि जे सांगायचे ते परखड शब्दात सांगण्याची भाषापद्धती या दृष्टींनी रामदास आणि राजवाडे यांच्यात विलक्षण साम्य आपल्याला जाढळून येते. यामुळेच इतिहासविषयक विवेचन करताना राजवाड्यांनी रामदासांचा आणि त्यांच्या वाङ्मयीन वैशिष्ट्यांचा पुन्हा पुन्हा निर्देश केलेला आढळतो.

त्यांनी रामदासांच्यासबंधी अनेक अंगांनी आणि फार बारकाईने विचार केलेला आहे. राजवाड्यांच्या व्यासंगाचा चौफेरपणा आणि त्यांच्या विचारसरणीतील भेदकता यांचा उत्कृष्ट प्रत्यय त्याच्या रामदास या निबंधातून वारंवार येतो. मानवसमाजाच्या हजारो वर्षांच्या धडपडीचा इतिहास सांगणाऱ्या ज्या वेगवेगळ्या चार पद्धती आहेत, त्यांची कल्पना देऊन राजवाड्यांनी, त्यांपैकी चौथ्या म्हणजे Psycholoical किंवा Philosophical या पद्धतीचा स्वीकार, रामदासांनी आपल्या दासबोधात केलेला असल्याचे दाखविले आहे. आणि या आत्मिक (तात्विक किंवा वैवेचिक) पद्धतीमधील जी वैशिष्ट्ये आहेत त्यांचे हेगेल या तत्वज्ञाच्या विचारांशी बऱ्याच प्रमाणात साम्य असल्याचे मत राजवाड्यांनी आग्रहाने मांडले आहे, त्यावरून राजवाड्यांच्या तत्वज्ञानविषयक अभ्यासाची कल्पना येते.

महाराष्ट्र-कवीत सर्व कवी भक्तिमार्गी आहेत, युरोपियन कवीत भक्तिमार्गी कवी नाहीत असा अभिप्राय संतवाङ्मयाचे गाढे अभ्यासक कै. ल. रा. पांगारकर यांनी व्यक्त केला होता. राजवाड्यांना हा अभिप्राय मान्य नव्हता, म्हणून त्यांनी अनेक पाश्चात्य ललितकृतींचा निर्देश करून 'उदात्त भावनांचा उदय करून, व मलिन उपाधींचे कोश फोडून जीवाला शिवाची ओळख देणारी काव्येही या

सारस्वतात थोडी नाहीत असा आपला निष्कर्ष काढला आहे आणि त्याच्या प्रित्यर्थ शेक्सपिअर, गेटी, शिलर, रामीन, ह्यूगो, टेनिसन, मिल्टन अशा अनेक कवींची आणि नाटककारांची उदाहरणे दिली आहेत. राजवाड्यांच्या पूर्वायुष्यातील व्यसंगाची, ही फारशी प्रकाशात न आलेली बाजू विशेष लक्षणीय आहे.

अशा प्रकारची पाश्चात्य लेखकांशी वेगवेगळ्या दृष्टींनी राजवाड्यांनी जी तुलना केली आहे तिच्या खोलात न शिरता त्यांच्या लेखनातील रामदासविषयक अन्य विचारांचाच परामर्श घेणे हे प्रस्तुत निबंधाचे उद्दिष्ट आहे.

'रामदास' या निबंधाच्या प्रारंभी राजवाड्यांनी रामदासांच्या एकंदर कविता–संग्रहाचेच तोपर्यंत कोणकोणत्या प्रकाशकांनी प्रकाशन केले होते याचा आढावा घेऊन त्यातील त्रुटी दाखवून दिल्या आहेत. त्यानंतरच्या काळात धुळ्याच्या सत्कार्योत्तेजक सभेने, विशेषतः कै. शंकर श्रीकृष्ण देव यांच्या अखंड खटपटीमुळे रामदासांची बहुतेक कविता छापून काढली. पण त्या कवितेच्या बाबतीतही पाठचिकित्साशास्त्राला धरून संपादन करण्याचे प्रयत्न न झाल्यामुळे राजवाड्यांना ह्या काळात ज्या उणीवा जाणवलेल्या होत्या त्या अद्यापीही फारशा दूर झालेल्या नाहीत. कै. देवांनी प्रसिद्ध केलेला दासबोध, खुद्द कल्याण स्वामींच्या हातच्या डोमगाव येथील प्रतीवरून सिद्ध केलेला असूनही निर्दोष व पाठशुद्ध आवृत्तीच्या कसोटीला उतरू शकत नाही.

दासबोधातील विचारांची पहाणी करण्यापूर्वी राजवाड्यांनी दासबोधाच्या लेखनकालाची चर्चा केली आहे. त्यांच्या मते 'दासबोध हा ग्रंथ दहा पंधरा वर्षे बनत बनत शके १५८१ त म्हणजे इ. स. १६६० त संपूर्ण झाला !' त्याला त्यांनी काही आधारही दिले आहेत, पण हे आधार निस्संदिग्ध स्वरूपाचे नाहीत. दासबोधाच्या ६ व्या दशकातील चौथ्या समासाचे लेखन शक १५८१ मध्ये झाले एवढाच निश्चित असा अंतर्गत उल्लेख दासबोधात सापडतो.

च्यारी सहस्र सातशे साटी। इतुकी कलयुगाची राहाटी।
उरल्या कलियुगाची गोष्टी। ऐसी असे।: १६-४-७

पण हाच दासबोधाचा समाप्तीकाल होता असे स्वतः रामदासांनी कोठेही म्हटलेले नाही. उलट दासबोधाचा वीस दशकी पूर्णावतार सिद्ध झाल्यावर दोनच महिन्यांनी रामदासांनी आपला अवतार संपविला असे समर्थशिष्य भीमस्वामी यांनी म्हटले आहे. हनुमंतस्वामींच्या नावावर जी बखर आहे तीतही रामदासांनी देह ठेवण्यापूर्वी दोन महिने म्हणजे शक १६०३ च्या मार्गशीर्षात ग्रंथराजाची समाप्ती झाली असा उल्लेख आहे. या महत्त्वाच्या प्रतिकूल आधारामुळे 'तिशी-पस्तिशीच्या भरजवानीत असताना, समर्थांनी ह्या ग्रंथास प्रारंभ केला आणि पन्नाशीच्या पोक्त अशा अनुभवपूर्ण आमदानीत त्याची समाप्ती केली' हा राज-

वाडयांचा अभिप्राय मान्य करता येणार नाही.

'काव्यग्रंथ' या दृष्टीने दासबोधाचे स्वरूप कशा प्रकारचे आहे या संबंधात राजवाडयांनी जे विवेचन केले आहे ते त्यांच्या मार्मिकतेचे एक उत्कृष्ट उदाहरण म्हणून सांगता येईल. रामदासांनीच काव्याची जी व्याख्या केली आहे तिचाच आधार घेऊन राजवाडे म्हणतात की केवळ वैचारिक प्रतिपादनाच्या दृष्टीने दासबोध ग्रंथ प्रतिभासंपन्न असला तरी आधुनिक परिभाषेत आपण ज्याला काव्य म्हणतो तसा तो नाही. कारण, 'संसारातील कोणता तरी एक विषय घेऊन तो नवरसांनी रूचिर करून दाखविण्याचे काम कवीचे होय. रामदासांचे रामायण वगैरे ग्रंथ काव्य आहेत (कारण) ते रसात्मक आहेत. दासबोधाचे तसे नाही. (पृ. ११)

इतके असूनही दासबोध जो वाचनीय वाटतो (वाक्चातुर्ये होईल सुखया) त्याचे श्रेय राजवाडयांनी दासबोधातील वक्तृत्व शैलीला दिले आहे. त्यांच्या मते, रामदासांच्या बोलण्याचा ओघ अप्रतिबद्ध आहे, शब्दांची योजना समर्पक आहे आणि विचारसरणी चित्तवेधक आहे. या विविध गुणांमुळे दासबोधातील सिद्धांत, विषय गहन असूनही तो काव्याप्रमाणे आल्हादक वाटतो. (पृ. ११)

दासबोधाच्या शिकवणूकीमध्ये शाश्वत स्वरूपाचा भाग जसा आहे तसा तत्कालीन परिस्थितीला आवश्यक असाही भाग असून ते दासबोधाचे वैशिष्टच आहे हे राजवाडयांनी आवर्जून सांगितले आहे. दुःखमय संसारातून निरंतरची सुटका करून घ्यावयाची असेल तर काय करावयास पाहिजे याचे निरुपण रामदासांच्या पूर्वी निर्माण झालेल्या वेदांतपर ग्रंथाप्रमाणे दासबोधातही आढळते. पण राजवाडयाच्या मते ते दासबोधाचे वैशिष्टच नाही. ते म्हणतात, 'दासबोधात विशेष हा आहे की, महाराष्ट्राच्या तत्कालीन स्थितीला ज्या प्रकारचे निरुपण पाहिजे होते, त्या प्रकारचे ते या ग्रंथात आहे. गीतादि ग्रंथात केलेले निरुपण, सर्व काली, सर्व देशांना लागू पडणारे असून सूत्रवत त्रोटक आहे. तसा प्रकार दासबोधाचा नाही. दासबोधात गीतेतील निरुपण तत्कालीन महाराष्ट्राला अनुलक्षून स्पष्ट भाषेत विस्तृत केलेले आहे.' (पृ. १८) गीतेत जो अर्थ मुग्ध आहे तो दासबोध ढोबळ अक्षरांनी स्पष्ट करून दाखवीत आहे. (पृ. २९)

दासबोधातील हा मुख्यार्थ कोणता ? किंवा त्याचे मुख्य प्रतिपाद्य कोणते ? राजवाडयांच्या दृष्टीने, 'नीति, धर्म व राज्य स्थापून, परमार्थाचा मार्ग दाखविण्याचा रामदासांनी आपल्या मनाशी जो निश्चय केला होता त्या निश्चयाचे फळ हा दासबोध होय ! (पृ. ३०) नीति, धर्म व राज्य ही परमेश्वराची, म्हणजे परमार्थाची, म्हणजे पूर्ण स्वातंत्र्याची मूर्त रूपे आहेत, तेव्हा त्यांची स्थापना व आश्रय करणे मुमुक्षूंना अत्यंत आवश्यक आहे हा दासांच्या उपदेशाचा मतितार्थ आहे.' (पृ.३१)

रामदासांच्या या प्रवृत्तिरूप परमार्थाच्या प्रतिपादनाचा त्या काळात विलक्षण प्रभाव पडला, किंबहुना शिवकालात जी राज्यक्रांती झाली तिच्या मुळाशी रामदासांनी आग्रहपूर्वक मांडलेल्या महाराष्ट्रधर्मांचे हे तत्त्वज्ञानच कारणीभूत होते असा राजवाड्यांच्या सिद्धांत आहे. रामदासांच्या 'महाराष्ट्रधर्माची' कल्पना राजवाड्यांच्या मनात प्रारंभापासूनच दृढमूल झालेली दिसते. इतिहास साधनांच्या पहिल्या खंडाच्या प्रस्तावनेत या महाराष्ट्र धर्माच्या कल्पनेचे त्यांनी स्वमतानुसार स्पष्टीकरण केलेले असून, सहाव्या खंडाच्या प्रस्तावनेत त्याचाच पुन्हा विस्तार केलेला आहे. ही चर्चा करताना, त्यांनी, न्या. रानड्यांनी 'महाराष्ट्र धर्म' या शब्दाचा जो अर्थ केलेला होतो तो चुकीचा आहे असे आग्रहपूर्वक सांगून 'हिंदूधर्माची स्थापना' गोब्राह्मणांचा प्रतिपाल, स्वराज्याची स्थापना, मराठ्यांचे एकीकरण व पुढारपण ही महाराष्ट्रधर्माची मुख्य अंगे आहेत' असा आपला अभिप्राय प्रकट केला आहे. आणि त्यांच्या मते शिवकालीन राज्यक्रांतीला हाच समर्थांनी उपदेशिलेला महाराष्ट्रधर्म कारणीभूत झाला. (पृ. २८७)

रामदासांच्या विचारात राजकीय जागरूकता उत्कटतेने दिसते यात मुळीच संदेह नाही. मुसलमानी आक्रमणाचे परचक्र, अस्मानी. इ. प्रकरणातील विध्वंसक स्वरूप, त्यावर करावयाची उपाययोजना आणि शिवाजीमहाराजांच्या क्षात्रधर्म इ. पराक्रमाने महाराष्ट्रात स्थापन झालेल्या आनंदवनभुवनाने व्यक्त झालेला परमानंद यांचे अवलोकन केले म्हणजे राजवाड्यांच्या विचारसरणीला, रामदासांच्या वाङ्मयात भक्कम आधार असल्याचे निराग्रही अभ्यासकांना मान्य होण्यास हरकत नाही. आणि म्हणूनच राजवाड्यांच्या महाराष्ट्रधर्मावरील भाष्याचा शब्दशः अर्थ स्वीकारला नाही तरी त्याचा भावार्थ साधार असल्याने कोणीही आक्षेप घेणार नाही.

राजवाड्यांच्या विवेचनावर जे जोरदार आक्षेप घेण्यात आले ते रामदासांच्या जयिष्णु महाराष्टधर्माचा उत्कटतेने त्यांनी गौरव केला म्हणून नाहीत रामदासांच्या विचारातील वैशिष्टय सांगताना राजवाड्यांनी चौथ्या खंडाच्या प्रस्तावनेत भागवतधर्मीय संताच्या कार्यासंबंधी जे उद्‌गार काढले त्यामुळे, त्यांच्या विचारसणीवर प्रखर टीकेचा गदारोळ निर्माण झाला आणि तो आजतागायत चालू आहे असे म्हटले तरी चालेल. राजवाड्यांनी या संतांच्या उपदेशाचे जे विवेचन केले ते संक्षेपाने पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१३ व्या शतकात जैन, लिंगायत व महानुभाव यांच्या विरुद्ध जी प्रतिक्रिया झाली तिलाच संत मंडळींचा अथवा संताळ्यांचा भक्तिपंथ म्हणतात. पुढील ३०० वर्षे ह्या संताळ्याचेच प्राबल्य महाराष्ट्रात फार होते. संत म्हटला म्हणजे अत्यंत पंगुपणाचा केवळ मूर्तिमंत पुतळा होय. इहलोक हा संताचा नव्हेच. ऐहिक सुखदुःखे,

ऐहिक उपभोग, ऐहिक व्यवहार, त्याच्यात मन घालणे संताचे काम नव्हे. असल्या ह्या संतमंडळीच्या हाती विचाराची दिशा जाऊन महाराष्ट्र तीन शतके पंगू बनून राहिले.' (राजवाड्यांच्या ऐतिहासिक प्रस्तावना, पृ. २८५)

सहिष्णुता हे संतांचे व्रत पडले. तेव्हा गाईंचा वध झाला, ब्राह्मणांचा छळ झाला, धर्माचा उच्छेद झाला तरी संतांची सहिष्णुता काही चळली नाही, सर्वस्वाचा नाश झाला तरी आपले काहीही गेले नाही ही संतांची बालंबाल खात्री, अशांच्या हातून राष्ट्राची राजकीय उन्नती व्हावी कशी ? (पृ. २८६–८७)

राजवाड्यांचे हे उद्‌गार संतकार्याचे एकाप्रकारे अवमूल्यन करणारे आहेत यात शंकाच नाही. 'संतांनी राष्ट्रीय व राजकीय दिशेने विचार करण्यात बिलकूल लक्ष घातले नाही.' हे त्यांचे म्हणणे वादासाठी क्षणभर मान्य केले तरी संतांच्या उपदेशामुळेच महाराष्ट्र तीनशे वर्षे दुबळा होऊन पडला हा निष्कर्ष काढताना, राजवाड्यांनी संतांच्या कार्याची सामाजिक फलश्रुती नजरेआड केल्याचे स्पष्टपणे दिसून येते. 'संताळे' ह्या शब्दप्रयोगाने संत चरित्राविषयी जी अनुदार वृत्ती व्यक्त होते ती उचित आहे असे म्हणता येणार नाही. प्रिय विचारांची उत्कट अतिशयोक्ती हा राजवाड्यांच्या शैलीचा एक विशेष असला, तरी या ठिकाणी, रामदासांच्या तुलनेने, वारकरी संतांच्यावर टीका करताना राजवाड्यांना अवश्य तो समतोल सांभाळता आला नाही हे नमूद करणे भाग आहे.

राजवाड्यांच्या संतांच्या कार्याविषयीची हीच विपरीत समजूत पुढेही कायम राहीली होती काय ? तसे मात्र सुदैवाने झाले नाही. अगदी पूर्णत: नव्हे तरी ही अतिरेकी भूमिका नंतर पुष्कळच सौम्य झालेली दिसते. चौथा खंड प्रकाशित झाल्यावर, पुढल्याच वर्षी राजवाड्यांनी लिहीलेला 'रामदास' हा निबंध प्रकाशित झाला. त्यांनी संतांनी केलेला नीतीचा व भक्तीच्या पुरस्कार तत्कालीन समाजाला हितकारक ठरला असे प्रांजळपणे कबूल केले. ते लिहितात, 'एकनाथ, तुकाराम वगैरे जे साधुसंत झाले त्यांचा सर्व कल नीति व भक्ति ह्यांकडे होता. नीतीचे व भक्तीचे पवाडे गाण्यात ह्या साधुसंतांनी महाराष्ट्राचे मोठे हित केले ह्यात संशय नाही.' (रामदास, पृ. ३८)

आणखी एका वर्षाने, म्हणजे १९०३ मध्ये राजवाड्यांनी आपलाआठवा खंड प्रसिद्ध केला. त्या खंडाच्या प्रस्तावनेत त्यांनी फारसी भाषेच्या प्रभावामुळे मराठी भाषेवर कोणकोणते दुष्परिणाम घडून आले याची विस्तृत चर्चा केली. सान्निध्याचा, फारसीच्या मराठीच्या बहिःस्वरूपावर बराच परिणाम झालेला असला तरी तीनशे वर्षांच्या जबरदस्तीनंतरही मराठीचे अंतस्वरूप बदलून गेले नाही असा निष्कर्ष काढला. त्यांनी जी याची चार कारणे दिली आहेत ह्यामध्ये १४ व्या, १५ व्या व १६ व्या शतकात झालेल्या **मराठीतील ग्रंथकारांचे प्रयत्न** हे एक

कारण दिलेले आहे. त्याचे स्पष्टीकरण करताना राजवाडे म्हणतात 'दरबारात व व्यवहारात जी मराठी भाषा चाले तीत यद्यपि फारशी शब्द व प्रयोग बेसुमार शिरले तथापि मराठी ग्रंथकारांच्या ग्रंथात जेवढे म्हणून कमी फारशी शब्दप्रयोग येतील तितके आले आहेत. ह्या सर्व ग्रंथकारांची भाषा जुनी मराठी आहे. त्यांच्या ग्रंथात मराठीचे मूळ, अस्सल व शुद्ध असे रूप कायम राहिले. हे ग्रंथकार मूळी झालेच नसते, तर फारशी शब्दांचे व प्रयोगांचे जीत संख्याधिक्य आहे, अशी मराठी राहिली असती. अशा मराठीस मराठी ही संज्ञा राहती किंवा नाही हाच प्रश्न आहे. मराठीची एखादी निराळीच भाषा बनती आणि निराळी भाषा बनल्यावर 'मराठ्यांचे राष्ट्र' असे शब्द वापरता आले नसते. इतकेच नव्हे तर हे ग्रंथकार न होते तर १७ व्या शतकात झालेली स्पृहणीय राज्यक्रांति झाली नसती.'

(ऐतिहासिक प्रस्तावना, पृ. ४१६–१७)

म्हणजे या ठिकाणी, राजवाड्यांनी शिवकालीन राज्यक्रांतीच्या श्रेयात रामदासांच्याबरोबर याही संतांना वाटेकरी करून, आपल्या पूर्वीच्या एकांगी विवेचनाचे एका परीने परिमार्जन केले आहे असे म्हणावयास हरकत नाही.

राजवाड्यांनी लिहिलेल्या निबंधानंतर पांगारकर, देव, फाटक, पेंडसे इ. अनेक विचारवंतांनी रामदासांच्या चरित्रातील समस्यांचा उलगडा करण्याचा आणि त्यांची शिकवण समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. परंतु रामदासांच्या विचारातील वैशिष्ट्यांची संक्षेपाने परंतु मूलग्राही चिकित्सा करणारे विवेचक या नात्याने राजवाड्यांचे स्थान अढळच राहिले.

यादगीर भेटीमागील रंगलेली राजकारणे

म. रा. कुलकर्णी

पहिल्या इंग्रज मराठे युद्धानंतर आणि बदामीची मोहीम सुरु होण्यापूर्वी म्हणजे इ. स. १७८४ च्या मे महिन्यात नाना फडणीसाच्या पुढाकाराने ही गुलाकात पार पडली. तिच्याबद्दलची सामान्य माहिती कै. सरदेसाई आणि कै. खरे शास्त्री यांनी दिलेलीच आहे.★ पण थोडक्यात पार्श्वभूमि सांगायची तर राघोबा आणि इंग्रज यांना यशस्वी तोड देण्यासाठी नानाने हैदर आणि निजाम ह्या दक्षिणेतील मराठ्यांच्या कट्टर शत्रूंना काही प्रदेश देवून आपलेसे केले होते. पुढे इंग्रजांचा पराभव झाला आणि राघोबाही मृत्यू पावला त्यामुळे ह्या दोघांना बक्षिसी दाखल दिलेला मुलूख परत मराठी राज्यास जोडणे जरूर होते. पण नुकत्याच इंग्रज-मराठे युद्धातून बाहेर पडलेल्या मराठ्यांना एकाचवेळी दोघांशी शत्रूत्त्व झेपणारे नव्हते म्हणून नानाची योजना अशी की निजामाशी मैत्री तूर्त अधिक दृढ करावी आणि त्याच्या मदतीने बलिष्ठ आक्रमक बनलेल्या टिपूस प्रथम नरम करावे मग एकट्या निजामाकडे केव्हाही पाहता येईल. म्हणजेच टिपूवरील स्वारीची पूर्वतयारी असे ह्या भेटीचे स्वरुप होते. तरी वरकरणी देखावा मात्र खंडणीच्या बाकीचा हिशेब समजून घेण्यास नाना निजाम अली उभयता भेटत आहेत असा करण्यात आला होता.

डेक्कन कॉलेजातील पारसनीस संग्रहात हरिपंत फडके यांचा ५४ वा रूमाल आहे. त्यात यादगीर भेटीसंबंधी काही पत्रे मिळाली. त्यावर प्रस्तूतचा निबंध आधारीत आहे. ही सर्व पत्रे (सुमारे २००) भेटीपूर्वीच्या १।२ महिन्यातीलच आहेत. ह्या पत्रांचा विशेष असा की त्यात समारंभाच्या माहितीपेक्षा मराठे-निजाम टिपू. इंग्रज-फ्रेंच यांची राजकारणेच विस्तारपूर्वक आली आहेत. प्रत्येकजण युद्धपूर्वस्थितीत वापरत असल्याने दुसऱ्याच्या मदतीने तिस-यावर कशी कुरघोडी करण्यास धडपत होता. सर्वत्र कसे अविश्वासाचे वातावरण होते ते स्पष्ट करून दाखवणे हा ह्या निबंधाचा हेतू आहे.

नाना फडणीसानी यादगीर भेटीमागील हेतू कितीही गुप्त ठेवला तरी त्याचा वास टिपूस लागलाच. त्या योजनेतील हवाच काढून टाकावी म्हणून त्याने

★ यादगीर जवळील आजूर येथे प्रत्यक्ष भेट झाली.

मराठी रियासत उत्तर विभाग. २. पृ. २७०,७११ म. रि. ड. वि. १ ऐतिहासिक लेख संग्रह. भाग. ८ पृ. ३८३८-३९.

मराठे निजाम यांच्याशी एकाचवेळी पण गुप्तपणे मैत्रीची बोलणी लावली. येथे टिपूने नानास चकविले कारण निजाम आणि टिपू यांच्यात मैत्री होऊ न देणे नानास जमले नाही. दुसरे, यामुळे मराठे–निजाम यांच्यात अविश्वास उत्पन्न झाला तो अखेर पर्यंत. मोगल मराठे एक होऊन आपणावर मोहिम काढणार याचे भय टिपूस अजिबात वाटले नाही उलट त्याने वकिलातर्फे बोलणी चालू ठेवून नरगुंदास वेढा दिला असे कै. खरे लिहितात[२] पण ह्या पत्रातून तर टिपूने मराठे आपणावर मोहीम न काढण्याचे आश्वासन देत असतील तर आपण तहास तयार आहोत अशी भूमिका स्पष्टपणे घेतली आहे. अर्थातच नानाने तसा शब्द देण्यास नकार दिला. तेव्हा आपण इंग्रजांशी तह करतो अशी भीती टिपूने मराठ्यास घातली आहे. लगेच हरिपंत नानास वारंवार पत्र पांठवू लागला की ... आपण जर टिपूला नाराज ठेवले तर तो इंग्रजास मिळून आपणावरच उलटेल त्यास खातरजमेचे पत्र देऊन स्वस्थ ठेवावे ...पण खंडणीची बाकी आणि नरगुंद कितूर, बदामी, विशेषतः आदवानी विषयी नानाचा फारच आग्रह पडल्याने टिपू मराठे तहाचे जमेना. ह्या तहाला टिपूची संमती आणतो म्हणून टिपूचा वकील नूर मुहमद जो गेला तो गेलाच. तेव्हा टिपू आणि नवाब यांचे काही राजकारण चालू असावे असा संशय येवून हरिपंत नानास लिहितो, नबाब–श्रीमंत यांची शराफ-सीची शत्रू (टिपू) सबल असे असता उद्योग करीत नाहीत (भेट निश्चित करत नाहीत) टालाटाल केल्यास पुढे पथ राहणार नाही हे समजोन वागतात आंतील बोलणी चालू असल्याशिवाय अशा गोष्टी होणार नाहीत.'

निजाम–टिपू यांच्या मैत्रीचे तात्पर्य हरिपंताचे मत टिपूने नवाबास आदवानी द्यावी आणि परतफेड म्हणून निजामाने श्रीमंतांचे फौजेतून अंग काढून घ्यावे. नानास संशय येवू नये म्हणून आदवानी बंडखोरानी घेतली असा कांगावा टिपूने करावा. निजामाच्या दरबारातील मराठ्यांचे वकील गोविंदराव पिंगळे मात्र हमी देतात की नवाब टिपू यांच्यात कोणताही करार मदार झालेला नाही केवळ सलोखा असावा अशी बोलणीच चालू आहेत.

टिपूचा इंग्रज द्वेष प्रसिद्धच आहे. पण मोगल मराठे यांची आगामी मोहिम टाळण्यासाठी त्याने इंग्रज मैत्रीचाही बागूलबोवा उभा केला.[३] हरिपंतास मात्र ते खरे वाटून त्याने त्याचे खापर महादजी वर फोडले आहे. नूर महमुद हा टिपूचा वकील एका पत्रात नानास लिहीतो–' तुम्ही स्नेहाची निखालसता करता आणि हरिपंत फौजेसह पुढे मसलत करणार इंग्रजांचा वकील आमचेपाशी आला आहे श्रीमंतानी (आमचेशी) पका स्नेह केला तर ठींक नाही तर कलेल तसा तह (इंग्रजांशी) उरकून येतो.' ह्यावरून अभय मिळण्यास मराठ्यांवर दडपण यावे म्हणूनच टिपूने इंग्रज मैत्रीची अफवा उठवली असावी असे ठरते. हरिपंतास मात्र

ही मात्रा लागू पडून तो नानास लिहीतो...' आपल्या भरवशावर टिपू इंग्रजाकडील (तह) पका करीत नाही त्यास खातरजमेचे पत्र द्यावे म्हणजे त्याची बुद्धी स्थिर राहिल.' पण पुढे टिपूचा वकीलच आमची बोलणी (इंग्रजांशी) फिसकटली तेव्हा श्रीमंताशी तह करून द्यावा अशी गळ हरिपंतास घालीत आहे. त्यावरूनसुद्धा टिपू. इंग्रज मैत्रीचा वार फुसकाच ठरतो,

टिपूस हवे तसे पत्र देण्यास नानाची अट होती की खंडणीची हमी वकिलाने द्यावी. टिपूच्या चालीचा भरवसा बिचारा वकील कसा देणार? सारांश खातरजमेच्या पत्राबद्दलच्या टिपूच्या आग्रहास खंडणीच्या बाकीचा शह देवून नानाने यादगीर भेटीचा मूळ हेतू कायम राखण्यात यश जरुर मिळवले.

मोगल मराठे यांच्या टिपूवरील आगामी मोहिमेत सामील होण्यास इंग्रज उत्सुक होते इंग्रजांना टिपूच्या सामर्थ्यापुढे शरणागती पत्करावी लागल्याने आता मराठ्यांना इंग्रजांच्या मदतीची मातबरी उरली नव्हती असे कै. खरे लिहीतात[४] पण ह्या पत्रातून मात्र टिपू व निजाम दोघानाही एकाचवेळी जरबेत ठेवण्यासाठी इंग्रजमैत्रीचा उपयोग करून घ्यावा कि काय याबाबत नाना हरिपंत विचार करीत होते.[५] असे स्पष्टपणे दिसते. ही पलटणे आणली तर चांगला परिणाम असा होईल की पलटणे येतात या वार्तेनेच टिपूकडील ऐवज येईल नवाबही आता आहेत त्यापेक्षा नरम होतील पण वाईट परिणाम असा की नवाब नाराज होवून म्हणतील आम्ही भेटीची योजना केली आणि यांनी पलटणे आणली नानाच्या ह्या समस्येला हरिपंत तोड अशी सांगतो की पलटणे तळेगावापर्यंतच आणवावी गरज वाटली तरच पुढे न्यावी म्हणजे खर्चाचा आपल्यावर भुंदंडही पडणार नाही व पलटणे आली म्हणून नवाबही नाराज होत नाहीत. ५० ह. स्वार १० ह. गाडदी इतकाच सरंजाम शिवाय तोफखाना नवाब घेणार असल्याने नानास इंग्रजाच्या मदतीची गरज वाटत नव्हती.

'आमचे राज्यापासून तुम्हास काही धोका नाही टिपू कितीही बलिष्ठ असला तरी त्याला आपण दोघे पुरेसे आहोत.' असे हरिपंत निजामास जो जो लिहीत होता तो तो निजाम इंग्रजाकडे अधिकच झुकत होता.[६] कारण सालबाईच्या तहाने इंग्रज मराठे मित्र आहेतच आता टिपूशीही वाटाघाट चाललीय तेव्हा हे तिघे आपणावर उलटतील अशी निजामास भीती पडली होती. इंग्रज निजाम यांच्यात मैत्री असल्याखेरीज इंग्रजासारखे धूर्त राजकारणी चेनापटणास तेही खुष्कीच्या मार्गाने जाण्याचे साहस करणार नाहीत असा हरिपंतांचा तर्क, निजाम इंग्रज याच्यात मिलाफ होऊ न देणे तसेच निजामाच्या दरबारात मराठ्यांचे वजन राखून असणे ह्यात गोविंदराव पिंगळे यास (मराठ्यांचा वकील) अपयश आल्याने हरिपंताने नानाकडे तक्रार केली आहे. पण त्याला फ्रेंचाकडून विश्वसनीय बातमी

येते की निजाम इंग्रज याची आज मैत्री वाटते पण लौकरच तेढ पडणार आहे.

इंग्रज फ्रेंच यांचे संबंध सर्वश्रुत आहेत. ह्या राजकारणात इंग्रज मराठ्यांकडे झुकत आहेत तेव्हा फ्रेंच गप्प बसणार नाहीत टिपूशी त्यांची कोणती सौदेबाजी चालू [७] आहे याचा शोध घेता फ्रेंच बातमीदार सांगतो 'टिपू (आमच्या) कुमके करता बजीथं आहे पण आम्हीच करीत नाही हिंदुस्थानात इंग्रजांची जेवढी जमियेत आहे. तेवढी आम्ही वाढवणार ही तुमची बातमी मात्र सत्य आहे.'

सर्व हिंदी सत्ताधिशांनी मिळून इंग्रजांना हाकून द्यावे म्हणून नानाचे प्रयत्न चालू होते [८] पण नवाबाच्या मध्यस्थीने टिपूने ह्या मसलतीत येण्याने श्रीमंताची अप्रतिष्ठा होते ह्या मुद्यावर ही चर्चा थांबलेली दिसते.

अंतस्थ अशी राजकारणे चालू होती आणि वरवर मात्र भेटीच्या तपशीलाबाबत उभयपक्षी पत्रोपत्री चालली होती. नाना–हरिपंत हे भेट घडवण्यास अत्यंत उत्सुक तर बरोबर त्याच्या उलट स्थिती [९] निजामाची होती. नव्या नव्या सबबी सांगून त्याने दिरंगाई चालविली होती. श्रीमंताचे कूच झाल्याखेरीज आमचे कूच होणार नाही असा आग्रह त्याने धरला. त्यामागची गोम अशी होती प्रथम आपण निघालो, यश मिळाले (टिपूवर) तर उत्तम नाहीतर दोष आपणावर येणार ही भीती. दुसरे कारण हरिपतच सांगतो की टिपू निजामास आटोपला नाही श्रीमंत येथून (पुण्याहून) मिळाले म्हणूनच यश मिळाले याचे हातून काही झाले नाही ह्या बदलौकिकास नवाब घाबरत होते.

स्वराज्य मुघलाई याच्या सीमेवरील सुरापूर संस्थानातील यादगीरची निवड भेटीस करण्यात हरिपंताचे कौशल्य दिसते. [१०] त्यामुळे लष्कराचा उपसर्ग सूरापूरकरांना सोसावा लागेल परत त्यांच्या खंडणीची बाकी असल्याने त्यांना तक्रारीसही जागा उरणार नाही. मराठी लष्कराने, पेंढाऱ्यांनी रयतेस दिलेला त्रास प्रसिद्धच असल्याने त्याची निराळी नोंद घेण्याची गरज नाही. [११]

गेले वर्षभर लष्करासह हरिपंत छावणीस होता त्यामुळे खर्चापाई तो टेकीस आला होता आणि नाना पुण्याचा बंदोबस्त करून निघण्याच्या तयारीतच होता. त्या गडबडीत बरोबर घ्यायच्या सरंजामाकडे [१२] दुर्लक्ष होवू नये म्हणून हरिपंताने एक यादीच नानास पाठवली आहे त्यांत डेरा, राहुटी, मसनदी, मेहताब, चांदीची ताटे वाटया, रुप्याची उत्तर गुलाबदाणी, शेले पागोटी, वेगवेगळया किमतीचे शिरपेंच, छिटे, शालजोडया, ५० ह. चे कापड, केशर, कस्तूरी, तांदूळ, बदाम, बोरे, काशीची साखर, गुलाल, उदबत्या, त्याच्या सोंगटया, ओझ्यास उंट बैल इ. वस्तू आहेत. वर पुस्तीही जोडलेली आहे. की भेट नवाबाशी आहे तेव्हा सरंजाम चांगला लखलखीत घ्यावा. वर लिहील्यांपेक्षा जे जे चांगले सुचेल ते जरुर आणावे सामान जास्त आले तरी चिंता नाही पण आयत्यावेळी लष्करात वस्तू मिळणार


नाही'.. ह्या तपशीलावरून यादगीरची भेट किती थाटात पार पडली असेल याचा अंदाज येतो.

यादगीरभेट ही टीपूवरील निजाम-मराठे यांच्या संयुक्त मोहिमेचा टप्पा म्हणून आयोजित करण्यात आली पण निजामाला टिपूशी वैर नको होते कारण त्याला मराठ्यांच्या सामर्थ्याविषयी शंका होती. खुद्द मराठ्यांनाही एकट्याच्या ताकदीवर लगेच मोहिम काढण्याची उमेद नव्हती. तेव्हा पुढील वर्षीच मोहिम हाती घ्यावी एवढेच ह्या भेटीत उभयपक्षी ठरले.[१३]

सारांश इतिहासात ह्या भेटीचा ओझरता उल्लेख होत असला तरी त्या निमित्ताने द. भारतातील ह्या सत्तांची युद्धाच्या भीती पोटी चाललेली राजकारणे मनोरंजक तशीच महत्वाची ठरावीत असे वाटते.

आधार

१. मराठे टिपू तहासंबंधी पत्रे रु. ५४ फा. १ पत्रे–क्र. १३८, १४२, १४३, १४७, १५०, २२२-२३, २५३, २७५, ३३९, ५७७, ६६१.
निजाम टिपू सहासंबंधी पत्रे–१४७, ५७७.
२. ऐ. ले. संग्रह भाग ८ पृ. ३८९३-९४.
३. टिपू-इंग्रज मैत्री पत्रे–१८, २३६, २८४, ३२५.
४. ऐतिहासिक लेख संग्रह भाग ८ पृ. ३९००.
५. मराठे-इंग्रज मैत्रीसंबंधी पत्रे. २२५, २२६, २२७, २२८, २३१, २५४, २८३, २८६, २९०, २९४, २९५, ३२६.
६. इंग्रज-निजाम पत्रे–१७५, २२५, ४७५, ५०२.
७. टिपू-फ्रेंच वाटाघाटी पत्रे–६३४.
८. त्रिकूट मैत्री राजकारणासंबंधी पत्रे–२३४, ६३४
९. पत्र क्र. ११७, ११९, ३१५
१०. पत्र क्र. ११९, २८०, २९७
११. पत्र क्र. ३३०, २१०, २१४, ३४२
१२. पत्र क्र. २६२, २६३, ३४१, ३१८, २८१
१३. म. रि. उ. वि, पृ.



चित्र क्र. १ : कान्हेरीचे अप्रकाशित लेख (गोखले)



चित्र क्र. २ : कान्हेरीचे अप्रकाशित लेख (गोखले)

कान्हेरीचे काही अप्रकाशित लेख

डॉ. सौ. शोभना गोखले

कान्हेरी मुंबईच्या बोरिवली या उपनगरापासून आग्नेयेस दहा कि. मी. अंतरावर आहे. येथे शंभराच्यावर बौद्धगुंफा आहेत. हे ठिकाण निसर्ग रमणीय असून ते प्राचीनकाळच्या सोपारा, कल्याण आणि चौल या व्यापारीकेंद्रांना जवळ होते. येथील गुंफात भोजनगृह, पाण्याची टाकी, उपोस्थशाला आहेत. येथील आणखी एक वैशिष्टच म्हणजे या गुंफांना जोडणाऱ्या येथे पायऱ्याही खोदलेल्या आहेत. या सर्व गोष्टींवरून येथे राहणाऱ्या बौद्धभिक्षूंची संख्या फार मोठी होती ही गोष्ट स्पष्ट होते. नवीन सापडलेले शिलालेख कान्हेरी येथील स्मशानगुंफेच्या समोरील दरीत सापडले. हे शिलालेख म्हणजे कान्हेरी येथील गुरुंच्या स्मृतीशिला होत. स्मशानगुंफेमध्ये संथागार असून तेथे स्तूपाचे अवशेषही आढळतात. शिलांचा सर्वसाधारणपणे आकार २२ सें. मी. × १९ से. मी. आहे.

लिपी–ब्राह्मी, लिपीशास्त्रदृष्टचा शिलालेखांचा काळ इ. स. ५५० ते इ. स. ६५० हा धरता येईल.

वर्णव्यवस्था—'अ' हे अक्षर दाक्षिणात्य पद्धतीने लिहिले आहे. व्यंजनांतर्गत 'इ' लहानशा वर्तुळाने दर्शविली आहे. 'इ' हा स्वर उलटी चंद्रकोर व त्यासाठी दोन बिंदू यांनी दर्शविली आहे.

भाषा–प्राकृत

या लेखांत कान्हेरी येथे सापडलेल्या चार स्मृतीशिलांचा परामर्श घेतला आहे. या लेखांवरून कान्हेरी येथील बौद्ध भिक्षूंची नावे, त्यांचे गुणविशेष तर कळतातच परंतु तेथे गुरुपरंपरा होती हा पुरावा नव्यानेच सापडलेला आहे.

पहिल्या लेखाचे वाचन खालीलप्रमाणे आहे–

ओळ १ थेराण आय्य इ

ओळ २ न्दसेणाम्बं पयुताणं प-

ओळ ३ भिणाणं अरहन्ताणं

ओळ ४ सताणं थूभं

या लेखामध्ये असे दिसते की इन्द्रसेनाने भिक्षूची नेमणूक केली होती. हा भिक्षू 'पभिण्ण' होता. पभिण्ण म्हणजे दुसऱ्या शाखेचा. महाराष्ट्रातील गुंफातून असलेल्या लेखांमध्ये 'अपरवितिसेलिय' आणि 'भद्रावनिय' या बौद्ध शाखांचा उल्लेख आहे. कान्हेरी येथील लेखांमध्ये चातुदिससंघाचा उल्लेख आहे.

'पभिण्ण' या शब्दांवरून विविध शाखांच्या भिक्षूंचे त्याठिकाणी स्वागत होत असे ही गोष्ट स्पष्ट होते. परंतु या भिक्षूचे नाव लेखांत नाही व त्याची नेमणूक करणारा इन्द्रसेन कोण होता हेहि निश्चितपणे माहीत नाही. दुसऱ्या शिलालेखाचे वाचन खालीलप्रमाणे आहे–

ओळ १ थेराणं आय्य वहिण्णा
ओळ २ ग्राणं अरहन्ताणं तिल
ओळ ३ पालकाणं थूभं

या लेखावरून असे दिसते की तिलपालक हा भिक्षू 'वहिण्ण' होता. 'वहिण्ण' हा शब्दही महत्त्वाचा आहे. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की दुसऱ्या संघाचे भिक्षू कान्हेरी येथें येऊन राहत होते.

तिसऱ्या लेखाचे वाचन खालीलप्रमाणे आहे–

ओळ १ णं धी
ओळ २ (मू) लाणं अरहन्ता (णं)
ओळ ३ थूभं

शिलालेख त्रुटित असला तरी त्यामध्ये 'धिमूल' हा महत्त्वाचा शब्द शाबूत राहिला आहे. धम्मसंगणि या ग्रंथावरील अट्टसालिनी या टीकाग्रंथामध्ये भिक्षूंचे विविध गुणविशेष दिले आहेत. जो स्वतःचे काम टाळत नाही, कर्तव्यापासून जो परावृत्त होत नाही, ज्याचा आपल्या भावनांवर पूर्ण विजय आहे आणि जो स्थिरचित्त आहे अशा भिक्षूस 'धिति' म्हणावे. अट्टसालिनीमध्ये खालीलप्रमाणे श्लोक आहे. चित्तचेतसिकानं धारणवसेन अविच्छेदतो वा पवत्तनवसेव कुसलसंतानं घोरतीति धिति । धितिचेसा अविट्ठितकारिता

(अट्टसालिनी ३.२८५)

चौथ्या शिलालेखाचे वाचन खालीलप्रमाणे आहे–

ओळ १ थेराणं आय्य णायेणं
ओळ २ अरहन्ता..थू (मं)

या लेखामध्ये 'णायेणं' हा शब्द अतिशय महत्त्वाचा आहे. 'पटिसंभिधामग्गपालि ग्रंथाममध्ये ज्ञानाचे एकूण ७३ प्रकार दिले आहेत. सर्वसाधारण भिक्षू ६७ तऱ्हेचे ज्ञान मिळून शकतो. उरलेले ६ तऱ्हेचे ज्ञान लोकोत्तर बुद्धीचाच भिक्षू प्राप्त करू शकतो.

१. इंद्रिय परोपरियज्ञान

या ज्ञानामध्ये भिक्षू दुसऱ्याच्या मनामधील हेतू जाणू शकतो. या ज्ञानाचेही एकण बावीस प्रकार आहेत. बौद्ध तत्त्वज्ञानात मनस, श्रद्धा, वीर्य, स्मृती, समाधी

आणि प्रज्ञा यांनाहीं इंद्रिय संबोधिले आहे. त्याल **इंद्रियपरोपरियज्ञान** म्हटले आहे.

२. आशयानुशयज्ञान–

या ज्ञानामध्ये श्रावक दुसऱ्या माणसाचे मन तर जाणू शकतोच परंतु त्या माणसाच्या मनाचे भविष्यकाळी काय बदल होतील हेही त्यास समजते.

३. यमकपटिहिरज्ञान

अशा तऱ्हेचे ज्ञान प्रत्यक्ष बुद्धास झाले होते. हा चमत्कार बुद्धाने श्रावस्ती येथील पुरोहितांचे वर्गहरण करण्यासाठी केला होता. शरीराच्या एका अंगातून अग्नी व दुसऱ्या अंगातून पाण्याचा प्रवाह हा तो चमत्कार होय. बौद्ध वाङ्मयामध्ये बुद्धाच्या या चमत्काराचा वारंवार उल्लेख आहे.

४. महाकरूणा ज्ञान

सर्व भूतमात्रांविषयी अनुकंपा या ज्ञानामध्ये अपेक्षित आहे. महायान वाङ्मयामध्ये या ज्ञानाचा वारंवार उल्लेख आहे.

५–६. सब्बञ्ञूतज्ञान आणि अनावरणज्ञान

सब्बञ्ञुतज्ञान आणि अनावरणज्ञान या मध्ये थोडा फरक आहे. ज्या श्रावकास सर्व तऱ्हेचे ज्ञान आहे, कोणत्याही तऱ्हेचा आडपडदा नाही त्यास सब्बञ्ञुतज्ञानी किंवा अनावरणज्ञानी असे म्हणत. तो सर्वज्ञ असतो. त्यास ‘ अतीत ’ (गत) पच्चुपन्न (वर्तमान) आणि अनागत (भविष्य) ज्ञात असते. थेरवादामध्ये ज्ञान हा माणसाचा सर्वोच्च गुण मानला जातो. परंतु उपनिषदातील आत्मन् म्हणजेच ब्रह्मन् या तत्त्वज्ञानापेक्षा बौद्धधर्मातील ज्ञान वेगळे आहे. उपनिषदातील गूढता बौद्धधर्मामध्ये नाही. सत्य आणि सर्वश्रेष्ठ ज्ञान मिळविण्यासाठी शरीराची आणि मनाची उपासना करण्याचे उपनिषदातील तत्त्वज्ञान बौद्ध धर्माने स्वीकारले होते ही गोष्ट कान्हेरी येथील लेखांवरून पुन्हा एकदा स्पष्ट झाली आहे.

कान्हेरी येथील या स्मृतीशिलालेखांवरून कान्हेरीच्या गुरुंचे गुणविशेष तर कळतातच परंतु वाङमयीन पुरावे आणि पुराभिलेखातील पुरावे यांचा येथे सुंदर समन्वय साधला आहे. हे या लेखांवरून नव्याने सिद्ध झाले आहे.

संदर्भ ग्रंथ

१. व्ही ट्रेंकर – **ए क्रिटिकल पाली डिक्शनरी** १९२४—४८

२. टी. डब्ल्यू. ऱ्हेस डेव्हीड–**दि पाली टेक्स्ट सोसायटीज पाली इंग्लिश डिक्शनरी** १९२५.

३. बापट पु. वि. – आणि वाडेकर आर्. डी.	अट्ठसालिनी (३.२८५) १९४२.
४. बापट पु. वि – आणि वाडेकर आर. डी.	धम्मसंगणि १९४० (१३) चित्तुपादकदम्—कुसलधम्मा

मराठीचे भारतीयीकरण : एका तपशिलाचा आरंभ

वि. शं. डोंगरे

०. मंडळाने प्रकाशित केलेल्या ऐ. सं. साहित्य (खण्ड १७, पृष्ठ, ३४) मध्ये ३१ ऑगस्ट १७६४ च्या पत्रात एक वाक्य आहे – 'त्यांजकडील दोघे कार-कून पो मजकुरी येऊन आम्ही आल्यापूर्वीच च्यार पांच दिवस गढीत दाखल झाले.'

०.१ या वाक्यात 'पो मजकुरी' म्हणजे सावदे येथे प्रा. ग. ह. खरे यांनी आपल्या संपादकीय टीपेत (ऐ. सं. सा. खण्ड १७, पृ. १०१) म्हटल्याप्रमाणे 'सावदे परगणा एकाच वेळी पेशव्यांनी रास्त्यांना सरंजाम दिला व रघुनाथराव दादाने चिंतो त्र्यंबक-लेले यांना कमाविशीने दिला.' पत्रातील वाक्यात 'त्यांजकडील' याचा अर्थ 'चिंतो त्र्यंबक यांजकडील आणि आम्ही म्हणजे रास्त्यांकडील लोक. दोघांचीही ही माणसे सावद्याला वसुलीसाठी गेली होती हे ध्यानात ठेवले पाहिजे.

०·२ सावदे परगण्याचा अमल हा ऐ. सं. सा. (१७ पृ ३४-४०) मधील पाच पत्रांचा (क्रमांक ४०-४४) विषय आहे ही पत्रे ३१ ऑगस्ट ते १८ ऑक्टोबर १७६४ च्या दरम्यान लिहिली गेली आहेत. लेखनाची स्थाने सावदे, पुणे व खानदेश अशी आहेत आणि दोन पत्रे राजाराम महादेव, दोन पत्रें रघुनाथरावदादा व एक पत्र खानदेशचा सुभेदार नारो कृष्ण याने लिहिलेले आहे.

०·३ एकाच विषयावर, केवळ ५० दिवसांच्या कालावधीत आणि समाजाच्या जवळपास एकाच थरातील लेखकांनी लिहिलेली ही ५ पत्रे मराठीचे ऐतिहासिक व्याकरण लिहिण्याच्या दृष्टीने तत्कालीन भाषेचा एक उत्कृष्ट पुरावा ठरावीत. प्रस्तुत प्रकरणी 'येसें प्रकारचा चिवडा जाला' (पत्र ४०) सारख्या वाक्यातली अलंकारिकता 'दोघे कारकून' (पत्र ४० 'दोन कारकून' नव्हे) आणि राहिल्यास, राहिल्याने, पडलिया (पडल्यास), सुचल्याप्रमाणे, बनल्यासारखे, आल्यांवर, आल्यावाचून, आल्यापूर्वी इ. शब्द हे अभ्यसनीय ठरावेत.

०·४ या पैकी या ठिकाणी आलेला 'आल्यापूर्वी' हा शब्द प्रचलित मराठीत नाही. त्याऐवजी 'येण्यापूर्वी' हा शब्द ग्रांथिक भाषेत व यायच्यापूर्वी हा शब्द बोलभाषेत प्रचलित आहे. यायच्यापूर्वी या शब्दात 'यायचा' हा मूळ शब्द आणि राजवाड्यांनी (तिङ्तविचार पृ. ६२,६४) सुचवलेला 'चारव्यात' मानून प्रचलित मराठीची या बाबतीतील हिंदी, गुजराती इ. संस्कृतोभ्दव भाषांपेक्षा वेगळी ठेवण उलगडून दाखविणेही इष्ट आहे. पण 'आल्यापूर्वी' च्या ऐवजी 'येण्यापूर्वी चा प्रयोग ज्या भाषिक बदलाचा निदर्शक आहे, त्याचे स्वरूप जाणण्यासाठी 'यायच्यावूर्वी' चा विचार आवश्यक नाही.

१. प्रचलित मराठीत क्रियापदाच्या तीन प्रकारच्या रूपांना शद्वयोगी अव्यये (अर्थात् वरील ५ पत्रात आल्या प्रमाणे, वाचून, वर, सारखे पूर्वी या सारखे शद्व) लागू शकतात ते असे —

१) रीतिभूत काळी (ईकारान्त) रूप–उदा. येई + पर्यंत = येईपर्यंत

२) भूतकाळी रूपाच्या अंत्याक्षरात बदल होऊन झालेले एक रूप[२] उदा.– आला ली– ले + पासून = आल्यापासून.

३) क्रियार्थक नामांचे सामान्य रूप. उदा. येणे + मुळे = येण्यामुळे.

१.१ क्रियार्थक नाम हे नामच असल्याने त्यास विभक्तीप्रत्यय व शब्दयोगी अव्यये लागणे फारसे विलक्षण नाही. मराठीत जेथे रीतीभूतकाळी व भूतकाळी सामान्य विभक्ती रूपास हे शब्द लागतात तेथेही हिंदी- सारख्या अनेक संस्कृतोद्भव भारतीय भाषातून क्रियार्थक नामाचाच वापर होतो. उदा.' येईपर्यंत = आने तके, आल्यापासून = आने के बाद / आने से.

मराठीत 'पर्यंत' व त्याच अर्थाची तो, वर ही अव्यये मात्र फक्त रीतीभूतकाळी 'ई' कारान्त रूपालाच लागतात. इतर संस्कृ- तोद्भव भारतीय भाषां (आर्य भारतीय भाषा) मध्ये तसे होत नाही

१.१-२

भूतकाळी सामान्य विभक्तीला प्रत्यय, शब्दयोगी अव्यये इतर आर्य– भारतीय भाषांपैकी गुजराती व उडिया भाषात तूरळक प्रमाणात लागतात, मराठीत या गोष्टीची परंपरा निदान १७ व्या शतका इतकी जुनी आहे व ऐ. स सा. (खण्ड १७) मध्ये ही परंपरा दिसते. स्वरं, व्यंजने कोणती ? कोणती ऱ्हस्व, कोणती दीर्घ या स्वरूपात सांगता येणाऱ्या शब्दाच्या बाह्याकाराबाबत सध्याच्या वळवावर येताना

दिसते दिनांक ३१ ऑगस्ट १७६४ च्या पत्रात तीन ठिकाणी 'आलिया-वर' शब्द येतो, तो इतर काही ठिकाणी पुढीलप्रमाणे ही आढळतो १) तेथून ऐवज आल्यावरी पाठवून देऊ. (पृष्ठ ७, पत्रक्रमांक ९ इ. स. १७५४-५६) 'आलियावर' आल्यावरी, आणि 'आल्यावर' एवढेच पर्याय ऐ. सं. सा. (खण्ड १७) च्या पत्रातील मराठीत आढळतात, या पुस्तकातील एक प्रमुख पत्रलेखक मल्हारराव रास्ते हा साधारणपणे आलियावर, लागलियावर, गेलियावर असे लिहितो. तर नारो कृष्ण हा त्याच्या वडिलांचा पोष्य (साहाजिकच बहुधा मल्हारराव पेक्षा बहुधा वयाने मोठा) इ. स. १७५४-५६ च्या दरम्यान 'आल्या-वरी, (ऐ. सं. सा. पत्र ९, पृ. ७), जाहाल्यावरी (पत्र १०. पृ.११) असे लिहितो जाल्याची (परस्पर भेटी जाल्याची पत्रे पुणियाहून आली. पत्र ७, पृ. ६ ६) हा शब्द त्याच दोन वर्षात भिकाजी रास्ते यांचा दुसरा पोष्य रामाजी माहादेव वापरतो आणि त्याच सामाजिक थरात वावरणारे पुणे दरबारान्तर्गत रघुनाथराव दादा २८ सप्टें. १७६४ ला 'आल्यावर' (तुम्ही हुजूर येणे आल्या वर आज्ञा करणे ते केली जाईल. पत्र ४१) असे लिहितात.

तात्पर्य, रामाजी माहादेवाशी कौटुंबिक नाते सांगणारे नाव धारण करणारा भाऊ साहेब रास्ते यांचा (म्हणजे भिवाजी रास्ते यांच्या सात चिरंजीवापैकी कुणा तरी एकाचा) सेवक राजाराम माहादेव हा ३१ ऑगस्ट १७६४ रोजी आल्यावाचून, आल्यापूर्वी हे शब्द लिहतो, ही गोष्ट मराठी भाषेने एका पूर्वापार चालत आलेल्या आपल्या वैशिष्ट्याच्या बाह्याकारात अल्पसा बदल केल्याचीच निदर्शक आहे.

प्रचलित मराठीत 'आल्यावाचून, सुचवल्याप्रमाणे, बनल्यासारखे,' अशी 'सावदे परगणा प्रकरणीच्या पाच पत्रातील रूपेच ग्राह्य मानते' वाचून, प्रमाणे, सारखी इ. शब्दयोगी अव्यये क्रियापदाच्या भूतकाळी सामान्य विभक्तीस लागतात, हा प्रचलीत मराठीतील नियम 'सावदे रपगणा प्रकरणीच्या पत्रांपासून तंतोतंत लागू होतो.

१.२ 'स, या विभक्ती प्रत्ययांनी युक्त' राहिल्यास' हा शब्द राजाराम माहादेव याच्या पत्रात (पत्र क्रं. ४३) येतो, तर मल्हारराव रास्ते त्या पत्राच्या सहा वर्षे आधी 'ठेविलियाने' (मुलूक ठेविलियाने नफा नाही पत्र २० पृ. १६) असे लिहून जातो. बालाजी कृष्ण देशाई हा रास्त्यांचा सेवक ही 'गेलियाची फिकीर नाही' (पत्र २१. पृ १७ असे १७६० साली मिरजेत बसून लिहतो, पण राजाराम महादेव मात्र

आपल्या १७६४ ऑक्टो च्या ज्या पत्रात 'राहिल्यास' शब्द वापरतो त्याच पत्रात सावद्याची ' रयेत व मोकदम राजारामपंतांचे आल्यांत आहेत ' असे लिहितो. पण 'राहिल्यास,' प्रमाणे 'पडल्यास' असा शब्द न वापरता, कोणत्याही प्रकारे परगणा आपल्याकडे घेण्याचा आग्रह भाऊसाहेब रास्त्यांना करतो, तो 'पडलिया' असा जुन्या वळणाचा शब्द वापरून. (कोणे ही प्रकारे पो मजकूर आपणाकडे करून घ्यावा, रसद दाहावीस पंचवीस चालीस पावेतो पडलिया चिंता नाही —पत्र क्र. ४३)

याचा अर्थ असा की, 'स, ने, चा' इ. विभक्तीप्रत्यय क्रियापादाच्या भूतकाळी सामान्य रूपालाच लागतात, हे मराठीचे वैशिष्टये रामदासांच्या काळापासून असले, तरी, 'केल्याने होत आहे रे' वगैरे सारख्या उक्तींचे आजचे रुप हे प्रस्तुत सावदे परगणा प्रकरणा नंतर मिळालेले आहे.

१.३ क्रियार्थक नामांच्या सामान्य रुपांना विभक्तीप्रत्यय वा शब्दयोगी अव्यय लागल्याचे एकही उदाहरण सावदे परगणा प्रकरणींच्या पत्रात नाही. मात्र 'करणे' (आजच्या करण्याची' ऐवजी) व 'यावयासी' (येण्यास ऐवजी) हे शब्द पत्रे ४१,४४) म्हणजे क्रियार्थक नामांच्या (सप्रत्यय) उपयोगाच्या भावी जागा होत.

२. प्रचलित मराठीत काही शब्दयोगी अव्यये भूतकाळी सामान्य विभक्ती व क्रियार्थक नामाचे सामान्य रुप दोहोसही लागत असली तरी त्यामुळे भिन्नार्थक शब्द जोड्या तयार होतात, उदा.—

आल्या । येण्या बद्दल, मुळे, सारखा, यापैकी

'आल्याबद्दल' वगैरे रूपात प्रत्यक्ष 'आगमन' घडल्याचा संकेत बऱ्याच वेळा आढळतो. उदा.' हे घे, आल्याबद्दल पैसे आणि हे घे येण्याबद्दल पैसे' या दोन वाक्यांपैकी पहिल्या वाक्यात 'आगमन' होऊन गेल्याचा संकेत आहे, हाच संकेत हवा असेल, तर दुसरे वाक्य,' हे घे, तुझ्या येण्याबद्दल पैसे' असे करावे लागते. 'मी त्याला येण्याबद्दल पैसे दिले । देईन' इ. वाक्यें 'आगमन' प्रत्यक्ष होऊन गेले किंवा नाही याबद्दल संदिग्ध राहतात असतात. ही ही संदिग्धता दूर करण्यासाठी वाक्यात इतर प्रकारे खुलासा करावा लागतो. या उलट मी त्याला आल्याबद्दल पैसे देतो दिले देईन' इ. वाक्यात आगमन प्रत्यक्ष घडल्याचा संकेत असो वा नसो, संदिग्धता बहुधा नसते.

२.१ 'आल्यापूर्वी' या रूपाचे महत्त्व याच कारणासाठी आहे. प्रस्तुत सावदा परगणा प्रकरणी रास्त्यांकडील राजाराम महादेव व रघुनाथदादा कडून ज्यांनी कमावीसदारी मिळवली होती, त्या नाशिकच्या चितो त्र्यंबककडची माणसे दोघेही सावद्याला पोचली होते. हे उघड आहे, 'आल्यापूर्वी' शब्दातूनही निःसदिग्ध वस्तुस्थिती निःसंशय व्यक्त होते,

२.२ आल्याबद्दल, येण्याबद्दल, आल्यामुळे, येण्यामुळे इ. शब्दजोडचा प्रचलित असल्यामुळे आजच्या मराठीत अस्तित्वात असलेल्या 'येण्यापूर्वी' च्या जोडीला आल्यापूर्वी हा शब्द (तसेच 'जाण्यापूर्वी' च्या जोडीला 'गेल्यापूर्वी इ.) मराठीत कधीतरी होते असे अनुमान मात्र राजाराम माहादेव याचे ३१ ऑगस्ट १७६४ चे पत्र उपलब्ध नसते तरी करता आले असते.

३ भूतकाळी सामान्य विभक्तीला शब्दयोगी अव्यये लागतात हे मराठीचे वैशिष्टय ज्यूल ब्लोख यांच्या 'मराठी भाषेचा विकास या ग्रंथापासून भाषाविज्ञांनींच्या ध्यानात आले आहे आणि अशाच काही वैशिष्टयावरून आर्यभारतीय भाषा आणि मराठीची उत्पत्ती या दोन्ही विषयाबाबत एक नवा दृष्टीकोण गेल्या ३० वर्षांत मांडण्यात येऊ लागला आहे.

३.१ या नव्या दृष्टीकोणात निष्कर्षांचा आधार भाषा-भाषांतील शाब्दिक साम्याहून फार खोल, केवळ व्याकरणिक समानतेहून ही खोल आहे. कारण दोन भाषांचा परस्पर संपर्क आल्याने भाषांचे व्याकरणही बदलू शकते या वस्तुथितीची जाणीव या दृष्टिकोणात ठेवण्यात आली आहे. 'आल्यापूर्वी' शब्दाच्या ऐवजी 'येण्यापूर्वी' हा शब्द प्रचारात येणे ही गोष्ट अशाच एका व्याकरणिक बदलाची निदर्शक आहे.

३.२ आल्यानंतर, आल्यापूर्वी या रूपांच्या मालिकेत 'आल्यापासून' हा शब्द येईल. भूतकाळी सामान्य विभक्तीला शब्तयोगी अव्यये लागतात हे मराठीचे वैशिष्टय दाखवण्यासाठी उदाहरण म्हणून ज्यूल ब्लोख यांनी १९१४ साली 'मराठी भाषेचा विकास' (कलम २६३ मध्ये 'तुझी आई वारल्यापासून' ही शब्दावली दिली आहे. ब्लोख त्याचा आधार निर्देश सांगत नाहीत. पण सदाशिव काशीनाथ उर्फ बापू छत्रे यांच्या 'बाळमित्र' (१८२८) पृ. १९) या पुस्तकात

नेमका हाच शब्द प्रयोग आहे - 'तुझी आई वारल्यापासून मामाची प्रकृती अशी जर्जर झाली आहे की -'

३.२.१ 'वारल्यापासून' हा शब्दप्रयोग अगदी असाच्या असा 'सावदे परगणा प्रकरणाच्या' काळी (म्हणजे आजपासून सुमारे २२५ वर्षापूर्वी) नव्हता आणि रामदासांच्या काळी तर त्याचे स्वरव्यंजन-ऱ्हस्व दीर्घत्वाच्या दृष्टीने खूपच वेगळे स्वरूप असणे शक्य आहे हर (कलम १.१.१ ते १.२ पहा) सावदे परगणा प्रकरणींच्या पत्रातील काही शब्दांचा 'आल्यापूर्वी' या शब्दाच्या अनुषंगाने जो विचार केला आहे त्यावरून हे ध्यानात येईल.

३.३ पण मराठीच्या उत्पत्तीसंबंधी जो दृष्टिकोन हल्ली मांडण्यात येऊ लागला आहे, त्याचा आधार स्वर व्यंजनादींच्या समानतेवर आधारित शाब्दिक साम्याहून फार खोल असल्याने, त्यांचे निष्कर्ष तीन चारशे वर्षांच्या नोंदलेल्या (recorded) इतिहासापेक्षा ही फार मागे पोचू शकतात. म्हणूनच, 'इंडिया अॅज ए लिंग्विस्टिक एरिया' ३ आणि 'दी इंडियन लिंग्विस्टिक एरिया रिविझिटेड' ४ या लेखांचे लेखक एम. बी. इमॅनो यांना 'तुझी आई वारल्यापासून' ही रचना बौद्धांच्या संकरित संस्कृत वाङ्मयातील आगत काले 'at the time of his comming, लग्नभयम् 'the fear of being struck' या शब्दप्रयोगाची व ठित्तट्ठाने, 'at the place where he stands' या पाली भाषेतील शब्दप्रयोगाची हटकून आठवण करून देते. या (सर्व) रचनाचे मूळ इमॅनो यांच्या मते निश्चितच द्राविड भाषात आहे.

३.४ शब्दयोगी अव्यय ही शब्दजाती संस्कृतचा भारतात प्रवेश होण्यापूर्वी त्या भाषेत उपलब्ध नव्हती आणि नंतरही संस्कृतमध्ये शब्दयोगी सदृश सोय उत्पन्न होण्यास द्राविड भाषांतील तत्सदृश रचना कारणीभूत झाल्या असल्या पाहिजेत असे इमॅनो यांनी दाखवून दिले आहे.

४.० खास 'मराठीची उत्पत्ती' या विषयाचे अभ्यासक फ्रँकलिन सी. साऊथ वर्थ यांनी असेही दाखवून दिले आहे की नेहमी आढळणाऱ्या शब्दयोगी अव्ययां पैकी (पोस्ट-पोझिशन्स) काही शब्दयोगी अव्ययें निरनिराळ्या आर्यभारतीय भाषांत एकगोत्री नाहीत.[६]

४.१ 'आने के पहले' या हिंदी शब्दप्रयोगासारखेच क्रियार्थक नामांचा उपयोग करणारे शब्दप्रयोगच बंगाली, आसामी, पंजाबी, काश्मिरी या भाषांत प्रचलित आहेत. म्हणून 'पूर्वी' या मराठी शब्दयोगी

अव्ययाला समानार्थी शब्द पहायचे ते हिंदी, गुजराती, मराठी, उडिया एवढ्याच भाषातले पाहिले तरी पुरे होईल. इतर आर्यभारतीय भाषांबाबत टर्नरच्या शब्दकोशाचा हवाला पुरे.

४.१.२ –'पूर्वी' या शब्दाने प्रकट होणारी कल्पना या चार भाषात पुढील शब्दांनीही व्यक्त होते.

मराठी – पूर्वी, आधी, आगोदर[७], पाठीमागे[८]

हिंदी – पूर्व, पहिले

गुजराती – पहेलां

उडिया – पूर्वरु, प्रथम, पहिले

(उडिया पूर्वरु शब्दात 'रु' हा सप्तमीचा प्रत्यय आहे आणि पूर्वी या मराठी शब्दातही 'ई' हा सप्तमीचा प्रत्यय आहे. हिंदी, गुजराती, शब्दात मात्र सप्तमी स्पष्ट नाही.)

४.१.२.१ हिंदी 'पूर्व', उडिया 'पूर्वरु', मराठी 'पूर्वी' हे शब्द संस्कृतवर आधारित आहेतच. हे त्या त्या भाषात नव्यानेच आलेले आहेत हे सिद्ध झाले तर साऊथवर्थ यांचे म्हणणे '–पूर्वी' या शब्दयोगी अव्ययाने व्यक्त होणाऱ्या कल्पनेलाही लागू पडेल.

४.१.३ या उलट '–पूर्वी' या अर्थाचे द्राविड भाषांतील शब्द मात्र एकमेकांशी बहुतेक मिळते–जुळते व सगोत्री आहेत. तामिळ – मल्याळंम् 'म्युंब' तेलुगू 'मुन्दु, मुन्दर,' (अपवाद – कन्नड किन्त)

४.२ '—पूर्वी' या अर्थाच्या कालवाचक शब्दयोगी अव्ययांची आणखी एक विलक्षणता अशी की या अव्ययांच्या पूर्वी क्रियापदांची रूपे किती प्रकारची असू शकतात याबद्दल मराठी, हिंदी, गुजराती, उडिया या (म्हणजे पर्यायाने सर्वच) आर्य भारतीय भाषात एकसूत्रता नाही.

५.० आर्य भारतीय भाषात हा जो एकसूत्रतेचा अभाव आहे, त्याचा विचार येथे दोन टप्प्यात करायचा आहे. पैकी दुसरा टप्पा उडिया भाषेतील उपलब्ध पुराव्यावर अवलंबून राहील.

५.१ (खडी बोली) हिंदीत 'पहले' या शब्दयोगीपूर्वी येणारा शब्द हे क्रियार्थक नामाचे सामान्य रूप असते, गुजरातीमध्ये वर्त. कृदन्त; किंवा भूतकाळी सामान्य विभक्ती असते, तर प्रचलित मराठीत तरी फक्त क्रियार्थक नामाचे असते. मराठीतील ही नवी व्यवस्था ३१ ऑगस्ट १७६४च्या आसपास (पण फार मागे नव्हे) प्रचारात येऊ लागली होती.

	येणे	जाणे
हिंदी	आने के । से पहले	जाने के । से पहले
गुज. १	आवतां पहेलां	जतां पहेलां (वर्त. कृ.)
२	आव्या पहेलां	गया पहेलां
मराठी (प्रच)	येण्यापूर्वी	जाण्यापूर्वी
(१७६४ पूर्वी)	आल्यापूर्वी	—

५.१.१ उघडच आहे, की हिंदी के से हा फरक फक्त विभक्ती प्रत्ययातील आहे, गुज. आवंता। आव्या हा फरक क्रियापदांतर्गत प्रत्ययातला, तर मराठी आल्या। येण्या हा फरक शब्दांगा (Stem) मधला आहे, अर्थात जास्त मूलभूत आहे.

५.२ साहजिकच 'आल्यापूर्वी' व 'येण्यापूर्वी' या शब्दजोडीत जो भाषिक बदल — लॅंग्वेज चेंज -- अनुस्यूत आहे, त्याचे स्वरूप स्पष्टपणे जाणून घेण्यासाठी द्राविड भाषातील काही शब्दप्रयोग 'पाहणे इष्ट होईल.

	आल्याबरोबर	आल्यानंतर	आल्या । येण्या पूर्वी	I II
तमिळ	वन्द उडन्	वन्द पिरन्द	वरुवदके मुंब	II
मल.	—,,—	नन्नतिन् शेषम्	वरुन्नदिन् शेषम्	II
कन्नड	बन्द क्षण	बन्द बलिक	बरुवद किन्तू	II
तेलुगू	वच्चिन वेन्टने	वच्चिन तरूवात	वच्चिन मुन्दु	I
			राक मुन्दु	(?)

स्पष्टच आहे की 'आल्यापूर्वी, येण्यापूर्वी' ही शब्दजोडी भिन्न अर्थछटा दाखवते व तेलुगूतील शब्दजोडी ही भिन्न अर्थ छटा दाखवते. 'आल्यापूर्वी' हा अर्थ दोन्ही भाषात दोन दोन प्रकारे व्यक्त होऊ शकतो.

५.३ 'उडिया' भाषेत मात्र मराठीच्याच अर्थाची शब्दजोडी उपलब्ध आहेत ब्लोख आपल्या 'ले' इंडोआर्येन टु वेदा ओ तेम्प माडर्नेस' या फ्रेंच ग्रंथात (आता याचे इंग्रजी भाषांतरही उपलब्ध आहे) या गोष्टीचा जाता जाता व तपशिलात न शिरता उल्लेख (प्रस्तुत ग्रंथाचा अंक ३२८) करतात की 'तुझी आई वारल्यापासून' या प्रकारचे शब्दप्रयोग मराठी, उडिया आणि सिंहली भाषात उपलब्ध आहेत, ती रचना काहीशा तपशिलाच्या फरकांसह, या तिन्ही भाषात स्वतंत्रपणे निर्माण झाली आहे. इमॅनो मात्र 'ठितठ्ठाने'

सारखे मध्ययुगीन भाषाप्रयोग आणि या तिन्ही भाषातील 'आई वारल्यापासून' सारखे शब्दप्रयोग यांच्या मूळाशी द्राविड प्रभावच असल्याचे मानतात.[१०]

५.४ भारत भारती (उड़िया) या पुस्तकात (प्रकाशन राष्ट्रभाषा प्रचार समिति, वर्धा, १९६०) पुढील पैकी उडिया व हिंदी वाक्ये आहेत.

१. (उडिया) बिराडि आसिबारू मूषा माने पळाइले पृ. २७
(हिंदी) बिल्ली के आने से चूहे भागे
(मराठी) मांजर आल्याने उंदीर पळाले

२. (उ.) काम समाप्त हेबा पुर्वरु मुं तुम्मकु मजूरी देभि न पारे. पृ. ३७
(हिं.) काम समाप्त होने के पहले, मैं तुम्हें मजदूरी नहीं दे सकता
(म.) काम पूर्ण होण्यापूर्वी, मी तुला मजूरी देऊ शकत नाही.

प्र. १० – वरीस वाक्यातील 'आसिबारु' ऐवजी 'आसिलारु' आणि 'हेबापूर्वरू' ऐवजी 'हेलापूर्वरू' अशी ही रूपे वापरलेली वाक्ये बोली भाषेत येतात.

निष्कर्ष असा की, राहिल्याने, आल्याने या प्रचलित मराठी शब्दाशी रचनादृष्टचा तंतोतंत मिळणारे शब्द आजही बोली उडियात आहेत, तसेच 'आल्यापूर्वी' शब्दाशी मिळतेजुळते शब्दही आहेत, ही रूपे सर्वच उडिसा राज्यात शिक्षित–अशिक्षित दोन्ही प्रकारच्या लोकांच्या बोलण्यात, निदान घाईघाईने बोलण्यात येतात.

६.० तात्पर्य, 'आल्यापूर्वी' सारख्या रचनांचे मूळ शोधण्यासह उडियापेक्षा तेलुगूची सामग्रीच अभ्यासणे जास्त इष्ठ ठरेल.

'आल्यापूर्वी', 'येण्यापूर्वी' या शब्दजोडीत मूळ शब्दांगा (Stem) मध्येच फरक आहे, 'वच्चिन' आणि 'रॉक' या तेलुगू शब्दातला फरक त्याहून जास्त मूलगामी असून मराठी 'आ (ल्या) व 'ये (ण्या), इंग्रजी go, व wen (t) या शब्दजोड्यांप्रमाणे हा फरक शब्दांगाबाबत आहेच, पण प्रत्यया बाबतही आहे.

६.१ गुज. 'आव्या—आवतां' या शब्दजोडीत जो प्रत्ययाबाबत फरक आहे, त्याहूनही तेलुगू शब्द जोडीत जास्त मूलगामी फरक आहे. हा फरक कळण्यासाठी पुढील कोष्टक पहा.

वेळ्ळिन वेन्ट ने गेल्याबरोबर

वेळ्ळिन तखात गेल्यानंतर

वेळ्ळि मुन्दु

वेळ्ळक मुन्दु

६.१.१ 'मुन्दु' (= पूर्वी) शब्दाच्या आधी येणाऱ्या 'वेळ्क' रूपाची समजूत मराठीत पटवून देणे सोपे नाही; मात्र 'वेळ्ळक' हें धातुसाधित खरे आणि या धातुसाधिताचा उपयोग करून तेलुगू भाषाविज्ञानींच्या[११] मते सुमारे ५० प्रकारची संयुक्त क्रियापदे, तयार होतात हे ही खरे, तसेच हे अशा प्रकारचे धातुसाधित तेलुगूत ८ व्या शतकापासून आढळते हे ही खरे.[१२]

६.२ '–पूर्वी' हा अर्थ असणारी शब्दयोगी अव्यये लागण्याबाबत गुज. व व उडिया मध्ये द्विविधता दिसते, त्यापैकी उडियातील द्विविधता जवळजवळ मराठीसारखीच आहे. या तिन्ही भाषात जी द्विविधता आहे, तिचे व या तिन्ही भाषांच्या प्रदेशांना जवळच असलेल्या तेलगूती व द्विविधतेचे नक्कीच काही तरी नाते असले पाहिजे. हे नाते समजण्यासाठी 'वेळ्ळक' सारख्या धातुसाधितासंबंधी अधिक अभ्यास झाला पाहिजे.

६.२.१ 'वेळ्ळक' हे नकारार्थी धा० सा० मानले जाते. त्यात काहींच्या मते –'अक' हा नकारार्थी प्रत्यय आहे, काहींच्या मते – अ–, –क असे दोन प्रत्यय आहेत व ते दोन्हीही नकारार्थीच आहेत. आणि तरीहि 'वेळ्ळक' हा शब्दात फक्त एकच नकार मानला जातो.

६.२.१ साहजिकच या नकारार्थी धा० सा० ना एक प्रकारची वाक्प्रचारात्मकता (Idiomatic status) आली असल्यास नवल नाही. हेन्री मॉरिस यांच्या 'ए सिम्प्लिफाईड ग्रामर ऑफ दी तेलुगू लॅंग्वेज' (१८९० पृ. १३७) मधील एका उताऱ्याचा त्या दृष्टीने अनुवाद (काही शब्द इंग्रजीतच ठेवून) पुढील कलमात दिला आहे.

६.३ तेलुगू नकारार्थी धा० सा० हे वाक्प्रचारात्मक रीतीने (idomatically) असे वापरले जाते की प्रथमदर्शनी तो उपयोग इष्ट अर्थाच्या नेमका उलटाच भासतो, उदा० अतडु राक मुन्दु म्हणजे 'before he came', पण शब्दशः अर्थ मात्र 'before his not coming' अतडु चेप्पक मुन्दर म्हणजे, 'before he spoke' पण शब्दशः अर्थ मात्र 'before his not speakig'

७. साहजिकच तेलुगू बाबत या दृष्टीने जो पुरावा मिळेल, तो त्याचा सांगोपांग अभ्यास होणे महत्त्वाचे ठरते. अशा अभ्यासानंतरच मराठीच्या घटनेविषयी ब्लोख, साऊथवर्थ वगैरेंच्या मतांची खोलात जाऊन चर्चा करता येईल.

७.१ तूर्त एवढेच म्हणणे रास्त ठरेल की 'आल्यापूर्वी' या शब्दाऐवजी 'येण्यापूर्वी 'चे आगमन ही गोष्ट मराठी भाषा हिंदी वगैरे संस्कृतोद्भव भाषांना या बाबतीत जवळ आल्याची निदर्शक आहे वर (कलम ३.४) सांगितलेच आहे की संस्कृतमध्ये शब्दयोगी सदृश सोय द्राविड भाषांच्या संपर्कामुळेच उत्पन्न झाली असली पाहिजे, प्राक् 'पूर्वी' अनन्तरम्, 'नंतर' सार्धम् 'बरोबर' अशी शब्दयोगी संस्कृतात उत्पन्न झाली तेव्हाही पुढील वाक्यापैकी 'ब' प्रकारची वाक्येच (अर्थासाठी कलम ५.४ वाक्य २ पाहा) होत होती.

(अ) कार्य समाप्तिं अगच्छत् प्राक् अहं त्वां पारिश्रमिकं न यच्छामि

(ब) कार्यसमाप्तेर्प्राक् अहं त्वां पारिश्रमिकं न यच्छामि

एवढेच नव्हे, तर 'प्राक्', अनन्तरम् अशा शब्दजातीपूर्वी येणारा शब्द कोणत्या विभक्तीत असावा याचे नियम संस्कृतात आहेत. याचाच अर्थ या शब्दयोगी अव्यय सदृश शब्दजातीपूर्वी येणारा शब्द नाम असला पाहिजे हाच संस्कृतात नियम होता.

म्हणजेच 'येण्यापूर्वी' शब्द संस्कृतच्या प्रभावामुळे प्रचारात आला आहे. असे संस्कृतीकरण किंवा आर्यिकरण किंवा भारतीयीकरण कन्नड, मल्याळम् व तमिळ या भाषांचेही झाले आहे. मराठीच्या बाबतीत हा बदल झाल्याचा काळ ३१ ऑगस्ट १७६४ पासून फार पुढचा नसावा.

दि. २ जून १९७९ रोजी वाचलेल्या 'आल्यापूर्वी : विस्मरणापूर्वी' या निबंधाचे परिवर्धित रुप. मूळ निबंध व हे रुप तयार करताना डॉ. डी. एम्. जोशी (माझे पी. एच्. डी. साठी मार्गदर्शक) व डॉ. एम्. ए. मेहेंदळे यांनी केलेल्या सूचनाबद्दल मी ऋणी आहे.

टीपा— १. मूळ निबंधावरील चर्चेत मंडळाच्या काही सदस्यांनी सांगितले की सासवड, व जुन्नरच्या आसपास अगदी अन्तवर्ती (interior) भागात तो (उदा० शिपाई) आल्यापूर्वी आणि ते (उदा० महाराज, राष्ट्रपति इ. 'एक' व्यक्ति) येण्यापूर्वी असा उपयोग हल्ली होतो.

२. या रुपास सोयीसाठी पुढे बऱ्याच ठिकाणी 'सामान्य विभक्ती' असे म्हटले आहे. पाहा : परांजपे कृत मराठी भाषेचा विकास कलम २६)

३. एम. बी. इमॅनो : 'लँग्वेज' मासिक, खंड ३२ अंक १ पृ. ३–१६

४——"——इंटरनॅशनल जर्नल ऑफ द्रविडियन लिंग्विस्टिक्स खंड ३ अंक १.

५. एम. बी. इमॅनो उपर्युक्त 'लँग्वेज' मासिक पृ. ९

६. डॉ. साऊथवर्थ यांचा लेख—(डेक हाईम्स संपादित–पिजनायजेशन अँड क्रिओलायजेशन ऑफ लँग्वेजेस (१९७१ : पृ. २६२)

७. आकाशवाणी, पुणे, वर दि. २ जून ७९ रात्रौ ८–१५ 'आरसा' श्रृतिकेत 'चितूअण्णा' या पात्राच्या तोंडचे वाक्य

'पाऊस येण्याच्या अगोदर घर जवळ केलेलं बरं—

८. 'सात दिवसाच्या पाठीमागे असे शब्द मी अशिक्षित पण २०–२२ वर्षाच्या स्त्रियांच्या तोंडी ऐकले आहेत.

९. या शब्दांतील विभक्ती वैविध्याचा विचार येथे विचार येथे गौण आहे.

१०. फ्रॅंकलिन एडगरटन यांच्या बुद्धिस्ट हायब्रिड संस्कृत ग्रामर ॲण्ड डिक्शनरी आणि बुद्धिस्ट हायब्रिड संस्कृत रीडर या पुस्तकाचे इमॅनो यांनी केलेले परीक्षणा पाहा–'लॅंग्वेज' मासिक खंड ३९ पृ. ४८४

११. डॉ. राव–व्हर्बल काम्पाउंडस इन तेलुगू, डेक्कन कॉलेज बुले

१२. इ. स. ७१९ ते ७५८ दरम्यानच्या एका ताम्रपटात 'चेनेरक' म्हणजे न करणारा असा शब्द आठवतो पाहा–के महादेवशास्त्री–हिस्टॉरिकल ग्रामर ऑफ तेलुगू (१९६१ : पृ. २०८ व २९९–३००)

कोल्हापूर शहराच्या परिसरातील भौगोलिक परिस्थिति व युद्ध

डॉ. प्र. त्रि. मालशे

कोल्हापूर शहराचे आसपासचे प्रदेशात छत्रपती शिवाजी महाराज व त्यांचे नंतर छत्रपती राजाराम व ताराबाई यांनी शत्रुचे फौजांशी घनघोर युद्धे करून यश संपादन केले त्याचे कांही अंशी श्रेय तेथील भौगोलिक परिस्थितीस आहे व ह्या करिताच वरील शीर्षक निवडण्यात आले आहे. छत्रपती राजाराम व ताराबाई यांनी सह्याद्रीतील अभेद्य किल्यांचे सहाय्याने औरंगजेब बादशहाचे बलाढ्य सेनेशी यशस्वी झुंज देवून मराठ्यांचे राज्य नेस्तनाबूत करण्याचे त्याचे स्वप्न धुळीस मिळविले. आणि म्हणूनच, ऐतिहासिक दृष्टीने, ज्या प्रमाणे पुणे शहराशी सिंहगड निगडीत आहे त्याच प्रमाणे कोल्हापूर शहराशी पन्हाळगडाचे नाते आहे. ह्या करिता भूगोलाचे विद्यार्थ्याला या प्रदेशाच्या इतिहासातील भूगोलाचे नेमके महत्त्व काय ते ठाऊक असणे आवश्यक आहे व ह्या दृष्टीने येथे थोडा प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

सह्याद्रीचा प्रदेश भूपृष्ठातील लंबरूप हालचाली तसेच झीज करणाऱ्या कारकांच्या खनन कार्यामुळे लाव्हा प्रदेशात तयार झालेल्या भू आकारांनी बनलेला असून त्यास डोंगराळ स्वरूप प्राप्त झालेले आहे. येथे पडणारा जोरदार पर्जन्य पण भूपृष्ठांची झीज करण्यास कारणीभूत झाला आहे. या कारणांमुळे या प्रदेशांत खोल दऱ्या, तीव्रकडे, सपाट माथ्याचे उंच डोंगर (मेसा) आणि घनदाट जंगले आढळतात. असे वैशिष्ठ्यपूर्ण प्रदेश डोंगरी किल्ले बांधण्याचे दृष्टीने फारच उपयुक्त असतात व त्यांचे सहाय्याने शत्रु पासून संरक्षण करणे सोपे जाते. विशालगड, पन्हाळा, सिंहगड, अजिक्यतारा व रायगड इ. किल्ले इतिहासात अजिक्य ठरले ते यामुळेच. महाराष्ट्रीतील या किल्ल्यांची तुलना स्पेन मधील किल्यांशी केली जाते. ग्रँट डफ म्हणतो, " (शत्रुचा) मार्ग अडविणारा सर्वात मोठा नैसर्गिक अडथळा म्हणजे उंच व रूंद असलेली सह्याद्रीची रांग होय. मावळ किंवा घाटमाथा या नावांनी ओळखल्या जाणाऱ्या या प्रदेशात घनदाट जंगलांनी वेढलेले तसेच तीव्र उतारामुळे दुर्गम असलेले अनेक नैसर्गिक डोंगरी किल्ले आहेत. तीव्र मानसिक बल आणि स्वातंत्र्यप्रेम असलेले येथील लोक स्वभावतःच काटक व स्वावलंबी असून जमिनीतून मिळणाऱ्या अपुऱ्या उत्पन्नावर उपजीविका करतात. आणि म्हणून लष्करी दृष्टीने कदाचित् ह्या प्रदेशापेक्षा अधिक मजबूत प्रदेश जगात सापडणे

कठीण आहे." एका इंग्रज लष्करी अधिकाऱ्याचे हे मत आहे एवढे सांगितले म्हणजे पुरे. एलफिन्स्टन व वेल्स इ. तज्ञांनी पण अशीच मते व्यक्त केली आहेत. इतकेच नव्हे तर देशाला स्वातंत्र्य मिळाल्या नंतरही स्वतंत्र भारताचे फौजेमध्ये मराठा व गुरखा पलटणींनी गनिमीकाव्याचे युद्धांत (Guerilla warfare) अजून आपले नांव राखले आहे हे लक्षात घ्यावयास हवे.

शिवाजीस सह्याद्रीचे प्रदेशाचे सखोल भौगोलिक ज्ञान असल्यामुळे इ. स १६६४ मध्ये त्याने बादशहाचे अधिकारी आणि सल्लागार यांना उद्देशून एक पत्र लिहिले त्यातील मजकूर असा. " येथील बिकट प्रदेशात अतिशय बलवान घोड्यांना घोडदौड करणे कठिण असून हा प्रदेश जिंकणे अतिशय जिकेरीचे आहे हे त्यांना ठाऊक नाही. येथील डोंगरांच्या रांगा दोनशे लीग लांब व चाळीस लीग रूंदीच्या आहेत. सर्वत्र ओलांडण्यास अवघड असे नदी नाले, गगनचुंबी शिखरे व खोल खिंडी आहेत."[२] हवामान हा घटक सुद्धा तितकाच महत्त्वाचा आहे. एप्रिल-मे ते सप्टेंबर ऑक्टोबर या सहा महिन्यांचे काळात हवेत बाष्पाचे प्रमाण खूप असते तर मान्सूनचे काळात हवेची सापेक्ष आर्द्रता सकाळी १०० टक्के इतकी जास्त असते. सह्याद्री पर्वतामध्ये वार्षिक सरासरी पर्जन्य ५००० मि. मि. पेक्षा अधिक असून तो सतत व जोराचा असतो, तसेच हवेत त्यामुळे खूप गारवा असतो. चिखला-पावसामध्ये काम करणारे सामान्य शेतकरी शरीराचे तपमान टिकविण्या करिता तांदुळापासून बनविलेली दारू घेतात, व थंडी वाऱ्यापासून संरक्षण व्हावे म्हणून स्थानिक बनावटीची घोंगडी वापरतात.

सह्याद्री पर्वतामध्ये भरपूर पडणाऱ्या पर्जन्यामुळे घनदाट जंगलाचे आच्छादन तयार झाले आहे. सपाट माथ्यांचे डोंगरा वरील जांभा प्रकारचे लॅटेराईट खडकावर निवडुंगाच्या जातीच्या वनस्पति वाढतात, तसेच उंच जंगलाच्या छायेमध्ये काटेरी झाडे व झुडपे वाढतात. आणि म्हणूनच आक्रमकांचे फौजांना अशी जंगले दुर्गम असतात. साहाजिकच, प्रचंड व अवजड युद्ध साहित्य बरोबर घेवून वावरणाऱ्या मोंगल फौजे करिता हा उंच सखल व अतिशय पर्जन्याचा तसेच घनदाट जंगलांचा प्रदेश युद्ध करण्याचे दृष्टीने अतिशय गैरसोयीचा होता. शिवाय महाराष्ट्राचे ह्या भागात एप्रिल व मे महिन्यांमध्ये पडणारा " वळीवाचा " पाऊस उत्तर भारतातून आलेल्या बहुतांश शत्रुचे सैनिकांना नवीन होता. बंगालचा मैदानी भाग वगळता गंगेच्या खोऱ्यामध्ये कोठेही असा पाऊस पडत नाही व म्हणून त्यांना त्याची माहिती नसल्यामुळे त्यांना तो " अकाली " (Unseasonal) वाटल्यास आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. परिणाम असा झाला की ढगांचा गडगडाट व वीजांचा चमचमाट होवून वेगाने पडणाऱ्या पावसामुळे मोंगल फौजांचे फार हाल झाले. अशा पावसामुळे डोंगरी ओढ्यांना अचानक पूर येवून फौजांचे हालचालीला प्रतिबंध होत असे.

मराठ्यांचे महत्त्वाचे सर्व किल्ले सह्याद्री व मावळच्या अशा दुर्गम प्रदेशांत आहेत. सह्याद्रीचे कण्या पासून निघालेल्या डोंगरांच्या रांगा पूर्व, आग्नेय किंवा ईशान्य दिशेकडे जातात व त्यांच्यामुळे संपूर्ण प्रदेश अनेक नद्यांच्या खोऱ्यांमध्य विभागला गेला आहे. जरी डोंगरांच्या रांगा फार उंचीच्या नसल्या तरी पण प्रदेशाची लहान लहान नदी खोऱ्यांमध्ये झालेली विभागणी फारच परिणामकारक आहे, व त्यामुळे फूटीर प्रवृत्ती जोपासली जाते. स्पेनचे पठार व भारतातील अरूणाचल प्रदेशामध्ये अशाच प्रकारची स्थिती आढळते. या सर्व प्रदेशांतील लोक स्वातंत्र्य प्रेमी, शूर, काटक आणि स्वावलंबी आहेत. छत्रपती शिवाजी राजांना हिंदूंचे राज्य स्थापन करण्याचे कार्यामध्ये अशाच लोकांची मोलाची मदत झाली. स्थानिक लोकांना प्रदेशाची बारिक सारीक भौगोलिक माहिती असल्यामुळे ते शत्रूचे फौजेस चुकीची माहिती पुरवून चकवीत असत. तसेच मराठा फौजेजवळ अवजड युद्ध साहित्य नसल्यामुळे त्यांना वेगाने हालचाली करणे शक्य होत असे. त्याऊलट अवजड युद्ध साहित्य, मोठ्या तोफा, हत्ती, उंट व घोड्यांचे ताफे बरोबर असलेल्या विजापुरी किंवा मोंगल फौजांना सह्याद्रीचे प्रदेशात प्रवेश करणे तसेच बाहेर येणे ह्या दोन्ही गोष्टी फार अवघड असत. एकदा अशी प्रचड फौज किल्ले जिंकण्याकरिता घाटामध्ये शिरली की मग तेथून माघार घेतांना तिची त्रेधातिरपीट होत असे. त्याच बरोबर सैनिक व पशुंची पण प्रचंड प्रमाणात हानी होई असे अखे प्रत्यक्ष युद्धात भाग घेतलेल्या सेनानी / अंमलदारांनी करून ठेवलेल्या नोंदींवरून दिसून येते. मात्र युद्धात मराठा फौजेचा मैदानी भागामध्ये शत्रुचे प्रचंड तोफखान्यापुढे अज़िबात टिकाव लागत नसे हे पण लक्षात घ्यावयास हवे. मराठा फौजेचे गनिमी युद्धाचे तंत्र राजस्थानात उदेपूरचे महाराणांची राजपूत व भिल्लांची फौज प्रबळ मोंगल सैन्या विरुद्ध प्रभावीपणे वापरीत असे. परंतु मैदानी भागात समोरासमोर टक्कर घेणे कधी शक्य झाले नाही. राजपूतांनी अरवली पर्वताचे दऱ्या खोऱ्यांमध्ये स्थानिक भिल्ल लोकांचे सहाय्याने कित्येक वर्षे युद्ध केले. अशा प्रसंगी वेळ पडल्यास त्यांना थरचे वाळवंटर आश्रय घेण्यास उपयोगी ठरे.

याच कारणांमुळे ज्या औरंगजेब बादशहास मैदानी भागावरील बिजापूर, गोळकोंडा व अहमदनगरची राज्ये जिंकून मोगल साम्राज्यास तो मुलुख जोडणे शक्य झाले त्यास मराठ्यांचे सह्याद्रीचे दऱ्याखोऱ्यामध्ये वसलेले राज्य जिंकणे केवळ अशक्य ठरले. तेव्हा प्रश्न असा निर्माण की बाल्ख (अफगाणिस्तान) व राजस्थानातील पर्वतांचे भागात शत्रूशी अयशस्वी युद्ध करण्याचा पूर्वानुभव असलेल्या औरंगजेबासारख्या कट्टर व निपुण शासकाने महाराष्ट्राचे डोंगराळ व दुर्गम भागात स्थित असलेले छत्रपति शिवाजीचे हिंदू राज्य नेस्त नाबूत करण्याचा

निश्चय कां केला ?* एवढे मात्र खरे की ज्याला तो वाळवंटातील उंदीर म्हणत असे तो उदेपूरचा महाराणा व ज्याला डोंगरातील उंदिर म्हणत असे तो शिवाजीराजा या दोघांनाही तो नेस्तनाबूत करू शकला नाही. इतकेच काय पण मावळातील देशमुखांवर सुद्धा मूसलमानी राजांची फक्त जुजबी हुकुमत चाले. कारण सह्याद्रीचे डोंगराळ भागात त्यांच्याशी लढून पराभव करणे सोपे नव्हते हे त्यांना पूर्णपणे ठावूक होते. शत्रुपक्षाची मुख्य अडचण अशी होती की त्यांचे सैनिक काटक नसून ऐष आरामी होते; त्यांना डोंगराळ प्रदेशात वावरण्याची तसेच तेथील दमट हवा व जोरदार पावसाची सवय नव्हती. शत्रुपक्षाची फौज डोंगराळ प्रदेशातील खास गरजांचा विचार करून तयार केलेली नसल्यामुळे तिला जागोजाग हार खावी लागली ही वस्तुस्थिति आहे. अगदी अलिकडचे काळात सुद्धा अतिशय डोंगराळ व खूप पावसाचे असे व्हिएतनामचे प्रदेशांत स्थानिक व्हिएतकांग सैनि-कांशी लढताना अद्ययावत सामुग्रीने सुसज्ज असलेले अमेरिकेचे बलाढ्य सैन्य शेवटी टेकीला आले व त्यांना नामुष्की पत्करून अखेरीस त्यादेशातून माघार घ्यावी लागली. पाकिस्तानातील पख्तून (पठाण) लोक असेच स्वतंत्र वृत्तीचे व शूर असून त्यांनी पूर्वी मोगल, त्यानंतर इंग्रज व आता पाकिस्तानी फौजेला कधी भीक घातलेली नाही. ही सर्व ऐतिहासिक सत्ये आहेत व त्यांचे मुळाशी तेथील भौगो-लिक परिस्थिती आहे एवढे लक्षात घ्यावयास हवे. महाराष्ट्रावर आक्रमण करणा-ऱ्या प्रबळ मोंगल सत्तेस पुरून उरणाऱ्या मराठी सत्तेच्या यशाचे रहस्य काय हे यावरून स्पष्ट होते.

वरील चर्चेमध्ये उपस्थित केलेल्या मुद्यांचे अधिक स्पष्टीकरण व्हावे ह्या करिता मोगलांचे फौजेबरोबर प्रत्यक्ष युद्धात भाग घेतलेल्या जबाबादार व्यक्तींनी त्यांचे दैनंदिनीमध्ये केलेल्या नोंदींमधून कांही उतारे खाली दिले आहेत. ईराणी इतिहासकार खाफीखान हा मोगल फौजेबरोबर महाराष्ट्राचे स्वारीवर आला होता. त्याने मोहिमांचेवेळी मोंगलांना आलेल्या अनेक अनुभवांची नोंद करून ठेवली आहे. भीमसेन सक्सेना नावाचे मोंगलांचे अधिकाऱ्यानेपण अशा अनेक घटना आपल्या दैनंदिनीमध्ये लिहून ठेवल्या आहेतत. नुस्त्रती याने लिहिलेल्या "अलीनामा" या ग्रंथामध्ये पण विजापुरी मुसलमानी सेनेच्या हालांचे वर्णन आढळते. साकी मूस्तदरवानचे "मासीर इ. अलमगिरी" या ग्रंथामध्येही असे अनेक पुरावे आढळतात.

---

* ह्या प्रश्नाचे उत्तर कारवारचे इंग्रजाकडून मिळते. तो लिहितो की '(औरंगजेब बादशहा) संभाजीराजाचे कृत्यांमुळे इतका चिडला की त्याने डोक्या वरील पगडी फेकून दिली आणि पण केला की जो पर्यंत राजास जिवंत किंवा मेलेला धरीत नाही अथवा त्याचे मुलुखातून त्यास हाकलून लावीत नाही तो पर्यंत पुन्हा कधीही पगडी धारण करणार नाही.' 3 ३० जुलै, १६८२)

पन्हाळ्याच्या वेढा (१७००–१७०१इ.स.)

"किल्याचा वेढा दोन महिने चालला. शहाजादा महंमद कामबक्ष आणि तरबियतखान यांजकडून किल्लेदाराने भक्कम रक्कम घेतली आणि (पन्हाळा आणि पावनगड) किल्ले खाली करून दिले. बादशहा आता पन्हाळ्याहून कूच करण्याच्या विचारात होता. या सुमारास अकाली पावसाची चिन्हे दिसू लागली. भयंकर वादळ, वादळ कसले, परमेश्वरी कोपच (गजबे इलाही) म्हणता येईल. लहानमोठे तंबू कागदा प्रमाणे हवेत उडाले. श्रीमंत-गरीब सगळे उन्हांत उघडे पडले. ज्याच्या तणावा फाटून चिध्या झाल्या नाहीत असा एकही तंबू नव्हता, आणि उडून परत धडपणे खाली आले असे एकही कापड नव्हते. या वादळाने तमाम माणसे त्रस्त होऊन 'परमेश्वरा आमचे रक्षण कर' असे ओरडू लागली. जनानखान्याचे तंबू उडाले, पडदे फाटले, पर्दानशीन स्त्रिया उघड्या पडल्या." (पृ. ६३, ६४,)

विशाळगडचा वेढा (इ. स. १७०१)

"खेळणा किल्ला (विशाळगड) जिंकून घेण्यासाठी बादशहा आपल्या सैन्यासहित पांचगांवाहून निघाला. प्रथमपासून शेवटपर्यंत प्रवास भयंकर सकटांनी भरलेला होता. रस्ते दुर्गम आणि अडचणीचे होते. वाटेत दाट जगले होती. त्यात विषारी वृक्ष होते, अरण्ये काटेरी होती. हवापाणी अत्यंत वाईट होते. या प्रवासात बादशाही सैन्याला भयंकर हाल सोसावे लागले व त्यामुळे दोन दिवसांत संपणारी मजल बारा दिवसांत आक्रमिली......बादशहाचा तळ (किल्ल्यापासून) साडेतीन कोसावर होता. तेथून निघून किल्ल्यापासून अर्ध्या कोसावर तळ देण्याचे बादशहाने ठरविले. पण या सात मैलांच्या प्रवासांत बादशाही फौजेचे अत्यंत हाल झाले. काही हजार जनावरे आणि अनेक माणसे दरी ओलांडताना मरण पावली. माणसाची आणि जनावरांची त्या दरीत इतकी काही गर्दी झाली की, चेंगराचेंगरीत अनेक माणसे आणि जनावरे चिरडून मेली. मराठे चहूंकडून हल्ले करीत ठार मारीत आणि लोकांची शस्त्रास्त्रे लूटून नेत. तेथील दुर्गम डोंगर, खोल दऱ्या, विषारी प्राणी आणि काटेरी वृक्ष यांना इतकी माणसे बळी पडली की एकाही माणसाचे अंगावर धड कपडा शिल्लक राहिला नव्हता. सारांश, माणसांची, सामानाचा आणि अन्नाची भयंकर हानी झाली." शहाजादा आणि त्याचे कारभारी यांनी गुप्तपणे किल्लेदाराला भली मोठी रक्कम देवून किल्ला हस्तगत केला (जून, १७०२). त्यानंतर "बादशहाने मुहरम महिन्याचे अखेरीस (१० जून १७०२) पेडगावच्या दिशेने कूच केले. त्या प्रदेशाचा ज्यांना अनुभव आहे त्यांना माहित आहे की, तेथे वर्षातून पांच महिने धो धो पाऊस पडत असतो. डोळे उघडण्यासही संधि मिळत नाही तसा पाऊस सुरू झाला. नदी नाल्यांना प्रचंड पूर

आले. रस्त्यात इतका चिखल होता की, माणसे आणि घोडी चिखलांत छातीपयत रुतून बसत. अंबाघाटाची जवळची दरी तीन कोसांची. पाऊस नसताना ती ओलांडण्यास मोगल सैन्याला दहा दिवस लागले. त्यांत सुद्धा प्राण आणि वित्त यांची प्रचंड हानी झाली. मग पावसाळ्यात काय प्रकार घडला असेल याची कल्पना केलेली बरी. सारांश, त्या काळांत रुपयाला एक शेर धान्य मिळे आणि तेही श्रीमंतांनाच. वरून तंब्र आणि झोंबणारा वारा आणि खाली पाणी आणि चिखल याशिवाय दुसरे कांहीच दृष्टीस पडत नव्हते.. खेळण्याहून चाळीस कोसांचा रस्ता अडतीस दिवसांत आक्रमून मोगल सैन्य पन्हाळा येथे (१७ जुलै १९०२) पोहोचले तेव्हा लोकांचे जिवात जीव आला. लष्कराचे अनेक लोक मागे राहिले होते. त्यांच्या अंगावर कपडा नाही. आणि शरीरे काय नुसती अस्थिपंजरे राहिली होती. अंगात रक्त म्हणून शिल्लक नव्हते. ते कसेबसे, भिकाऱ्या प्रमाणे, रडत-खडत चारपाच दिवसांनी छावणीत आले." (पृ.६४, ६७, ७१, ७२, ७३, व ७५).४

भीमसेन सक्सेना याचे मराठ्यांचे गनिमी काव्याचे युद्धा संबंधी लिहितांना एका लहानशा प्रसंगाची नोंद करून ठेवली आहे. तो असा " पन्हाळगडा भोवती असलेले मोगलांचे मोर्चे उधळून लावावे या उद्देशाने मराठे पन्हाळगडाजवळ आले. त्यांनी आक्रमणाला सुरूवात केली. कोल्हापूर एक प्राचीन स्थान असून पन्हाळगडापासून पाच कोसावर आहे. त्यावाटे वंजारी लोकांचा तांडा धान्य घेऊन येत होता. मराठ्यांनी त्याच्यावर हल्ला केला. शहाजादा बेहारबख्त याने वंजाऱ्याच्या मदतीसाठी आपले पथक पाठविले. पण मराठ्यांची संख्या अधिक होती; आणि मोगल कमी होते. शहाजाद्याच्या आज्ञेने नुस्रतजंग, जुल्फिकारखान, राव दल्वत बुंदेला व रामसिंह हाडा हे मराठ्यांचेवर तातडीने चालून गेले. दुष्ट शत्रूचे (मराठ्यांचे) जबरदस्त पायदळ सैन्य मैदानात आले होते. पण मोगलांसमोर टिकाव न लागून टेकडीवर चढणे त्यांना शक्य झाले नाही. (इ. स. १७०१)"५ मराठी फौजेला मोगलांशी मैदानावर दोन हात करणे कधी शक्य झाले नाही तर मोगलांना डोंगराळ भागात मराठ्यांशी युद्ध करणे कधी जमले नाही असेच ह्या वरून सामान्यतः दिसून येते. राजगड, परळी इ. किल्यांचे मोहिमांमध्ये सुद्धा मोगल फौजेचे अतोनात हाल झाले आणि म्हणून त्यांनी तोरणा किल्याचा एक अपवाद वगळता बाकी सर्व डोंगरी किल्ले भरपूर पैसे चारून ताब्यात घेतले असे खाफीखानाने नमूद केले आहे (पृ. ८७)

मोंगलांना महाराष्ट्राचे डोंगराळ भागात आलेल्या या वाईट अनुभवाची तुलना स्पेनच्या मोहिमेमध्ये अरबांना आलेल्या अनुभवांशी करता येते. " ज्या अरब मुसलमानांनी आठव्या शतकात स्पेन पादाक्रांत केला त्यांना दक्षिणेकडील शहरे सहजपणे जिंकता आली.. परंतु डोंगराळ भागात आश्रयास गेलेल्या ख्रिश्चन

लोकांनी उभारलेल्या कडव्या लढ्याला त्यांना दहाव्या शतकापर्यंत सतत तोंड द्यावे लागले. "[६] इराकमधील कुर्द या डोंगरी जमातीचा मैदानी भागावरील अरब फौजेशी होत असलेला अखंड लढा हे ह्याच प्रकारचे एक उदाहरण आहे. आजही इराकचे डोंगरी प्रदेशात तेथील कुर्द लोक मैदानावरील अरब फौजेस प्रवेश करू देत नाही. कर्नल अझीझ अक्रावी ह्यांचे शद्वात सागावयाचे म्हणजे अरब सैनिक आमचे पेशमरगाहांवर डोंगराळ भागात आक्रमण करू शकत नाही. त्यांचे जवळ अत्याधुनिक शस्त्रे आहेत तर आमचेकडे भौगोलिक प्रतिसाद व चैतन्य आहे. सामान्य अरब शिपाई आमचे पर्यंत कधीच पोचणार नाही. "[७] अगदी अलीकडेच उदाहरण द्यावयाचे झाल्यास १९७१ चे भारत-पाक युद्धाचे देता येईल. बांगलादेश (पूर्वीचा पूर्व पाकिस्तान) मधील पाकिस्तानी फौजेने भारताची कुरापत काढून जरी लढा चालू केला होता तरी पण भारतीय फौजेस पूर्वबंगाल विरुद्ध लश्करी कारवाई करण्या करिता मान्सून संपे पर्यंत थांबावे लागले. पूर्व बंगाल सारख्या नदी व कालव्यांचे देशात भर पावसाळयात युद्ध करणे केवळ आत्मघातकी ठरले असते हे उघड आहे.

संदर्भ ग्रंथ

१. History of the Marathas, Grant Duff. Vol. I, P. 6.

२. The House of Shivaji, J. Sarkar, P, 12.

३. A Short History of Awrangzib (1613–1707), J. Sarkar, 2nd Edi. P. 277.

४. मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध (Tarikh-I-Khafi Khan), सेतूमाधव पगडी १९६२.

५. मोगल आणि मराठे (Tarikh-I-Dilkusha), सेतूमाधव पगडी, १९६३.

६. Elements of Political Geography, S. V. Valkenberg and C. L. Stort, 2nd Eadi; P. 81. and A Geography of Europe, Jean Gottmann, New York, 1961 P. 542.

७. " Life ", Vol 39, No. 2, July 26/1965, P. 77.

(एक लीग = अदमासे तीन मैल.)

अठराव्या शतकातील कोंकणातील शिद्याचा जुलुम

डॉ. प्र. ल. सासवडकर

१७ व १८ व्या शतकातील भारत

या दोन शतकांत भारतांत सामान्य माणसाच्या दृष्टीने अत्यंत अशांतता होती. प्रत्येक प्रांताला आपापले प्रश्न होते. सैनिकी आक्रमणे, खंडण्या, सक्तीच्या वसुली, लूट जाळपोळ व सर्वसाधाणपणे जुलम सर्वत्रच होते. महाराष्ट्रात सुदैवाने शिवाजीराजांच्या स्वराज्याने सर्वसाधारण जनतेला मोगली साम्राज्य सत्तेशी झगडण्याइतकी ध्येयवाद व शांतता, शक्ति व सुव्यवस्था मिळाली. या काळात कोकणच्या अरूंद पट्टीत लोकांची काय स्थिती होती ती पाहिली पाहिजे.

पोर्तुगीज व शिद्दी

कोकणांतील लोकांचा मुख्य व्यवसाय १८ व्या शतकांत शेती हाच होता. खेड्यातील ग्राम रचनेत बलूते पद्धत होती. गुरे चारणे व परक्या सत्तेची नोकरी करणे हेहि व्यवसाय होते. जनता सर्वसाधारणपणे धार्मिक होती. कोकणांत दोन परकीय सत्तांचे प्रस्थ होते, पोर्तुगीज आणि शिद्दी-पोर्तुगीज कट्टर ख्रिस्ती होते तर शिद्दी कडवे मुसलमान होते.

धार्मिक जुलूम हा त्यांच्या हुकूमशाहीचा मुख्य भाग होता. त्यामुळे शिवाजी व त्यानंतरचे मराठे राज्यकर्ते यांना त्यांना जरब बसवावी लागली. मुंबईच्या दक्षिणेस २६ मैलावर असलेले जंजिरा हे त्यांनी आपले एक बळकट स्थान केले होते. शिद्यांचा हा जंजिरा किल्ला १७ व १८ व्या शतकांतील मराठ्यांना अखेर पर्यंत जिंकता आला नाही.

शिद्दी

शिद्दी लोक उत्तम दर्यावर्दी असेच लढाऊ शिपाई होते. व्यापारात जरी त्यांनी नांव कमावले नाही, तरी अहमदनगरच्या निजामशाहीत ते उत्तम नाविक सत्ता म्हणून गाजले. त्यांच्यात राजा नव्हता. आणि त्यांचे राज्य अल्पजन सत्ताक होते. प्रथम ते अहमदनगरची निजामशाही व विजापूरची आदिलशाही यांचे नोकर होते. पुढे ते मोगलांचे नोकर झाले. त्यांचा बळकट किल्ला मात्र मराठ्यांच्या डोळ्यात सतत खुपत होता. छत्रपती शिवाजी आणि संभाजी हे सुद्धा तो किल्ला जिंकू शकले नाही. १६८९ मध्ये रायगड पडला. आणि संभाजीच्या मृत्यू-नंतर मराठेशाहीसा अवकळा आली त्यामुळे शिद्यांना रान मोकळे सापडले. व ते अधुन मधुन घाटावर हल्ले करू लागले. शिवाजीने त्यांच्या पासून जिंकलेला प्रदेश

त्यांनी परत घेतला. इतकेच नव्हे तर त्यांनी रायगड व मदनगड तसेच अंजनवेल हे किल्लेही घेतले. मोगल सेनापती मात्करखान याला मदत करून रेवस व थळ ही महत्त्वाची बंदरेही जिंकली. त्यामुळे पेण नदीमधील नौकानयन आणि कुलाबा यांच्यावर त्यांचे वर्चस्व राहिले. पोर्तुगीजांच्या बरोबर त्यांनी मराठ्यांचा बराच प्रदेश जिंकलेला होता. त्यामुळे मराठ्यांशी दीर्घकाळ त्याचा झगडा चालू राहिला. कुदेरी येथे सिद्दी-सुरूर हा त्याचा मुख्य अधिकारी होता

ब्रह्मेंद्रस्वामी

ब्रह्मेंद्रस्वामी एक परमहंस असून छत्रपती शाहू व बाळाजी विश्वनाथ, बाजीराव पेशवा यांचा गुरू असून १८ व्या शतकातील एक महत्त्वाची व्यक्ति होती मराठ्यांचे सरदार त्यांच्या पत्न्या व शिद्दी यांच्याकडे त्यांचा पत्रव्यवहार असे. शिद्दी सुरूरकडून स्वामीने १७०८ व १७०९ मध्ये[1] चिपळूण जवळील पेठे व आंबडस ही गांवे मिळविली. या शिवाय देश व कोकणांतील काही खेडी-स्वामीने मिळविलेली होती १८ व्या शतकाच्या सुरूवातीपासून जवळजवळ पाव शतक स्वामीने चिपळूण जवळील खाडीपलीकडील परशुराम मंदिरात मुक्काम केला होता. अंजनवेल किल्ल्यात त्यावेळी सिद्दी साद नावाचा अधिकारी होता. त्याचे व स्वामीचे निकट संबंध होते. पेठे व आंबडस हे सोडून डारले महाळुंगे व लायसी ही गांवे स्वामीकडे होती. परशरामाचे मंदिर व काही इनाम गांवे सिद्दि-च्या राज्यात होती. स्वामीचा खजिना व साठे रसाळगड किल्ल्यावर होते व हा किल्ला सिद्दीच्या प्रदेशाच्या अगदी जवळ होता. सिद्दी साद हा सिद्दीचा शूर सेनापती असून अंजनवेल व गोवळकोट किल्ल्यावर प्रमुख होता. सिद्दीच्या त्याचे शत्रू असलेल्या आंग्र्यांशी झटापटी होत. त्यामुळे जनतेला फार त्रास होई.

हत्ती प्रकरण

आपल्या शापादपी व अध्यात्मिक सामर्थ्यावर स्वामी नित्य राजकारणात लुडबूड करी. कोकणामध्ये भांडणाऱ्या पक्षात तो स्वतंत्र न्यायाधिशाची भूमिका घेई. त्यावेळचे कोकण अनेक सरदाराच्या प्रदेशात विभागले गेले होते, सावनूरच्या मुसलमान नबाबाने अंजनवेलचा सरदार सिद्दीसाद याला एका हत्तीची भेट दिली होता. हत्ती सांवनूरहून अंजनवेलीस आणण्यास अनेक राज्यांची दस्तके (परवाने) मिळविण्याची आवश्यकता होती सिद्दीसाद व सावनूरकर नबाब दोघेही स्वामीचे परिचित असल्यामुळे व स्वामीला नेहमी स्वतःचे महत्त्व राखायचे असल्यामुळे स्वामीला वचन दिले की तुमचा हत्ती मी सुरक्षित आणून पोहोचविती. सिद्दी व आंग्रे यांचे हाड वैर होते. दोघांच्या सरहद्दीजवळील माखजन येथपर्यंत हत्ती सुरक्षित आला. तेथेच आंग्र्याची चौकी असल्यामुळे त्यांनी हत्ती अडविला दोन्ही

४.

पक्षांची तेथे जुंपली. आंग्र्यांनी हत्ती पकडून जयगडास नेला. सिद्दी सादाला वाटले स्वामीने विश्वासघात केला.

परशुरामावर सिद्दीचा हल्ला

फेब्रुवारी १७२७ मध्ये सिद्दीसादने परशुराम मंदिरावर हल्ला केला व तेथे व्यवस्था पाहाणाऱ्या कारकुनांची घरे लुटून मूर्ती भ्रष्ट केल्या. आणि पैसे मिळविण्यासाठी चिमाजीपंत भागवत, बापूजी तांबे व लखमोजी कोठावला यांना खूप चोपले. कित्येक भांडी दोन तोफा, एक घंटा दाराची चौकट, धान्य व सुवर्णालंकार मिळून २५ हजार रु. किंमतीचा माल त्याने लुटला. स्वामीने सिद्दी याकूतकडे तक्रार केली. याकूतने सिद्दी सांदला बोलावून त्याची हजेरी घेतली व लुटीचा[२] माल परत केला.

सैनिकी स्वाऱ्या

कोकणातील लहान लहान राज्ये सतत आपसात लढत असतात. सिद्दी व आंग्रे नेहमीच एकमेकांविरुद्ध सज्ज असत. शत्रूप्रदेशातील नित्याच्या स्वाऱ्यामुळे प्रदेश उद्ध्वस्त होई व तेथील प्राणी व सामान्य जनता यांना त्रास होई सन १७३३ मध्ये जंजिरा युद्धात बाजीराव पेशवा राजापुरी होता. त्याने पुरंदरे यांना एका पत्रात लिहिले. "काही काम करून घेण्यासाठी प्रचंड पैसा खर्च करावा लागतो, घाटावर जिथे आम्ही ३ रु. देत होतो. त्याठिकाणी येथे ५ रु. द्यावे लागतात. भविष्यकाळात काय लिहिले आहे. ते काही सांगता येत नाही. मुसळधार पाऊस पडतो आहे. आणि रात्रही अंधेरी आहे. भीति वाटते की विशाळगडाला औरंगजेब बादशहाची फजिती झाली. तशी आपली होते की काय."[३] खेड्याखेड्यातही झगडे होते. काही खेड्यातून दुहेरी अंमल होता. कोकणातील या सतत स्वाऱ्यांच्यामुळे सरदारवर्ग नेहमी कर्ज बाजारी असे. सावकारांच्या नरकांत मी कुजतो आहे.' असे बाजीरावाने एका पत्रात लिहिले होते.[४]

कर आणि वसुल्या

एक केंद्रसत्ता नसल्याने छोटे छोटे सरदार सामान्य माणसापासून त्यांना हवे तेव्हा पैसे गोळा करत. ह्या करांच्या ओझ्याखाली सामान्य माणूस भरडून निघे. लोकांना अनेक कर भरावे लागत होते. यातील काही करांना पट्टया म्हणत तर आयत्या वेळी पैसे किंवा धान्य रूपाने जी सक्तीची वसुली केली जात असे तिला रोखा म्हणत. स्वामीची गांवे पेठे, आंब्रडस येथे हा धोका शिद्याकडून नेहमी असे. यासाठी स्वामीच्या कमाविसदारांनी या खेड्यांच्यावर संकटपट्टी नावाचा कर बसविला होता. या करासाठी घरटी ३ रु. वसुल केले जात.[५] कोकणांत शिद्दीच्या सरहद्दीवर असलेल्या गावांना नेहमी धोका असल्याने पेशव्याने शामल-

हबशी किंवा सिद्दीपट्टी या खेड्यावर वसविली होती.[६] स्वामीला आपल्या खेड्या-बद्दल-डोरले आणि महाळूंगे ४२ रु. भरावे लागत.[७] एकदा गांवातून शिद्दीच्या लोकांनी तेल व काथ्या वसुल केला.[८]

वेठबिगारी

संन्यासी असूनही स्वामीकडे इनाम गांवे असल्यामुळे स्वामीला कोकणांतील एक सरदारच समजले जाई व त्यामुळे त्यांचा संबंध इतर सरदारांशी येई. स्वामी व शिद्दी यांच्यात कामगारांची देवाणघेवाण होत असे. राजपूरीच्या शिद्दीला पाथरवट हवे होते. स्वामीने मल्हारजीच्या नेतृत्त्वाखाली पाथरवट पाठविले. पण त्या पाथरवटांना भीती वाटू लागली. शिद्दी आपल्याला पैसे न देता वेठे म्हणून वापरेल[९] पण स्वामी सुध्दा वेठबिगारी करीत असे.[१०] पेशवाईच्या सुरवातीस वेठबिगार पद्धत होती. व त्यामुळे गरीब वर्ग आणि कामगार त्यांना त्रास होई. कित्येकदा वेठे न मिळाल्याने माल पडून राही. युद्ध काळात सक्तीची वेठबिगारी असे आणि वेठ्यांना अन्न व युद्ध साहित्य सक्तीने न्यावे लागे.[११]

चोऱ्या

लढाया व स्वाऱ्या म्हणजे समाजाला लुटायला व चोरायला अनिबंध परवानाच असे. बारीक सारीक चोऱ्या तर नेहमीच होत गुरे, फळे, किमती वस्तू व धान्य यांची चोरी होई. शिद्दीची माणसे आंबे व फणसही चोरीत. जयगडच्या किल्लेदाराने स्वामीला कळविले की नायसी येथे ८०० आंबे झाडाला लागले होते. त्यापैकी शामलाने अर्धे नेले.[१२] जंजिऱ्याचे युद्ध चालू असताना शिद्दीच्या लोकांनी तिसंगी खेड्यावर हल्लाकरून स्वामीच्या मालकीची १११ गुरू पळविली[१३] एकदा स्वामीने आंग्र्याकडे तक्रार केली की स्वामीची २५० गुरे शिद्दीच्या लोकांनी पळविली,[१४] १७३२ मध्ये स्वामीने सेखोजी आंग्र्यांकडे तक्रार केली की पूर्ण-वाड्च्या किल्लेदाराने स्वामीच्या महाळुंग्याच्या मळ्यातून फणस पळविले.[१५] गवत आणि गुरांचे खाद्य यांच्या चोऱ्या तर नेहमीच होत. दुष्काळ आणि अवर्षण यांच्यामुळे चोरीकडे प्रवृत्ती होई[१६]

खेडुतांच्या विवाह समस्या

शिद्दीचे लोक इतकी दमदाटी करीत की सामान्य माणसाला बारीक सारीक बाबतीतही त्रास मोई. पेठ्याचा जयराम शिंपी शिद्दी अधिकाऱ्याच्या वजनामुळे गोवळकोटच्या दुसऱ्या शिंप्याच्या घराण्याशी विवाह संबंध जोडण्यास बळजबरी-मुळे तयार झाला होता. स्वामीला मुख्य शिद्दीकडून गोवळकोटच्या शिंप्याला ताकीद द्यावी लागली. चिपळूणच्या परसामाळी याने आपल्या कन्येचा विवाह लखा माळ्याशी ठरविला होता. अगदी लग्न होण्याच्या सुमारास अंजनवेलच्या

जिवा माळयाने परसा माळयावर दबाव आणला आणि निष्कारण विघ्न निर्माण केले. शिद्दीच्या लोकांची आपल्या खेडयातील ही लुडबूड स्वामीला बिलकूल नापसंत होती.[१७]

धार्मिक जुलूम व पळवापळवीचे प्रकार

आंबडसचा स्वामीचा नोकर देवजी गणेश मृत्यू पावला. गोवळकोटच्या सया बाकरेने बळजबरीने देवजीच्या पत्नीला पळविले आणि तिच्याशी लग्न लावले अशाच रितीने स्वामीचा एक लखा मोहिता नावाचा शेत मजूर गोवळकोटच्या फाजील महंमदने बळजबरीने पळविला[१८] खेडयातील बलुतेदारात तेली फार महत्त्वाचा असे शिद्दीच्या लोकांनी पेठ येथील तेल्याला बळजबरीने बाटविले. पण तो लोकांना न कळत आपल्या पूर्वीच्याच हिंदू देवतांची पूजा करीत राहिला. हे उघडकीस आल्यावर त्याला १५ रु. दंड झाला.[१९]

येथील एक अश्रित बापू जोशी स्वामीचे शेत पहात असता शिद्दीसादाने एका हुसेन मुलाण्याला जोशीची खोडी काढण्यास प्रवृत्त केले. हुसेन मुलाण बघत असलेल्या मशिदीच्या मालकीच्या शेतात मशागत करण्याबद्दल जोशीला १० रु. दंड झाला. १७३२ पर्यंत बापू जोशीला ४०० रु. जामीनकी भरावी लागली.[२०] पोर्तुगीजांच्या ताब्यातील प्रदेशातही सक्तीच्या धार्मिक खटल्यांनी लोकांना असाच त्रास होत होता.

उजाड खेडी

शिद्दीच्या जुलामामुळे आंबडस आणि पेठे येथील लोक गांव सोडून पळाले प्रत्येक गांवात बलुतेदार गांवाचा कणा असतो. त्याच्यातील एक जरी गेला तरी खेडयाचा क्रम बिघडून जातो. काही खेडयातून तेली पळून गेले, किंवा बेपत्ता झाले.[२१] अशाच रीतीने डोरले आणि महाळूंगे ही खेडी सन १७३३ मध्ये ओसाड पडली. शेतीत व्यत्यय आल्यामुळे दुष्काळाचे भय नेहमी राही यावेळचा एक गृहस्थ आपल्या पत्रात लिहितो. की-भविष्यांत काय लिहीले आहे याची सतत आम्हाला वाट पहावी लागली. ज्यांना वेतन मिळते त्यांना काल अनुकूल असतो. आजचा दिवस कसा गेला. उद्या कसा येईल कोण जाणे ! काळ गरीबावर मात्र सूड घेतो. आम्हाला घटका आणि पळे मोजावी लागतात. भविष्याविषयी कोणती आशा धरावी ? "[२३]

निष्कर्ष

त्यावेळच्या दफ्तरात हिंदुच्यावर शिद्दीने केलेल्या जुलूमाचे अनेक उल्लेख मिळतात. "हाबशाने कहर उडविला आहे." दुसऱ्या एकाने पेशवा बाजीरावाला लिहिले, कोकणांत हिंदूधर्म धोक्यात आहे.[२४] आपणच त्याचे रक्षण करावे, काही

खेडी जशी ओस पडली तशी काही खेडी संघटीत होऊन बंड करून उठली नोवेंबर १७३३ मध्ये परशुराम मधील खेडुतांनी बाजीराव पेशव्याला विनंती करून अंजनवेल व गोवळकोट घेण्याची विनंती करून १ लाख रु. देण्याची तयारी दाखविली[२५] सेखोजीलाही स्वामीने इशारा दिला की शिद्दी विश्वास घातकी आहे.[२६] छत्रपती शाहू व पेशवा यांना त्यासाठी सर्वसाधारण जनतेला शिद्दीच्या तडाख्यातून वाचविण्यासाठी कंबर कसणे भाग पडले. याचा परिणाम म्हणजे १७३ ची मराठ्यांची जंजिऱ्यावरील यशस्वी स्वारी. या स्वारीत शिद्दी पुरता उखडला गेला. व रेवसच्या लढाईत मृत्यू पावला हरिपंत फडक्याने एका पत्रात लिहिले आहे ' शिद्दी हा ! १०० रु. किमतीचा शालू कुरतडणारा उंदीर आहे[२७]

संदर्भ

प्रकाशित मराठी

१ पारसनीस, द. ब. - ब्रह्मेंद्रस्वामी चरित्र मुंबई १९०० (ब्रा. ब्र. च.)
२ सरदेसाई - पेशवे दफ्तर पुणे. १९३५ (स. पे. द.)
३ पुरंदरे, कृ. वा. - पुरंदरे दफ्तर खंड १ पुणे १९२९ (पु. पु. द.)
४ राजवाडे वि. का - मराठ्यांच्याइतिहासाची १९२१ साधने खंड-३ (राजवाडे)

प्रकाशित इंग्रजी

1 Tikekar : Sardesai Commemoration Volme
2 Sardesai : Selection from Peshsa Doflar Vois 33 and 16

अप्रकाशित मूळ साधने

डेक्कन कॉलेज ऐतिहासिक संग्रहालय (रूमाल/फाईल/पत्र) डे. कॉ. ऐ. स.

२ पा. ब्र. च. ले. पृ. २८६, ३२३
३ पु. पु. द. पृ. १०३, १०५
४ पा. ब्र च ले. पृ. ३२
५ डे. कॉ. ऐ. सं. २०/९१८
६ " " " " २०/११६ ; पे. द. ३३ ४२०
७ पा ब्र. च. ले. पृ २५३
८ " ब " " पृ. २४७
९ " " " " पृ ५९,३३
१० डे. कॉ. ऐ. सं २०/५४२
११ टिळेकर-सरदेसाई स्मारक ग्रंथ पृ. २८८
१२ डे. कॉ. ऐ. स. २० ६७७

१३ पा. ब्र. च. ले. पृ. २४६
१४ डे कॉ. ऐ. सं. २० ९२९
१५ राजवाडे खंड ३ ले. २४४
१६ डे. कॉ. ऐ. सं. १२ २३२
१७. डे. कॉ. ऐ. सं. १२/२३२ २०/७६५-७६६
१८. डे. कॉ. ऐ, सं. २०/७६६
१९. पा ब्र. च. ले. पृ. २४५
२०. डे. कॉ. ऐ. सं. १२/३९६
२१. पा. ब्र. च. ले. पृ. २४६
२२. डे. कॉ. ऐ. सं. १२/३४०, २०/७६६
२३. डे. कॉ. ऐ. सं. १२/१०८, २२६
२४. पेशवे दफ्तर ३३/९५ व १६/१६
२५. पु. पु. द. १/१०८
२६. पा. ब्र. च. ले. पृ, ३१०

अमृतानुभव परिभाषा

डॉ. बा ना. मुंडी

श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या "ज्ञानेश्वरी" ग्रंथाचे पठण पाठन गेली सात शतके सतत होत आहे. त्यामुळे ज्ञानेश्वरी चे वाचन सुकर, सोपे व्हावे म्हणून अनेकांनी "टीका" लिहिल्या तशाच 'परिभाषा' ही लिहिल्या कठिण शब्दांचे अर्थ, अमर कोशाच्या धर्तीवर प्रतिशब्द, किंवा अशाच प्रकारचे लेखन पुष्कळच झाल्याची नोंद आहे. असे ग्रंथ निरनिराळ्या ग्रंथ संग्रहालयांत आहेत[1] ज्ञानेश्वरीच्या मानाने 'अमृतानुभव' हा ग्रंथ 'निख्खळ ज्ञानाचा' सर्व सामान्यांच्या आटोपाच्या पलीकडला. त्याला 'अंतरंगि अनुभाविएच' समजण्यास समर्थ. 'नाथ पंथीचा दंशु' त्यांत पदोपदी उतरलेला. अशा या ग्रंथाच्याच सुलभी करणाच्या साधनांची वस्तुत: आवश्यकता. शब्दार्थ, परिभाषा हे प्रारंभिक साधन. ज्ञानेश्वरी प्रमाणे अमृतानुभवाच्याही तितक्याचे विपुल प्रमाणात परिभाषा असावयास हव्या होत्या. तशा असल्या तरी आज उपलब्ध मात्र नाहीत. वस्तुतः ह्या ग्रंथाच्या पाठकांची संख्याही ज्ञानेश्वरीच्या मानाने कमीच असणार. शब्दार्थ कोष परिभाषाही त्याच बेताने माझ्या शोध कार्यात मला अशी मोजकी दोन पाने उपलब्ध झालीत. इतरत्र शोध घेता भा. इ. सं. पुणे संग्रहांत एक अमृतानुभव परिभाषा[2] असल्याचे दिसले. पु. म. ग्रं. संग्र. मुंबईच्या हस्तलिखितांच्या नामावलीत तशी सांपडली नाही. प्राच्य ग्रं. सं उज्जैनीच्या संग्रहातही दिसला नाही इतरत्र असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

भा. इ सं. मंडळातील प्रतीची एकूण पाने. १०, आकर ४ × १$\frac{१}{२}$. कागद देशी, शाई काळी ; क्रमांक ५०/५७ लेखकाचे तसेच प्रतकाराचेही नांव नाहीच, काळ स्थल याची ही नोंद नाही. पोथीच्या सामान्य परीक्षणावरून ती १५०/२०० वर्षापूर्वीची तरी असावी. शेवट पुढील प्रमाणे आहे:

सर्वाधिष्टान स्वरूपे । इति अनुभवामृत शब्द पर्याये दशम प्रकरणं ।

---

(१) भा. इ. सं. मंडळ पुणे यांत एकण सात. म. ग्रं. संग्रहालय मुंबई येथे एकूण आठ. पुणे विद्यापीठात मराठवाडा विद्यापीठात. माझ्या स्वतःच्या संग्रहात. श्री सु. ग्र. जोशी पुणे यांच्या जवळ, अशा अनेक प्रति. श्री. खरे यांनी प्रकाशित वाईप्रत ही सर्वाहून वेगळीच.

(२) क्र. ५०/५७ श्री बर्वे संग्रह

समाप्तोयं ग्रंथ : । श्री रस्तु ॥६॥ या ग्रंथाचे स्वरूप लक्षांत यावे म्हणून पुढे पहिल्या प्रकरणाचा भाग देत आहे :– (मुळानुसार)

' श्री गणेशाय नमः । अथामृतानुभव परिभाषा । प्रथम प्रकरण । जनके । कारणे । मूळिके । आद्ये ।१। चारु स्थळि । स्वस्वरूपि । येकाहारि । एकरूप ।२। पांगे । नाहि पणे ।३। साकारे । प्रत्यक्ष ।४। आळ कि ...... ।५। झोका लागो । ढका ।७। वैसणे । असणे । लेणे । मिरवणे ।८। भांगतया थाव कार्ढी भांगास्तव । अद्वैताचा । शिव शक्तिचा ।९। उवाये । उत्कर्षे । मांडली आहुति । व्यापिली ।११। घरवाते । गृहस्थपणे । मोहकी । नेटकी । सेजे । ज्ञान शयनि । दंपत्य । उभय । विपत्यें ॥ कदाचित ॥ घरवात । शिवशक्ति पण ॥१४॥ वाहाणी ॥ प्रवाहि ॥ आधाधि ॥ अधि अधि ॥१५॥

यांतील अधोरेखित शब्दार्थ लक्षणीय —

माझ्या संग्रहातील दोन भाषा टीकापैकी एकीचे केवळ सुटे पान उपलब्ध आहे. मुळानुसार ते पुढील प्रमाणे :–

श्री दत्त प्र ॥ प्रकरण ६ श्री गुरु ॥ नसये० नसाटवो० घसवटे० झीज ॥५॥ पारुषो० लोपा० ॥ ६ ॥ वीपावो० कदाचीत ॥९॥ केउते० कोण्हीकडे० माया० मावा० हेकु० बाळक ॥११॥ निमीष० लादण० उन्मेष० उघडण० ॥१२॥ अप्लवीली० बुडाली ॥१३॥ पाहे० व्यापे० सुजे० दीसे ॥१७॥ वांसोवे० वृथा० आहुना० रात्रदिवस ॥२०॥ ईती अष्ट० ॥६॥ श्री गुरु ॥ चापे० पुष्प ॥३॥ सेजार० शया ॥४॥ दिठीवोयाचा० कापुराचा० नागरू० सुंदर० ठेवा० आकार० कोरि० चांगला ॥ ॥ आफुट० नीघोट० सेवते० सेवतिचे फुल० उपलवीजे० गणीजे ॥७॥ वाखावी० मूळ० सुनी० घालनी ॥१०॥ त्रीलीगा० त्रिविध ॥११॥ वापे० घाली ॥१३॥ परोते० वेगळे० ।१४॥ उजू० समोर ॥१७॥ वरिखणे० वहुडे० राहे ॥१८॥ प्रचारू० नीस्तेज०

हा पद येथेच अपास मधेच सांडला आहे पुढे "श्री दत्तात्रय जनार्दन" असे दोन तीन वेळ लिहिले शवटी "हरि मनोहर याचे ७३" असा शेरा आहे. हे हरि मनोहर दत्तनाथ उज्जयिनी करांचे परंपरित । वगज त्यांना ग्रथ संग्रहाचा नाद होता. त्याच्याकडील वहूतेक सर्व लहान मोटया हस्तलिखित ग्रथावर तशाच सुटया पानावर स्वतःचे नांव व क्रमांक घातलेला आहे गळाठयांत या प्रकरणाची इतर पाने असतील, ती सांपडतील तेव्हा खरी.

माझ्या संग्रहातील अमृतानुभव परिभाषेची दुसरी दोन पाने थोडी निराळ्या स्वरूपाची आहेत. पोथीचे पान ४५ १–२ व ४६/१ असा दीड पानी मजकूर आहे. आकार ८" × ४", ओळी ११ आहेत. या पानांत अनुभवामृताच्या षष्टम प्रकरणाच्या शवटल्या भागाची मराठी गद्य टीका आहे. ती संपल्यावर पुढे याच-

प्रकरणाचा शब्दार्थ दिला आहे. व या दीड पानांत तो संपला आहे. ही टीका कोणाची आहे ते दिलेले नाही. मूळानुसार तो भाग पुढीलप्रमाणे :—

" ... होउन दुर्दिन जो तो होतो ।। आन तेच अभ्र गेले तर दुर्दिन जो तो जातो तैसा शब्दासवे महाप्रलय जो तो होतो ।। तैसा शब्दासवे महाप्रलय जो तो जाला ।। या विषई श्रुति हि आहे ।। वाचा रंजणं विकारो नामधेयं मृतिकेत्येव-सत्यं ।। यास्तव जगाचा उद्‌भव आणि उपसंव्हार वाचारंभण मात्र आहे ।। येथे शब्दखंडन समाप्त जाले येणे करून हेच सिद्ध केले कि शब्द समंधातीत आत्मासिद्ध सच्चिदानंद आहे ।। आतां पुढे याचे दृढिकरण अज्ञान खंडन बोलिले आहे ।। इति श्री अनुभवामृते श्री ज्ञानेश्वर विरचिते शब्दखंडनं नाम षष्ट प्रकरणं संपूर्णमस्तु ।। षष्ट प्रकरण संख्या ९५३ ।।

यानंतर पुढे लगेच शब्दार्थ दिले आहेत :—

श्री वस्तु० पदार्थ । सधर० थोर । अमूर्ति० निराकार । विशदु० स्वच्छ । अव्यक्त० माया । अंश० विश्व । उद्योत कारू० प्रकाशक ।।३।[ते० वस्तु ।।४।। कलिकटा० कलह । शिक्षा० शिक्षक ।।५।। नाथिले० लटिके । तीन कवडे० पैका ।।६।। कुमारू० बालक । उभरी० प्रवेश । पंचाक्षरी० मंत्रज्ञ । द्रोहो० द्वेष । बोला० शब्दा । विरुद्धा० विपरीत ।।१०।। उपेगा० उपयोग ।।१३।। विषिखो० विषय ।।१४।। केडते० कोठे ।।१५।। निद० निद्रा ।।१६।। दिवो० दिवस । समारक० सूचक ।१८। कीर० निश्चय ।१९। खेव० क्षणी ।२०। उदो० उदय ।२१। चेने० जागने ।२२। निरुती० खरी ।२३। जाडपे० बालक ।।२४।। सीत० दोरी । धनवई० धनुष्यधर्ता । तृष्णिका० मृगजल । अविद्येसी० विषई ।२६। वलघी० प्रवेश । आथी० आहे । आगी० अग्नी । गंधर्वनगरे० गगनी विचित्र भास । कीर० निश्चय ।२८। सोसू० प्रयत्न ।२९। पाडे० समान ।३०। सतुके० प्रत्यक्ष ।३१। बोडंबरी० धातु-वांद ।।३२।। पर्यल० वाढीले अन्नपात्र । आरोगीजतु० जेवन जेवो । नुमंडे० न दिसे । वोल्हासु० आद्रता ।।६४।। अगरातली० सेतपैले ।६५। घोरवारे० प्रयत्न ।६६। टवाले० मिथ्या ।३७। अनिर्वाच्य० बोलवेना । दिवागण० शपथ । घटाभावे० घट नसता । अंकित० चिन्हित ।४० प्रमा० प्रमाण । मायावि० मोहिनी । अभावी० नाहिपण ४२। हा तुक्सी० हात घाली ।४६। सावल० पाहारे । हालनि० मारण । थोथोटाव० श्रमी होय ।४४। पानं० आशन ।४५। तवका० आवेश । तर्का० शब्दा ।४६। वायील० धरील ।४७। गुढशा० टोंगल्यात ।४८। मोदला० पुतला ४९। परतु० मागे परतन । तांतु० तंतु ।५०। खोले० पदर ।५१। मसो० शाही । पुश सुधाकर० चंद्र ।५४। खवणे० पडिसाद ।१९। उन्मेख० स्फूर्ति ।६७। रससोय० स्वाद ।६२। चे ताते० चैतन्याते ।६५। साचा० कोरा कागद ।६७। प्रतिषेधके० निषिद्धवचने ।६९। निमाले० प्रेत ।७०। थिता० सिद्धा ।७१। मोहरा० सन्मुख ।

संहारा० नाश। खदिया० सहज।७५। निगे० प्रवेश करी।७७। आपणापया० आपणास।८०। ठाकी० लाग।८१। सुये० घाली।८२। कसी० पारख। के० कोठे।८४। दुवाड० कठीण।८७। सुरीया० सुरी। उगाणे प्राण।९०। उमसु० बीसावा।९४। दिवि० दिवटी। दिवो० दिवस।९५। पखी० पक्षी।९७। भागु० विभागासि। अवंता० खरवणे।९८। सपडपे० भास। लेपे० चित्र।१००। निमाला० नाश। दुर्दिनुं व्यर्थ।१०२। इति षष्ट प्रकरण समाप्त ॥६॥ श्रीरस्तु."

या पोथीतील टीकेचा कर्ता कोण हे स्पष्ट नाही. अनुभवामृताच्या अलीकडल्या काही गद्य टीका उपलब्ध आहेत. टीकाकारानेच "शब्दार्थ' दिले की काय ते कळण्यास साधन नाही. अशा इतर "परिभाषा" असतील त्यांचीही ज्ञानेश्वरी परिभाषांप्रमाणे नोंद घेणे इष्ट. माझे एक जेष्ठ मित्र श्री. सक्सेना यांनी अनुभवामृताचे हिंदीत रूपांतर केले असल्याची नोंद मी येथे करतो. अशा अन्य भाषीय उत्सुक अभ्यासकांना अशा परिभाषांचा निश्चितच अतिशय उपयोग व साह्य होणारे आहे.

❀ ❀ ❀

पोतनीस घराण्याची कामगिरी

—ब. र. पोतनीस

श्रीशिव छत्रपतीच्या अंतःकरणास मराठी स्वातंत्र्याची व परकीय सत्तेपासून भारतीयास मुक्त करणाऱ्याची प्रेरणा देण्याची पुण्यश्लोक मातोश्री जिजामातासाहेब व त्यांचे पिता शहाजी राजे भोसले ह्यांनी बहुमोल कामगिरी केली.

शहाजी राजे भोसले विजापूराकडील सरदारात असतांना त्यांची व दौलताबाद कडील मलिकांबर व जाधवराव यांचे युद्ध झालेल्या लढाईत शहाजी राजे विजयी झाले त्यांचे बरोबरील लढाईत बाजी प्रभू (बाजी मुरार) हे उभयता मातबर कर्तव्याचे होते.

बाजी मुरार यांनी आपल्या शूर मावळ्यांच्या साहाय्याने मोगलाचा मोड केला. त्या वेळचा बाजी मुरारचा पराक्रम महमंद आदलिशाहाच्या लक्ष्यांत येऊन त्यांनी -त्यास (बाजी मुरार) उमराव हा बहुमानाचा किताब दिला, परंतु परकीय सत्तेत भारतीयास उच्च मानाचे स्थान मिळाले नव्हते. श्रीशिव छत्रपतीच्या सेवेत ते प्रतिष्ठा पावले व ते शिवाजी महाराज्यांचे "मावळ्याचे सरदार" म्हणून मराठी स्वातंत्र्यांत होते.

बाजी मुरारच्य मर्दुमकीचा-साहसाचा-मुत्सद्दीपणाचा वारसा त्यांचे ज्येष्ठ पुत्र "वीररत्न सरदार मुरार बाजी देशपांडे" यांनी पुरंदर किल्लयाचा मोगलाचा वेढा लढविताना ता २८ मे १६६५ रोजी देहार्पण केले. त्याने आपली प्रभावी समशेर गाजवून पुरंदरच्या लढ्यात आपले नाव अजरामर केले, -त्यांचे ह्या कार्याचे चिरकाल टिकणारे "स्मृतिचिन्ह" स्मारक पुरंदरचे किल्ल्यावर त्यांचा पुतळा उभारण्याचे महान कार्य श्रीमंत शिवशाहीर बाबाहेब पुरंदरे यांनी केले. "वीररत्न सरदार मुरार बाजी देशपांडे-स्मारक समिती पुरंदर" यांचे तर्फे. त्यांचे पुतळ्याचा अनावरण समारंभ ता. १९ एप्रिल सन १९७० रोजी सकाळी १० वाजता पुरंदर किल्ल्यावर मोठा इतमानाने सदर्न कमांडचे प्रमुख लेफटनंट जनरल जी. जी बेवूर यांचे हस्ते झाले.

बाजी मुरार यांचा कनिष्ठ पुत्र माहादाजी बाजी. हे शिवाजी महाराजांचे खासनवीस व पोतनवीस म्हणून व त्यांची गणना सरदारात व राजमंडळात होती.

इ. स. १६९३ मध्ये मराठ्यांनी मोगलाकडून सिंहगड किल्ला जिंकून घेतला. त्यावेळी कष्ट-मेहनत-कामगिरी उत्तम प्रकारे बजाबलेली होती हे आमचे

कडील सनदेवरून व त्यांच्या अन्य कामगिरीबद्दल त्यांना महाड व सातारा प्रांतांत मिळालेल्या इनाम गांवच्या सनदावरील दिसून येते.

संभाजी महाराजांनी माहादजी (महादेव) वाजी यांस पोतनीस केले.

माहदाजी वाजी ह्यांचे पुत्र यशवंतराव महादेव इ. स. १७०४ मध्ये छत्रपतींचे कोशाधीकारी व खासनीस म्हणून नेमणूक झाली.

श्री शाहू छत्रपती मोगलाचे छावणीतून आल्या नंतर यशवंतराव महादेव यांचे कारस्थानास बाजीराव पेशवे ह्यांनी रायगड किल्ला हस्तत केला. शाहू महाराजांनी -रायगड किल्ला-लिंगाणा वगैरे किल्ले इत्यादि महत्त्वाच्या ठिकाणचे मामलातीचे सर्व कारभार यशवतराव महादेव याजकडेस दिला.

श्री शाहू छत्रपतीच्या अंतःकाळी पुढील व्यवस्था ठरविण्यांत यशवंतराव प्रामुख्याने होते व (शाहू महाराजांचे) दत्तक प्रकरणी वगैरे राजकारणात त्यांना महत्त्वाचे स्थान होते असे "थोरले शाहू महाराज चरित्र" यातील लेखावरून येते.

कॅप्टन गोर्डन ता ८ रोजी त्याची व शाहूची भेट होऊन तो ३० जून (१९३९) रोजी मुंबईस परत निघाला त्याने नानासाहेबांची भेट घेतली ता. १० (१७३९) रोजी यशवंतराव (महादेव पोतनीस) जिवाजी खंडेराव (चिटणीस) व फत्तेसिंग भोसले यांच्या भेटी घेतल्या (पुरंदर दप्तर भागी पान ४१ (१९०)

श्री शाहू छत्रपतींचे ते 'राज मुद्राधिकारी" म्हणून त्यांची मोहर

शाहु श्री राज शाहू चरणी दृढभाव माहादेव सुत यशवंतराव

ऑगस्ट १२ (१७५०) तारखेस पुण्याहून रामराजाची स्वारी साताऱ्यास निघाली तेव्हा सदाशिवरावाने रामचंद्र मल्हार यास शाहाणे कर्ते समजून स्वारी-बरोबर घेतले-शिवाय गोविंदराव चिटणीस व येशवंतराव पोतनीस वगैरे हुजुरचे कारभारी व त्रिंबक सदाशिव ऊर्फ नाना पुरंदरे हे स्वारी बरोबर होते. (मराठी रियासत-पूर्वार्ध पद्यविभाग पान २४६)

यशवंतराव पोतनीस यांचा बाळाजी विश्वनाथ प्रधान आदीकरून राज-कारणातील प्रमुख व्यक्तींशी अत्यंत विश्वासातील पुरुषांचे समावेश मराठी राज्याचे राजकारणात प्रामुख्याने-बरोबरीने भाग होता व त्यांना महत्त्वाचे कार्यात महत्त्वाचे स्थान हाते असे ऐतिहासिक संकीर्ण साहित्य संकीर्ण पत्रे-मराठी इति-हासाची साधने-पेशवे दप्तरातील निवडलेले कागद-पत्र व पुरंदरे दप्तर १-२-३ वगैरे ऐतिहासिक लेख संग्रहावरून यशवंतराव महादेव यांचे मराठ्यांच्या स्वराज्य कार्यात प्रामुख्याने पुढाकार व महत्त्वाचे स्थान असलेले दिसून येते.

यशवंतराव महादेव यांनी इ. स. १७०४ मध्ये छत्रपतीचे खासनीस व कोशाधीकारी म्हणून स्वराज्यात प्रवेश केला. इ. स. १७७३ ते १७६३ म्हणजे

मृत्युपर्यंत रायगड वगैरे मामलतीचा कारभार त्यांचेकडे होता.

यशवंतराव महादेव इ. स. १७५३ मध्ये त्यांचे उरवडे ता. मुळशी येथे निधन झाले, व त्यांची समाधी तेथे बांधलेली आहे.

"सरदार यशवंतराव महादेव पोतनीस" स्मृतिदिन दरवर्षी दि. २५ डिसेंबर रोजी सर्व कुटुंबीय स्त्री-पुरुष एकत्र हजर राहून उरवडे येथे साजरी करतात.

यशवंतराव महादेव यांचे पश्चात त्यांचे पुत्र विठ्ठल यशवंतराव पोतनीस यांचेकडे रायगड किल्ला व त्याचे परिसरातील किल्ले व मुलूख प्रदेशावर मामलतीचा कारभार पाहण्याचा अधिकार प्राप्त झाला. ते छत्रपतीचे खासनिशी व पोतनिशीही संभाळून होते.

रायगड वगैरे किल्ले प्रदेशातील नेमणूकीबाबत खास वेतन किल्ले हायेची आसामिया वगैरे बाबत.

झडती खर्चाचा बंद

झडती सरकार राजश्री विठ्ठल यशवंतराव खासनीस खु॥ सषा खमसैन मया व अलफ इलतकषील छ ६ माहे रमजान उर्फ जेदमास अवल साल तागाईत छ १५ माहे रमजान उर्फ जेदमास एकंदर

(इ. स. १०५६) मुदत माहे १२६११ शके १३७८ धानाराप संवत्सरे—जमा बेरीज

यैन नख्त रु ॥

१७५३०६

जमा यैवन श्रीमत पंतप्रधानपैकी मख्त रुपये

७३४४८

बेरीज यैवन पंतप्रधानपैकी मख्त रुपये

३०००० खासा वेतन दुसाला यो रुपये

४१००० किले हायेची नेमणूक साल मनफूर

२४४८ आसामिया व॥ साल गुप पैकी जमा

७३४४८

खर्चाचा बंद

किले हाय बेरीज

यैन नख्त रु॥ ये

१७०८६ ॥

(भा. इ. सं. मंडळ–लेखमाला ग्रेथील खासनीस हप्तरावरून नक्कल)

स. पु. क ,, झडती समान समसैन मया व अलफ
झडती सरफर राजश्री विठ्ठल यशवंतराव खासनीस
सुरससन समान खम सेन मया व आलफ
छ १६ माहे रमजान उर्फ जेद मास आबल
साला बागाईन छ ३० माहे रमजान येकूण
दुदन माहे १२ मे व १३ शके १६७९ ईश्वर नाम संवत्सरे
जमा बेरीज—ऐन मक्त रूपये ५९९१९

इ. स. १७५७ मध्ये छत्रपती शाहू महाराज व ईस्ट इंडिया कंपनी सरकार यांचेमधील तहाबाबत अटी ठरून त्याबाबतचे करार ईस्ट कंपनीचे किल्ल्यावरील मुख्यअधिकारी विलियम् अंर्डुज व सातारचे छत्रपती शाहूराजे तर्फे विठुलराव यशवंतराव व भगवंतराव खासनीस व पोतनीस यांचे मार्फत होऊन छत्रपतीशाहू राजे यांचे तर्फे विठुल यशवंतराव व भगवंतराव यांस अधिकार मिळाले होते ते सातारा गॅझेटियर मधील (Volume VI Pages 4-5-6-7) वरून दिसते[८]

रायगड किल्ला पेशव्यांनी पोतनिसाशी लढाई करून जिंकून घेतल्यावर विठुल यशवतराव हे शाहूनगर (सातारा) यथे छत्रपतीचे खासनीशी व पोतनिशी पाहात होते.

किल्ले सिंहगड येथील कारखानिशी विट्ठल यशवंतराव पोतनीस याजकडून बापुजी कमाजी याजकडे होती–

बाजीराव कमाजी कारखानीशीचे कामकाज देऊन वेतन पेशजीप्रमाणे पाववीत जाणे–(आज्ञापत्र) सनद रसानदी यादी

सया सबैन मया व अलफ मोहरम २ (इ. स. १७७६–७७)[९]

छत्रपती शाहू महाराज यांचे निधनानंतर छत्रपती रामराजे ह्यांचे अंमलात १७७३–७४ नंतर राज्यात बऱ्याच राजकीय घडामोडी झाल्या व अस्थिरता निर्माण झाली त्याची झळ विट्ठल यशवंतराव यांना भोगावी लागली ते हाल सोसूनही त्यांनी छत्रपती सातारचे महाराज यांचे सेवेत अंतर पडू न देता पूर्वंजापासून स्वराज्य सेवेचे घेतलेले व्रत त्यांनी शेवटपर्यंत अंगीकारले.

विठ्ठल यशवंतराव यांचे मृत्युनंतरही त्यांचे पुत्र भिवराव यशवंतराव व बळवंतराव हे छत्रपतीचे सेवेत होते.

यशवंतराव विठ्ठल पोतनीस हे छत्रपती सातारा व अक्कलकोटचे अज्ञान महाराजातर्फे अक्कलकोट संस्थानचा सर्व कारभार पाहात होते व त्यांची ती कामगिरी ब्रिटीश सरकार व सातारचे राजेसाहेब यांना समाधानकारक व प्रशंसनीय वाटली.

सातारचे छत्रपतीचे पिढीजाद पुरातन स्वामिनिष्ट सेवक म्हणून इतर संस्थानिका बरोबरीचे इ. स. १८१९ साली भिवराव विठ्ठ यशवंतरात विठ्ठल यांस दक्षिणेतील पहिल्या प्रतीचे सरदार म्हणून मान मिळाला.

प्रतापसिंह महाराजाचे छावणीत ता. ४ सप्टेंबर १८३९ पूर्वी ९३ दिवस राजवाड्यातील नोकर काही जवळचे नातेवाईक यशवंतराव चिटणीस व पोतनीस ही मंडळी लिंब गावात (सातारा) महाराजाशेजारी ठाण मांडून बसले होते प्रतापसिंहास सर्व परिवारासह ता. ७-१२-१८३९ रोजी काशी येथे नेले ती काशीची वनवासी मंडळी सन १८४८ मध्ये सातारा येथे दाखल झाली.

यशवंतराव विठ्ठल म्हणजे माझे पणजे व माझे आजोबा बाजीराव यशवंतराव व माझे वडील हेही सातारचे शेवटले राजेसाहेबांचे भवानी पेठ पुणे येथील बंगल्यात शेवटपर्यंत होते.

शिवछत्रपतीच्या स्वातंत्र्य सूर्योदयपासून ते त्याचे अस्तापर्यंत आमचे पूर्वजांनी स्वराज्य सेवा-जिद्दीने-निष्ठेने केलेली आहे.

रघुनाथराव पेशवे यांच्याकडील माणसांनी कोठुरे गावाकडून वसूल केलेली जबरदस्तीची खंडणी (लूट)

डॉ. चिं. ना. परचुरे

उपलब्धी :–नाशिक जिल्ह्यातील कोठुरे (परगणे–चांदवड; तालुका-निफाड) हे गांव बर्वे घराण्यातील लोकांच्या वस्तीसाठी पेशवाईच्या काळात प्रसिद्ध होते. आजही या गावात या घराण्याची वस्ती आणि वास्तू पाहावयास मिळतात. बाळाजी विश्वनाथाची पत्नी राधाबाई ही याच घराण्यातील असल्यामुळे थोरले बाजीराव यांचे हे मातुल घराणे होय. कोठुरे गावची जहागिरी याच घराण्यात आली होती. या घराण्याच्या आजच्या पिढीतील श्री. पद्माकर दामोदर बर्वे यांच्या सहकार्याने हा खंडणीसंबंधीचा कागद पाहावयास मिळाला.

कागदाचे स्वरूप :–हा कागद एकूण २० घड्यांचा असून त्याची प्रत्येक घडी सामान्यत: ७½'' × ५'' ची आहे. दुर्दैवाने कागदाचा मधलाच काही भाग (मजकुरासह) गहाळ झालेला आहे. उपलब्ध कागदाच्या दोन्ही बाजूंवर मोडी लिपीत खंडणी वसुलीसंबंधाचा हिशेब तपशीलाने मांडला आहे. या कागदावर कोणत्याही प्रकारची शासकीय निशाणी अगर अधिकृत शिक्का नाही; परंतु यातील बहुतेक सर्व नोंदी बारकाव्याने केलेल्या आहेत बरवे (बर्वे) घराण्याच्या कुलवृत्तांतात पृष्ठ २४ वर " शके १६९६ चे साली जगजीवन पवार व राजाराम गोविंद यांनी येऊन कोठुरे लुटून खंड वगैरे घेऊन फार खराबी केली " असा संदर्भ दिला आहे. ही बटना उपलब्ध कागदाशी मिळती असल्यामुळे त्याच्या अस्सलपणाबद्दल शंका राहात नाही. आणि लूटीसंबंधी बरीच माहिती उपलब्ध होते

काल :–सदरच्या कागदांत प्रारंभी खंडणी वसूल केल्याची मिती दिली आहे ती अशी ' मिती शके १६९६ जये नाम सवछरे अधिक वैशाख सुध १ सोमवार ता। (तागायत), सन ११८३ सु॥ आर्बा मया अलफ. . . . ' यावरून या लूटीचा दिवस इ. १७७४ महिना एप्रिल तारीख ११ असा निश्चित होतो.

तत्कालीन स्थिती :–पेशवाईच्या काळातील बारभाई कारस्थानाचा हा काळ आहे. नारायणराव पेशवे यांच्या झालेल्या दुर्दैवी खुनास रघुनाथराव ऊर्फ दादासाहेब बऱ्याच अंशी जबाबदार आहे अशी बऱ्याच मराठे सरदारांची समजूत झाली होती. यामुळे त्याच्या विरूद्ध या बारभाई कारस्थानाच्या हालचाली सुरू झाल्या. नारायणरावाच्या पश्चात रघुनाथराव आपणच पेशवे आहोत अशा समजुतीने वागू लागला. या वेळी बारभाईंच्या नशिबाने नारायणरावाची पत्नी गंगाबाई

हिला मुलगा झाला. अर्थात रघुनाथरावाचे हे अनधिकृत पेशवेपदही काही महिन्यांचेच ठरले. बारभाईंनी सातान्याकडून या लहान मुलाला पेशवाईची वस्त्रे आणविली आणि त्यामुळे रघुनाथरावाचा पेशवाईच्या वस्त्राचा हक्क कल्पनेतच राहिला. पण काही दिवस या परिस्थितीचा रघुनाथरावाने गैरफायदा करून घेतला आणि काही ठिकाणांहून लूट मिळविली. या कागदाच्या प्रारंभी रघुनाथरावाचा उल्लेख, "हिसेब श्रीमंत राजश्री ......पंतप्रधान," असा केला आहे. लूट करणारा हा रघुनाथरावाच्या पक्षाकडील असल्यामुळे ते शक्य आहे. मात्र याच कागदाच्या शेवटी खर्च दर्शविताना ......, 'भरणा श्रीमंत राजश्री...... दादासाहेब यांचे सरकारात '......असा म्हणजे प्रारंभी केलेल्या उल्लेखापेक्षा दुय्यम प्रतीचा केलेला आढळतो.

बारभाईंच्या कारस्थानाच्या काळातील ही लूट एक महत्त्वाची घटना आहे. माधवराव नारायण म्हणजे सवाई माधवराव यांची कारकीर्द सुरू व्हावयाची होती. पण 'पेशवे पदाचा अधिकार माझाच' अशा कल्पनेने रघुनाथरावाच्या हालचाली सुरू होत्या. आपल्याविरुद्ध असलेल्या व्यक्तींकडून किंवा गावाकडून अनधिकृत खंडणी घेणे हा अशा हालचालींचा एक भाग मानावा लागतो. पण रघुनाथरावाचे व बर्वे घराण्याचे वितुष्ट येण्यास आणखी काही विशेष कारण घडले होते काय ते या कागदावरून सांगता येत नाही. तसेच गोपाळ गणेश सारखे बर्वे घराण्यातील काही लोक रघुनाथरावाच्या पक्षाचे होते हे पण ध्यानात घ्यावे लागते आणि बर्वे घराण्यातील लोकांप्रमाणेच कोठूरे गावातील इतर लोकांकडूनही या प्रसंगी खंडणी वसूल झाली होती हे स्पष्ट आहे, म्हणूनच सर्वार्थाने विचार करता कोठूरे गावातील बर्वे आणि इतर लोकांकडून केलेली लूट, असेच या खंडणीचे वर्णन करावे लागते. कागदाच्या प्रारंभी म्हटलेच आहे, 'मौजे कोठूरे पा चांदवड गाव लूटून मग खंडणी करून यैवज घेतला.'

खंडणी किंवा लूट : सदर कागदावरून रघुनाथराव म्हणजे दादासाहेब पेशवे याच्या राजाराम गोविंद, हयातखान, त्रिंबक सोनदेव इत्यादी माणसांनी काही सैनिकांच्या साहाय्याने कोठूरे गावातील किमान २७ लोकांकडून एकूण रुपये ७९८०७८= ची लूट खंडणीच्या स्वरूपांत वसूल केली. ती तीन प्रकारे वसूल केली आहे.प्रथम पट्टीच्या स्वरूपात, पट्टी कमी पडली म्हणून अडान, ब्राह्मण इत्यादीं कडून आणि ती वसुलीही कमी पडली म्हणून कर्जाच्या स्वरूपांत ही रक्कम पुरी केली आहे. या रकमेत सदासिवभट मुळे याजकडील ८—ची रक्कमही अंतर्भूत आहे.

अशा प्रकारे या लुटीचा संक्षिप्त तपशील पुढीलप्रमाणे होतो –

प्रत्यक्ष लूट (पट्टीच्या स्वरूपांत)	– ७५१६८८=
अडान, ब्राह्मण किंवा कौ.ठी म्हणजे अभयपत्रे दिलेल्यांकडून	– २६०४॥८
कर्ज स्वरूपात	– २०३४।≡
वसुलमुले ज्याजती गुण सदासिवभट मुले –	८–
एकूण	७९८०७८=

वरील लुटीचा सर्व तपशील या कागदात दिला आहे. त्या तपशीलावरून कोणाकडून कोणत्या प्रकारची खंडणी वसूल झाली हे स्पष्ट कळते. उपलब्ध यादीतील २७ लोकांपैकी कोकणस्थ ब्राह्मण घराणी बरीच दिसतात. त्यावरून या गावात ब्राह्मण वस्ती अधिक असावी असे वाटते. बर्वे घराण्याची ५।६ घरे गावात होती. त्या प्रत्येक कुटुंबाकडून कमीअधिक प्रमाणात ही वसुली झाली आहे. लुकतुके हे कऱ्हाडे ब्राह्मणही या लुटीतून सुटलेले नाहीत. तसेच सराफी लोकांकडूनही अल्पस्वल्प वसुली झालीच आहे. विशेषतः बर्वे यांच्या ५।६ कुटुंबांकडून रुपये १५३२८८=ची वसुली झाली आहे. गणपतराव रामचंद्र (बर्वे) यांचेकडून सर्वात अधिक म्हणजे रुपये ७०१६।=ची वसुली झाली. या सर्व तपशिलावरून रघुनाथरावाचा या कोठुरे गावावरच रोष होता असे दिसून येते.

उपलब्ध माहितीतील अपुरेपणा :– कागदात २७ व्यक्तींकडून रुपये ४८५१८८=ची लूट केलेली दाखविली आहे. पण एकूण लुटीची रक्कम रुपये ७५१६८८=ची आहे. कागदांत नारो गणेश जोशी यांजकडील रुपये १५०० ची वसुली दाखविली आहे. त्यानंतरचा कागदाचा बराच भाग गहाळ झाला आहे हे दुर्दैव आहे. या गहाळ कागदात रुपये २६६५०८= च्या रकमेचा तपशील असला पाहिजे. पण ती रक्कम कोणाकडून व कोणत्या स्वरूपांत वसूल केली हे सांगणे सद्यःस्थितीत शक्य नाही. गहाळ झालेला कागदाचा भाग उपलब्ध झाल्यास, ज्यांचेकडून लूट केली अशा राहिलेल्या व्यक्तींची नावे व त्यांजकडील लुटीचा तपशील याबद्दल अधिक माहिती उपलब्ध होऊ शकेल.

जमेच्या तपशिलात लुटीतील वस्तूचा नामनिर्देश आढळतो. या तपशिलातील कागदाचा पहिला काही भाग (बहुतांशी सोने, रुपे इ० संबंधीचा) गहाळ झालेला आहे इतर तपशिलाप्रमाणे मोहोरा, सोने, रुपे, जडजवाहिर, कापड इत्यादी वस्तू आणि उंट व घोडे यांची लूट करण्यात आली होती.

खर्चाचा तपशील :– कागदात जमेप्रमाणे खर्चाचा तपशीलही तितक्याच बारकाव्याने दिला आहे. त्यावरून सदरची लूट करणारे आणि ती होत असता त्या व्यवहारास विविध प्रकारे साहाय्य करणारे अशा लोकांची माहिती मिळते. या लोकांत राजाराम गोविंद हा प्रमुख होता त्याचा दुसरा जबाबदार सहकारी

त्रिंबक सोनदेव बोदेगावकर हा होता असे दिसते. या दोघांना हयातखान, मनोहरपंत, व बळवंतराव यांचे साहाय्य झालेले दिसते. या सर्वांना अल्पस्वल्प प्राप्ती तर झालीच परंतु त्याचबरोबर स्वार, शागीर्द, भालदार, कारकून, पोतदार आणि सोनाराच्या कामगिरीबद्दल कसा खर्च झाला त्याचा तपशील कागदात दिला आहे. बर्वेकुल-वृत्तांतात उल्लेखिलेल्या जगजीवन पवार याचा उल्लेख मात्र उपलब्ध कागदातील मजकुरात नाही. खर्च वजा जाता बाकी रु. ५४।।=।।। अशी दाखविली आहे.

किरकोळ खर्चात शिवबंदी किंवा अंमल, वाणी, आणि विशेष म्हणजे रघुनाथराव नीलकंठ यास दिलेल्या मेजवानीचा खर्चही दिला आहे. हा रघुनाथराव नीलकंठ कोण व त्याची कामगिरी कोणती याबद्दल मात्र स्पष्ट उल्लेख आढळत नाही.

किमती – खंडणीच्या रूपाने ज्या वस्तूंची लूट झाली त्यांच्या किमती ठरविलेल्या दिसून येतात. त्यावरून इसवी १७७४ चे सुमारास त्यांच्या किमती किंवा दर कसे होते याची कल्पना येते. लूटीत बहुतेक प्रत्येकाकडून सोने आणि मोहरा घेतल्या होत्या. सोन्याचा भाव त्याच्या प्रतिप्रमाणे रुपये १३, १३।।, १४ व १५ असा लावला होता. मोहोर साधारणतः १ तोळ्याची होती व त्या सोन्याचा दर रुपये १५ च धरला होता. रुप्याचा दर प्रत्येक तोळ्याला १ रुपया होता. जडजवाहिराची लूट मोठ्या प्रमाणात झाली आहे पण त्या संबंधीच्या वस्तूंच्या किमती कशा केल्या हे या कागदावरून सांगता येत नाही.

वरील किमती वस्तूंवरोबरच लुटीत घोडी आणि उंट यांची पण नोंद आढळते. ५ घोडी आणि ३ उंटांचा हिशेब स्पष्ट केला आहे. उंटाची किमत १५० रुपये किंवा १७५ रुपये दर्शविली आहे. घोड्यांच्या किमतीबाबत मतांतर झालेले दिसते. ५ घोड्यांच्या नावाने रुपये २७२५ दाखविले आहेत. त्यावरून प्रत्येक घोड्याची किमत ५४५ रुपये व्हावयास हवी परंतु इतकी रक्कम मानण्यास लूट करणारे तयार नव्हते. त्यांनी ५ घोड्यांची किमत रुपये १५२५ ठरवून प्रत्येक घोड्याची किमत रुपये ३०५ निश्चित केलेली दिसते.

या कागदात वसुली दर्शविताना तोट्याची रक्कम, बाकीची रक्कम, दिलेली सूट इत्यादी संबंधीचा स्पष्ट निर्देश आलेला आहे. म्हणूनच पेशवेकालीन अर्थ-व्यवहाराच्या दृष्टीने हा कागद महत्त्वाचा वाटतो या कागदातील लूट पेशव्यांची रोजकीर्द किंवा रघुनाथरावाची रोजकीर्द यापैकी कोठे ना कोठे नोंदविलेली असावी या कल्पनेने पहाणी केली. परंतु या दोन्ही कीर्दीतून अजून तरी सदर लुटीची रक्कम जमा केल्याची नोंद आढळलेली नाही. यामुळे ही वसूल केलेली खंडणी जबरदस्तीची होती या विचारास पुष्टीच मिळते. हा अस्सल कागद सोबत दिला आहे. या प्रकरणाच्या इतरत्र काही नोंदी आढळल्यास त्यावर अधिक प्रकाश पडू शकेल.

श्री

हिसेब श्रीमत राजश्री—पंतप्रधान याणी राजाराम गोविंद वगैरे सरदार फौजसुद्धा पाठऊन मौजे कोठुरे पा। चादवड गाव लुटून मग खडणी करून यैवज घेतला इा। मिति सके १६९६ जये नाम सवछरे अधिक वैशाख सुध १ सोमवार ता———सन ११८३ सु॥ आर्बा सबैन मया अलफ जमा—रु॥

७०१६।= गणपतराव रामचंद्र

२००२॥– सोने तोले १३३॥. दर १५ प्रो

१०१० रुपे तोले १०१० येकून रु॥

२३०३॥≡ जवईर दागिणे सुमार ३१ बरहुकूम याद अलाहिदा येकून किमत ४८४० पैकी वजा तोटा कमित निमे धरली सबब रु॥ २४६१८= पैकी करार रु॥ २३७८॥= पैकी वजा बाबुराव भडे रु॥ ७५ बाकी

१५२५ घोडी रास ५ येकून किमत रु॥ २७२५ पैकी मजुरा दिले नाहीत रु॥ १२०० बाकी करार

१७५ उंट नफर १ किमत रु॥

———

७०१६।=

यासी तपसील

५००० यैन पटी

२०१६।= ज्याजती घेतले भरन्यामुले भरतीत

————

७०१६।=

२७३६॥ रघुनाथराव रामचंद्र रु॥ ३००० पैकी सूट रु॥ २६३। बाकी वसूल

१३५२ सोने तोले १०४ दर १३ प्रो

५२२ रुपे रुपये भार ५४५ वजा बारा माशाची कसर वजा २३ बाकी

६८७॥ जवईर दागिणे सुमार ९ येकून

रुा १४०० पैकी किमतीत तोडले
रुा ७१२। बाकी करार
१७५ उट नफर १ किमत रुा

२७३६।।।

५००० धोडो रामचंद्र

९३३।= जवईर दागिणे सुमार २ दोन येकून
किमत रुा १९०० पैकी वजा किमतीमधे
तोडले रुा ९६६ ॥ = बाकी करार

२५५७।≡ सोने तोले
१४४० किता तोले ९६ दर १५
किता तोले
६८२।।। किता तोले ४५।।.।. दर १५ प्रो
३२५ ॥ ≡ किता तोले २३।।२। दर १३।।। प्रा
१०८।।। ≡ किता तोले ७।।१।। दर १४ प्रा

२५५७। ≡ १७२।।।१

१३५९८ ≡ रुपे रुपये भार १३५९८ ≡ दर रुपयासी तोला येक प्रा
१२२३ किता १२७७ येकून रुा दरसेकडा रुा येकून
बाकी

१३६।. किता रुपे तोले १३६।. येकून रुा

१३५९८ ≡
१५० उट नफर १ येक किमत रुा

५०००

७५ बालकृष्ण गणेश विद्यमाणे राजश्री धोडो रामचंद्र रुपे
तोले ७५ येकून रुा

४००० अपा भट जोसी

७८३ रुपे रुपये भार ८१६ वजा बारा माशाची
कसर ३३ बाकी
३२०२ सोने तोले २१३।२।।१ दर १५ प्रो
रुा ३२१० वजा परत रुा ८ बाकी
१५ मोहोर १ येक दर १५

४०००

१५०० गोविंद भट केळकर सोने तोले १०० सेभर दर १५

६४० बापू भट लुकतुके १००० पैकी वजा सूट रु ॥ ३६० बाकी

५५५ सोने तोले ३७ दर १५ प्रो

८५ रुपे रुपये भार ८९ वजा ४ बाकी

६४०

१५०० अपाजी अनत

१०२८॥ सोने तोले ६८॥१ दर १५

४७१। रुपे रुपये भार ४९२॥. वजा तोल्याची कसर २०।. बाकी रुा ४७२। पैकी वजा फाजील रुा १ बांकी

१५००

१२०० हरभट केतकर

११०२॥ सोने तोले ७३॥ दर १५ प्रा

९७॥ रुपे रुपये भार १० सेभर वजा रुा २ ॥ बाकी

१२००

५०० मोरभट केलकर

३९५ सोने तोले २६।१ दर १५ प्रा

१०५ रुपे रुपये भार ११० वजा ५ बाकी

५००

४०० नारायेण भट काले

२४० ॥ =सोने तोले १६८॥ दर १५

१३४ रुपे रुा भार १४० वजा रुा ६ बाकी

२५। = नख्त रुा

४००

१५०० बालभट केलकर सोने तोले १०० से भर दर १५

३०० बालाजी माहादेव साठे सोने तोले २० दर १५

५००० रामभट डोगरे

३८३३ ॥ सोने तोले २५५ ॥ • ॥ दर १५
१२० मोहोरा सुमार ८ दर १५
८७५ ॥ . रुपे रुपये भार तोले ८७५ ॥ .
१७१ नख्त रुा

५०००

१००० कृष्णभट दाडेकर

२२१ रुपे रुा भार २३१ वजा रुा १० बाकी
१३५ मोहरा सुमार ९ दर १५
६४४ सोने तोले ४२॥।२।. दर १५

१०००

७५० कृष्णाजी विनायेक

२०४ ॥ . रुपे रुा भार २१३ वजा ८ ॥ बाकी
५४५ ॥ . सोने तोले ३६।१ ॥ . दर १५

७५०

४००० सिवराम अबाजी टकले

२५०१ ॥ • सोने
२३९७ ॥ किता तोले १५९॥।१ दर १५
१०४ किता तोले ७।२ दर १४ प्रो

२५०१ ॥ . १६७।

१०५ मोहोरा सुमार ७ दर १५
११५१ रुपे रुपये भार १२०१ वजा ५० बाकी
२४२ ॥ नख्त रुा

५०००

१००० परशरामपंत

८८२॥। सोने तोले ५८॥।१ दर १५
११७। रुपे तोले ११७। येकून रुा

१०००

२०० गणेश नारायेण जोग

१५५ सोने तोले १०।१ दर १५
४५ रुपे तोले ४५ यकून रुा
——
२००

१०० सदाशिव पद्माकर
७७ सोने तोले ४५८१॥ दर १५
२३ रुपे तोले २३
——
१००

२००० बाबदेवभट जोगळेकर
७४६।. सोने तोले ४९॥। दर १५
३४४।. रुपे तोले ३४४।. येकून रुा
९०९॥. नखत रुा
४०० ५०९॥
——
२०००

५०० अपाजी लक्ष्मण बरवे
४३७॥. सोने तोले २९८२ दर १५
६२॥. रुपे तोले ६२॥ येकून रुा
——
५००

६०० त्रिंबक अनत रानडे
१८०॥। सोने तोले १२८॥ दर १५
४१९। रुपे तोले ४१९। येकन रुा
——
६००

३०० त्रिंबक नाईक सराफ
२५८ सोने तोले १७८२॥ दर १५
४२ रुपे तोले ३२ येकून रुा
——
३००

२०० मल्हार नाईक सरफ
५० सोने तोले ३।१ दर १५
३४॥ रुपे तोले ३४॥ येकून रुा

१५५ ॥ नख्त रुा

२००

१५०० नारो गणेश जोसी

९१६ ॥ सोने तोले ६५८१ दर १५

(यापुढील काही भाग फाटून गेला आहे)

६२९ मोहोरा ४२

६१५ प्रा नाणे ४१ दर १५

१४ प्रा नाण १ दर १४

६२९

१६२३ कापड सनगे

४००० जवईर दागिणे सुमार येकून रुा

१५२५ घोडी रास ५

५०० उट नफर ३ रुा

६७२४|||. रोख रुा

७५१६८४=

२६०४||. किता पटी दुसरी भरन्यास यैवज कमी सबब काली

ब अडान व ब्राह्मन मडली

९०५ ब्राम्हन मडली

४२४|| कौली असामदार पैकी रुा १०००

पैकी वसूल

१२४५ अडान पटी रुा १६७७ पैकी वसूल

२६०४||.

२०३४|= कर्ज जमा बरहुकूम याद अलाहिदा येकून २०३४|= रुा

८— वसूल मुले ज्याजती गुा सदासिवभट मुले

७९८०७८=

खर्च रुा

७५००० भरणा श्रीमत राजश्री ——— दादासाहेब याचे सरकारात
ताा राजाराम गोविंद मिति सके १६९६ जये नाम
सवछरे
२४६९ जवईर
६४५७०॥ सोने व रुपे व कापड
५०० कापड
५४६०॥ हवाला माा त्रिबक सोनदेव बोदेगावकर
———
७५०००
४५५९ दरबार खर्च व कारकुनी वगैर शार्गीद पेशा व राऊत
३५०० राजाराम गोविद
१९६९ सोने रुपे
१५३१ जवईर
———
३५००
१०२५ हयातखान व मल्हारपंत व बलवंतराव
१००० नक्त रुा
२५ तटू हयातखान याजकडे १
———
१०२५
३२॥ धार व शागीर्द पेशा निा हयातखान
१॥ मशालची व भालदार निा राजाराम गोविद
———
४५५९
३० निा त्रिबक सोनदेव ष्वर व कारकून व पोतदार हवाल्याचे
यैवजास अले
५ जयेरामपंत कारकून
२० ष्वर आा १०
५ बळू सोनार
———
३०

१५०॥।.। किरकोली खर्च हिसेब बरहुकूम अलाहिदा
१७ सिवबंदी गाव निा यैवजाचे वसुलास व
दारवाजी यावर अमल हिसेब
२० उचापत वणी श्वरास दाणा व पोटगी वगैर
१ भेट राजश्री रघुनाथराव निलकठ
७।. श्वारी खर्च मुा वणी बरहुकूम हिसेब अलाहिदा
५५। = मेजमाणी खर्च राजश्री रघुनाथराव निलकठ
वर हुकूम हिसेब अलाहिदा
९ बटा खर्च त्रिंबक सोनदेव याचे यैवजाचे
भरन्यास येकदर
४१८।. णुकसाणी खर्च सोने व रुपे देता घेता
व अटणीमुले जल येंकून बर हुकूम
हिसेब अलाहिदा

१५०॥।.।
१२। ≡ वेकाजीपंत कारकून निा राजाराम गोविंद सेला व
येकून सनगे २ दोन तुलाजीचे कापड पैकी

७९७५२८ ≡ ।

बाकी रुा
५४।॥ = ॥।.

कै. म. म. दत्तो वामन पोतदार
भा. इ. सं. मंडळातील लेखांची सूची

डॉ. चिं. ना. परचुरे

कै. म. म. दत्तो वामन पोतदार यांचा आणि भा. इ. सं. मंडळाच्या स्थापनेपासून त्यांच्या देहांतापर्यंत घनिष्ट संबंध होता. शके १८३७ (इ. १९१५) पासून ते मंडळाचे प्रदीर्घ काळ चिटणीस होते. त्यानंतर कार्याध्यक्ष आणि उपाध्यक्ष ही पदेही त्यांनी कित्येक वर्षे भूषविली होती. मंडळाचा आणि महामहोपाध्यायांचा ह्या संबंध अतूट होता. मंडळाचे ते एक प्रमुख आधार ठरले होते. ही सर्व जबाबदारी पार पाडताना मंडळाच्या स्वीयमाला आणि पुरस्कृत मालेतून त्यांनी जे लेखन केले त्या विषयांची सूची येथे दिली आहे.

मंडळाच्या स्वीयमालेत अहवाल, इतिवृत्ते, संमेलनवृत्ते, त्रैमासिके किंवा स्वतंत्र प्रकाशने इत्यादींचा समावेश होतो. या मालेतून म. म. पोतदार यांनी जे लेखन केले ते (१) इतिहास (२) भाषा व वाङ्मय आणि (३) संकीर्ण अशा तीन विभागात येथे दिले आहे. ते चिटणीस असताना पुरस्कृत ग्रंथमालेची कल्पना पुढे आली. मंडळ प्रकाशनाची मर्यादा ध्यानात घेऊन स्वतंत्रपणे प्रकाशनाला उत्तेजन द्यावे व विशेषतः इतिहास आणि भाषा-वाङ्मयातील संशोधनाचे कार्य अधिक नेटाने पुढे रेटावे या विचाराने म. म. पोतदार यांनी कित्येक लेखकांना आणि संशोधकांना उत्तेजन दिलेले दिसते. या मालेत क्रमांक ५७ पर्यंत विविध विषयांवरील एकूण ५५ ग्रंथ प्रकाशित झाले. क्रमांक १५ (सामाजिक निबंध) व क्रमांक १६ (राजकीय व इतर निबंध) हे ग्रंथ प्रकाशित झाले नाहीत. पुरस्कृत ग्रंथ मालेच्या अनेक ग्रंथांना प्रारंभापासून म. म. पोतदार यांनी स्फुट किंवा विस्तृत स्वरूपाचा पुरस्कार लिहिला आहे. काही स्थानी त्याचे स्वरूप प्रस्तावनेचेही आहे. विशेष हे की या लेखनातून महामहोपाध्यायाचे विविध विषयावरील स्फुट स्वरूपातील विचार प्रकट झाले आहेत. पोतदार लेखनकार्याचा अभ्यास करतांना हे लेखन अभ्यासिले जाणे अगत्याचे आहे, या विचाराने पुरस्कृत ग्रथमालेतील पुरस्कार–प्रस्तावना स्वरूपातील लेखांचीही सूची येथे दिली आहे.

स्वीयमालेतील लेखांची सूची देताना विषय, संक्षिप्त स्वरूपांत सदर्भ ग्रंथ – प्रकाशन शक इसवी; लेखाचा (असल्यास) दुसरा सदर्भ ग्रथ – पृष्ठ क्रमांक व शेवटा विषयाचे स्वरूप, असा साधारण क्रम लावला आहे.

पुरस्कृत ग्रंथमालेतील क्रम असाच असला तरी बहुतेक पुरस्कार किंवा प्रस्तावना ग्रंथाच्या प्रारंभीच असल्याने शेवटी पृष्ठ क्रमांक न देता पुरस्कार, प्रस्तावना इ. लेखाचे स्वरूप दिले आहे. सूचीत मूळ ग्रंथाची संक्षिप्त रूपे दिली आहेत. ती

अभ्यासकांच्या सहज ध्यानात येणारी आहेत. उदाहरणार्थ :– वाइतिश = वार्षिक इतिवृत्त शक., त्रै = त्रैमासिक वर्ष; रास्म = राजवाडे स्मरणिका इत्यादी.

इतिहास

१ अठरा टोपकर □ वाइतिश १८३५ (श १८३६ पौष) पृ २७२ पाश्चिमात्य

२ अदिलशाही फर्मानांचा व इतर अस्सल कागदांचा बहुमोल गुप्त ठेवा □ त्रै : १–२ (श १८४९ आषाढ-आश्विन) पृ. १५ आदिलशाही

३ अफजल प्रसंगातील एक नवा धागा □ त्रै २१ : १ (श १८६२ आषाढ/इ १९४० जुलै) शिचसा ५ पृ. १७६ शिवकाल

४ अलमगीराचा दक्षिणेतील अमदानीविषयी काही प्रयत्न □ त्रै ९:३ (श १८५० आश्विन) पृ ३१ मुघलकाल

५ अंजनवेल तालूक्याची वहिवाट □ वाइतिश १८३५ (श १८३६ पौष) पृ ३१९ शासकीय

६ आळंदीची पंचक्रोशी □ षावृश १८३४ (आश्विन–फाल्गुन) पृ. ३०४ नगर-ग्राम

७ इतिहासाचार्य राजवाडे यांचे कार्य □ रास्म (श १८९८/इ. १९७६ डिसें) पृ ११ आंग्लकाल

८ इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीचा पेशवे दरबाराशी फारशी पत्रव्यवहार (कोणाकडून कोणास किती पत्रे गेली त्याबद्दल पत्रकांसह यादी) □ फाप (श १८४५ विजयादशमी) पृ. १ फार्सी साधने

९ इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीचा पेशवे दरबाराशी फारशी पत्रव्यवहार (चिटणीसांचे निवेदन) फाप (श १८४५ विजयादशमी) पृ.१ फार्सी साधने

१० इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीचा पेशवे दरबाराशी फारशी पत्रव्यवहार (प्रस्तावना) □ फाप (श १८४५ विजयादशमी) पृ. १ फार्सी साधने

११ एक आदिलशाही आर्थिक फर्मान □ त्रै ३ : १ (श १८४४ आषाढ / इ. १९२२ जून) पृ १५ आदिलशाही

१२ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खंड ८ वा (संकीर्ण ले. ५१, ५३, ५४, ५५, ५६, ५८, ५९, ६०) □ त्रै ३३-३४ : ३-४/१-२ (श. १८७४ पाष–१८७५ आश्विन/ इ. १९५२ जाने–१९५३ ऑक्टो) ऐ सं सा ८, पृ ४१ महाराष्ट्रेतर

१३ ऐतहासिक संकीर्ण साहित्य खंड ८ वा (संकीर्ण ले. ४९, ५०, ५२, ५५, ६१ ते ६४) □ त्रै ३३-३४ : ३-४/१-२ (श १८७४ पाष-आश्विन / इ. १९५२ जाने–१९५३ ऑक्टो) ऐ सं सा ८ पृ. ४० संकीर्ण

१४ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खंड ८ वा (प्रस्तावना – पंढरपूर, नाना

फडणीस इ.) □ त्रै ३३–३४:३–४/१–२ (श १८७४ पौष–१८७५ आश्विन / इ १९५२ जाने–१९५३ आक्टो) ऐसंसा ८ पृ १ **पेशवेकाल**

१५ काही नाणी (टिपण) □ त्रै ८:१–२ (श १८४९ आषाढ–आश्विन) पृ ९८ **चलन**

१६ केदारवेस □ त्रै २२:३–४ (श १८६३ पौष–१८६४ चैत्र/इ १९४२ जाने–एप्रिल) पुनसंवृ पृ २६ **पुणेनगर**

१७ खटावकर पाठक यांस राजेबहादर यांची देणगी (ले ३१) □ त्रै २४:३ (श १८६५ पौष) ऐसंसा ५ पृ ३४ **शिवकाल सनदा**

१८ गवांदे (ले ११६ एक शिवपूर्वकालीन घराणे) □ त्रै १०:३ (श १८५१ आश्विन/इ १९२९ ऑक्टो) ऐफासा १, पृ ११४ **ऐ घराणी**

१९ गायधर व खडकघार □ त्रै २२:३–४ श १८६३ पौष–१८६४ चैत्र/ इ १९४२ जाने–एप्रिल) पुनसंवृ १ पृ ११ **पुणेनगर**

२० गुणी ब्राह्मण हरकाऱ्यांच्या शंभर जोड्या □ त्रै १३:४ (श १८५५ चैत्र/इ १९३३ मार्च) पृ १२७ **सामाजिक**

२१ गुंजण मावळ देशमुखांचे पत्र □ त्रै २१:२ (श १८६२ आषाढ/इ १९४० ऑक्टो) शिचसा ५, पृ २०६ **शिवकाल**

२२ गुंडम राऊळ □ त्रै १९:३ (श १८६० पौष/इ./१९३९ जाने) पृ ९० **धर्मसंप्रदाय**

२३ गोवळकोंड्याची कुत्बशाही (निवेदन) □ सतराव्या शतकातील गोवळ-कोंड्याची कुत्बशाही (इ १९३४) पृ १ **कुतुबशाही**

२४ घोड्याचा एक जुना पायबंद □ त्रै २०:३ (श १८६१ पौष/इ १९४० जाने) पृ १ **संकीर्ण**

२५ चंद्रचूड-दफ्तर विज्ञप्ति) □ चंद [कला पहिली] (श १८४२ भाद्र) पृ१ **ऐ. घराणी**

२६ चिमणबाग (शनिवारवाडा-पुणे) □ त्रै २०:१ (श १८६१ आषाढ/ इ १९३९ जून) मलपृष्ठ १ समोर **ऐ प्रतिमापत्रे**

२७ चिंचवड–मोरया गोसावी देवालय कधी बांधले? □ त्रै २१:३ (श १८६२ पौष/इ १९४१ जाने) पृ ७८ **देवस्थान**

२८ जयपूर येथील जुनी महाराष्ट्रीय घराणी □ त्रै २९ : ३-४ (श १८७० कार्तिक-माघ/इ १९४८ ऑक्टो-डिसें) भाइपदिल्ली खाअं, पृ १२९ **ऐ घराणी**

२९ जुना दगडी नळ □ षसवृश १८४० (श १८४२ कार्तिक) पृ. ९०. **पुणेनगर**

३० जुन्या बागा □ त्रै २२ : ३-४ । पुनसंवृ १ (श १८६३ पौष- १८६४ चैत्र / इ १९४२ जाने–एप्रिल) पृ ११ **पुणेनगर**

३१ टांकसाळ □ त्रै २२ : ३-४ (श १८६३ पौष-१८६४ चैत्र/ इ. १९४२ जाने–एप्रिल) पुनसंवृ १ पृ. २७ चलन : **पुणेनगर**

३२ ठकार घराणे □ त्रै १० : ३ (श १८५१ आश्विन/इ. १९२९ ऑक्टो) ऐसंसा १, पृ ११७. **ऐ घराणे**

३३ ढगोजी मेघोजी □ त्रै १९ : २ (श १८६० आश्विन/इ. १९३८ ऑक्टो) पृ ६१ **ऐ. घराणे**

३४ ढेरे यांजकडील खेळोजी भोसले यांचे कागद □ त्रै २० : ३ (श १८६१ पौष/इ. १९४० जाने) शिचसा ५, पृ. १४९ **ऐ घराणे**

३५ तुंबडी भाट □ त्रै १२:३ (श १८५३ पौष) पृ. १२२ **सामाजिक**

३६ तोतया प्रकरणींचे एक बातमीपत्र □ त्रै ८ : ३ (श १८४९ पौष) पृ १६०. **पेशवेकाल**

३७ दगडी दीप पुतळी □ त्रै २२:३-४ (श १८६३ पौष–१८६४ चैत्र/इ. १९४२ जाने–एप्रिल) पुनसंवृ १, पृ. २१ **पुणेनगर**

३८ दर्यासारंग हे नांव की पद ? □ त्रै ४३ : १–४, (श १८८७–राश २९३/इ. १९६५) ऐसंनि ७, पृ. ३९ **शिवकाल**

३९ दाभाडयांचे मुजुमदार □ त्रै १९:४ (श १८६१ चैत्र / इ १९३९ एप्रिल) पृ. १४५ **ऐ घराणी**

४० दाभोलकर–परगणे अकोले (जि. नगर) □ त्रै ९:२ (श १८५० आषाढ) ऐसंसा १, पृ. ५ **ऐ. घराणी**

४१ दियानतरावाचे सिराले देशमुख-देशकुलकर्ण्यांना पत्र □ त्रै २३ : २ (श १८६४ आश्विन) शिचसा ८, पृ ६८ **शिवकाल**

४२ नवलाख उंबऱ्याचे निझामशाही काझी □ त्रै २:१–४ (श १८४३/इ १९२२ जून) पृ १५९ **निजामशाही**

४३ नाना फडणीस यांजकडील गावे □ त्रै २१:३ (श १८६२ पौष/इ. १९४१ जाने) ऐसंसा ३, पृ २६५ **पेशवेकाल**

४४ नानासाहेब पेशवे यांच्या 'सुवर्णनदी 'तील एका वाक्याचा अर्थ □ त्रै १९:४ (श १८६१ चैत्र/इ १९३९ एप्रिल) पृ १४१ **पेशवेकाल**

४५ नाशिराबादेची ऐतिहासिक पहाणी □ त्रै १७:४ (श १८५८ फाल्गुन/ इ. १९३७ मार्च) पृ १२९ **नगरग्राम**

४६ न्याहाल पेठेचे दुसरे नाव नागेश पेठ □ त्रै २२:३–४ (श १८६३ पौष– १८६४ चैत्र/इ. १९४२ जाने–एप्रिल) पुनसंवृ १, पृ ८ **पुणेनगर**

४७ पतितपावन पद्धति □ तुसंवृश १८३७ (श १८३८ पौष) पृ ९१ **सामाजिक**

४८ पर्वतीवरील भग्न गणेशमूर्ति □ त्रै १९:४ (श १८६१ चैत्र/इ. १९३९ एप्रिल) पृ १४३ **देवदेवता**

४९ पंढरपूर-हरिदास बडवे (श १५६३-१६४० ले ६६–७०) □ त्रै ३३:३–४; ३४:१–२ (श १८७४ पौष १८७५ आश्विन–इ. १९५२ जाने–१९५३ ऑक्टो) ऐ संसा ८, पृ ५६ **ऐ घराणीं**

५० पंतप्रधानाख्यान □ द्विसंवृश १८३६ (श १८३७ भाद्र) पृ १८४ **पेशवेकाल**

५१ पायगुडे देशमुख (मावळ) □ त्रै ८:१–२ (श १८४९ आषाढ–आश्विन) पृ ९८ **ऐ घराणीं**

५२ पासोड्या मारुती □ त्रै २२:३–४ (श १८६३ पौष–१८६४ चैत्र/ इ. १९४२ जाने–एप्रिल) पुनसंवृ १, पृ २७ **देव–देवता पुणेंनगर**

५३ पिलाजी जाधवराव यांची खरी तसबीर कोणची ? □ त्रै १:२–३ (श १८४२ आश्विन–पौष/इ १९२० ऑक्टो १ २१ जाने) पृ ११ **ऐचित्रविषयक**

५४ पुण्याचा गारपीर □ त्रै १०:२ (श १८५१ आषाढ/इ. १९२९ जुलै) ऐसंसा १, पृ १०९ **पुणेनगर**

५५ पुण्याचा नदीकिनारा □ त्रै ५:१–४ (श १८४६ आषाढ–१८४७ चैत्र/ इ. १९२४ जुलै १९२५ एप्रिल) पृ २८ **पुणेंनगर**

